• मराठी

• मासिक-पत्र

# माणूस

संपादक : श्री. ग. माजगांवकर

— अभिराष्ट्रेण वर्धताम् —

जुलै १९६१

वर्ष पहिलें

अंक दुसरा

५० न.पै.



## पत्रव्यवहार

### आजची निकड भागवील

• • • माणूसचा अंक मिळाला. त्यांतील 'जिल्हा लिहूं लागला, जिल्हा वाचूं लागला' हा लेख मोठ्या उत्सुकतेने वाचला. सर्वसामान्य वाचकाला विचारप्रवण करणें, आजच्या परिस्थितीची संपूर्ण जाणीव देणें आणि त्याला प्रेरक होतील अशा गोष्टी त्याच्यापर्यंत नेऊन पोचविणें या गोष्टींची आज अतिशय निकड आहे. आपल्या मासिकाच्या हातून ह्या कामीं चांगली कामगिरी व्हावी असें इच्छितो.

—वि. स. खांडेकर, कोल्हापूर.

### अल्प किंमतींत मोलाचें साहित्य

• • • पहिला अंक वाचला. पहिल्या अंकांत मनोरंजन, विज्ञान, वगैरे विविध विषय असून हें मोलाचें साहित्य अल्प किंमतींत देण्याचा हा प्रयत्न स्तुत्य वाटतो.... यश उत्तरोत्तर वाढत जावें हीच सदिच्छा.

— वसंत पुरोहित, कोयनानगर

### उत्साहाचा झरा

• • • मासिक वाचलें. आवडलें. सजावट उत्कृष्ट आहे. मुखपृष्ठावरील प्रतीकचित्र मार्मिक वाटलें. 'जिल्हा लिहूं लागला, जिल्हा वाचूं लागला' हा लेख अंकांत हिऱ्यासारखा चमकतो. नवसाक्षरांचें 'पत्र' वाचून फार आनंद वाटला. खुद्द त्यांना उत्साहाचा झराच गवसला आहे.

— मधुकर ल. कुलकर्णी, नासिक

### शहरी मालमसाला कमी

• • • शहरांतून अंक खपायला हवा तो मालमसाला कमी वाटला. खेड्यांतून मात्र खपेल. प्रत्येक विकासगटांतून याला पाठिंबा मिळेल.... मनोरंजनास फार महत्त्व आहे, नाही का ? असा अंक काढणें मात्र साहस ठरणार आहे... चाकोरीबाहेर जाऊन मासिक काढण्याचें आपलें धाडस कौतुकास्पद आहे.

आपणांस सुयश इच्छितों.

—द. शं. केळकर, सावंतवाडी




मराठी मासिक पत्र

वार्षिक वर्गणी पांच रुपये

'माणूस'च्या पहिल्या अंकाचें सर्वत्र चांगलें स्वागत झालें. काही उणीवाहि ध्यानांत आल्या. वाटचाल खडतर आहे याची कल्पना मात्र या पहिल्याच अंकाने पुरेपूर आणून दिली. परंतु रसिक व गरजू वाचकांच्या मदतीने ही वाटचाल पुरी होईल असा विश्वासहि वाटत आहे.

अनेकांनी पत्रें पाठवून 'माणूस'संबंधी आपापला अभिप्राय व्यक्त केला. या सर्वांचें आम्ही मनःपूर्वक आभारी आहोंत. काही पत्रांतील निवडणूक मजकूर वानगीदाखल शेजारी प्रसिद्ध केला आहे. या सर्व पत्रलेखकांची प्रसिद्धीबद्दल अनुमति आम्हीं अर्थातच गृहीत धरलेली आहे.

'माणूस'वर सर्वांनी असाच रागलोभ ठेवावा ही विनंती.

—संपादक

### विविध व उत्तम

• • • पहिल्या अंकाचें स्वरूप विविध व उत्तम आहे. १ लें वर्ष तरी निदान तुम्हास खूपच धडपड करावी लागेल. पण ती तुम्ही कराल अशी खात्री पहिल्या अंकांतील मजकुरावरून वाटते. आपल्या मासिकास सुयश चिंतितों.

— अ. ह. लिमये, पुणें.

### एक निराळा प्रयत्न

• • • एका अगदी निराळ्या दृष्टिकोनांतून होणारा हा प्रयत्न कौतुकास्पद व प्रशंसनीय आहे.

— श्याम सरवटे, नागपूर.

### या अंकांत

मुखपृष्ठ : वादळाने भांबावलेली एक ८० वर्षांची वृद्धा (वेंगुर्ला)

| | |
|---|---|
| ★ कोकणच्या वादळसंकटाची खास चित्रकथा | ३ ते ९ |
| ★ 'ययाति'–परीक्षण वसंत कानेटकर | २५ |
| ★ विधानसभेतील चेहरे निरीक्षक | १५ |
| ★ यंत्रें येती घरां— दि. बा. मोकाशी | १९ |
| ★ वेदना सदा कऱ्हाडे यांची कथा | ११ |
| वार्ताविवेचन | ३५ |

# भीषण वादळ-पावसाच्या माऱ्यानें



आमचे प्रतिनिधि श्री. राजा कुलकर्णी मुलाखतीपासून दौरा सुरू करीत आहेत.

दि. २४ मे या दिवशीं दक्षिण कोकण विभागांत निसर्गानें जें रौद्र तांडव माजविलें, त्यांत एक लाखांच्यावर घरांची पडझड झालेली आहे. १७५० चौरस मैलाच्या टापूंतील सुमारे चारशे खेडीं व साडेसहा लाख लोकसंख्या या वादळाच्या तडाख्यांत सापडली होती. 'माणूस' ने आपला खास प्रतिनिधि व फोटोग्राफर या सर्व भागांत पाठविला व त्यांनी जें पाहिलें व टिपून घेतलें त्यावरून तयार केलेली ही खास चित्रकथा —

आमचा प्रतिनिधि जेव्हा वादळी विभागांतून दौरा करीत होता, तेव्हा घरांच्या, झोपड्यांच्या व बागबगिच्यांच्या अतोनात पडझडीशिवाय दुसरें दृश्यच त्याला दिसूं शकत नव्हतें.

शेकडों वर्षें उभे असलेले मोठमोठे वृक्ष रस्त्यांवर पाळामुळांसह उन्मळून पडलेले त्याला दिसत होते. त्या रस्त्यांतून सायकलसारख्या वाहनांना किंवा गुरामाणसां-सारख्या पादचाऱ्यांनासुद्धा वाट काढणें कठीण झालें होतें. त्या मानानें आमचा प्रतिनिधि बरेंचसें 'होऊन' गेल्यावर पोहोचलेला होता, म्हणून त्याला हे अडथळे कमीच आहेत असें सांगण्यांत आलें.



● बागायतवाडी (शिरोडा) रस्त्यावर पडलेल्या झाडांतून मनुष्य वाट काढीत आहे.



यावरून एकंदर वादळाची सहज कल्पना येईल. मोलमजुरी करून राहणाऱ्या कित्येक मजुरांच्या झोपड्या, छोटीं छोटीं घरें या वादळानें पत्त्यांच्या बंगल्यासारखीं उधळून दिलीं, उसकटून टाकलीं.


प्रतिनिधि : राजा कुलकर्णी

● ● ● ●

पिढ्यानुपिढ्या तळहातावरील फोडाप्रमाणे जतन केलेल्या नारळीच्या बागा पाहतां पाहतां पार उद्ध्वस्त झाल्या. समुद्रकिनाऱ्यावरील नावा, माचवे व गलबतें यांनाहि वादळाचा चांगला तडाखा बसून त्यांचीं फळकुटें किनाऱ्यावर येऊन अस्ताव्यस्त पसरलेलीं आढळून आलीं.



● मालवण किनाऱ्यावर ४ गलबतें, २ कोठे, ३ लाँचेस फुटल्या. दोघेजण बुडून मरण पावले.



घरें वा झोपड्या पुन्हा बांधतां येतील, मंदिरा-राऊळांची पडझड पुन्हा डागडुजी करून सांधतां येईल; परंतु बागबगिचांचें उद्ध्वस्त विश्व पुन्हा त्वरित व्यवस्थित करणें केवळ अशक्य! आज दर झाडामागे एकेक रोप लावून दिलें तरी त्याची व्यवस्थित निगा व जोपासना होऊन वादळ-वाऱ्यांत व पाऊस-पाण्यांत त्याने तग धरून तीं रोपें फळांफुलां येण्यास किमान दहा-पंधरा वर्षें लोटावीं लागतील. आणि तोंपर्यंत त्यावरच अवलंबून असणारांचें काय हा प्रश्न उभा राहतो.

## विकलांग झालेला कोंकण

छाया : मा. द. शिंदे, पुणें.







● बरत्याव जॅकी डिसुझा याच्या घराच्या पडझडीनंतर निराधार झालेलें कुटूंब

त्यांतहि वादळाने विनोदाची म्हणा किंवा श्रद्धाशीलतेची म्हणा चुणूक दाखविण्यास कमी केलें नाही. एकाचें सर्व घर उद्ध्वस्त झालें, पण त्याच्या अंगणांतील तुळशीवृंदावन मात्र तसेंच उभें राहिलेलें होतें. तर दुसरीकडे देवळाचें शिखरच तेवढें वादळामुळे भंगून पडलें होतें.

● उभा दांडा ( मूठ ) विभागांतील केपा देवीचें नव्या मंदिराचें छप्पर उडालें— कळस पडला.






निसर्गाने आपला चमत्कार मानवाला दाखविला, पण मानवाने मात्र निसर्गाला आव्हान देण्याचा पवित्रा अद्याप उचललेला नाही.




● वस्त्यात जॅकी डिसूझा यांनीं पुन्हा निवारा उभारून दैनंदिन जीवन सुरू केलें आहे.




● मालवण, कोल्हापूर रस्त्यावरील फोंडा गावाजवळील पूल पडला. त्यामुळे वाहतुकींत व्यत्यय. तेथे तात्पुरता पूल दिसत आहे.




● श्री. शांताराम आप्पा शिरोडकर ( उभादांडा वेंगुर्ला ) हे आपल्या पडझड झालेल्या घराची डागडुजी करीत आहेत.



● मारी डेव्हिड फर्नांडिस ( वेंगुर्ला कुंभवडा ) यांच्या घरावर आंब्याचें झाड कोसळून झालेली हानी.



● आणखी एका घराचें उध्वस्त दृश्य उभादांडा ( वेंगुर्ला )



● वेंगुर्ला येथील शंकर बाबू नरसुले यांच्या घराची संपूर्ण पडझड झाली. तेथील तुळशीवृंदावन मात्र तसेंच राहिलें.



● कुडाळ गांवीं बऱ्याच बागा उध्वस्त झाल्या. त्यांतील स्टँडजवळच्या एका बागेचें दृश्य.

एक वृक्ष उन्मळून पडला; नव्हे घरचा कर्ता माणूसच पडला !

आम्हीं निधि गोळा करणें सुरू केलें. राष्ट्रपति, पंतप्रधान यांनीहि आपापल्या रकमा पाठविल्या. मंत्र्यांचे दौरे सुरू आहेत. पण केवळ मदत-वांटपाने ही कित्येक पिढ्यांच्या श्रमांची धुळधाण कशी भरून निघणार हें कांही समजत नाही.


कारण इकडे मदतीचे रुपये वादळग्रस्ताचे हातांत पडत आहेत तर तिकडे मंगलोरी कौलांचे भाव शंभर रुपयांनी वाढूं लागले आहेत. दोन रुपयांच्या आंत मिळणारा मजूर सातसात रुपये देऊनहि कामास यायला राजी नाही. जो तो आपली सुटका कशी होईल एवढ्याच चिंतेत व्यग्र असणारा. एकीकडे व्यापाऱ्यांचा काळाबाजार व नफेबाजी तर दुसरीकडे ही घातक आत्मकेंद्रित वृत्ति. ही परिस्थिति पालटल्याशिवाय मदतीचे महापूर लोटूनहि कोकण दरिद्रीच राहील हें सांगावयास हवें काय !

निसर्गाने केलेल्या हानीबद्दल हळ हळ वाटतेच; पण खरें दुःख आहे या सामाजिक विघटनेचें, अनास्थेचें, उदासीनतेचें. सामुदायिक संकटांना सामुदायिक प्रयत्नांनीच तोंड द्यावें लागतें. ही सामाजिक संघटनेची विद्याच आम्हाला अद्याप परिचित नाही. कोकणच्या वादळ-संकटामुळे या विद्येची निकड आम्हाला भासली, तो आत्मसात् करण्यासाठी आम्ही बद्धपरिकर झालों, तर निसर्गाचें आव्हान आम्हीं स्वीकारलें असें होईल. अशा स्थितींत वादळाचा शाप ही सामाजिक उत्थानाची नांदीच ठरेल.

• • •



• “ फोंडा ” जवळ तात्पुरता उभारलेला पूल
• पी. डब्ल्यु. डी. ने वेळींच लक्ष न दिल्याने मूळचा पूल उध्वस्त झाला.



उध्वस्त बागा



• “ रेडी ” येथें निराधार आलेल्यांना ॲडिशनल महालकरी श्री. कुबल साह्य देत आहेत.



# फिनीक्स पक्षाला लाजवणारा प. जर्मनी

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस वर्ष दीडवर्ष जर्मनीवर रोज दोनशे ते पांचशे विमानें बॉंबहल्ला करीत होतीं. युद्ध संपलें त्यावेळी सर्व जर्मनींत शे. १० घरें तरी संपूर्ण उभीं होतीं की नाही याची शंकाच आहे. कारखाने तर जवळजवळ सर्व नष्ट झाले होते. युद्धानंतर जर्मनीची फाळणी झाली आणि पूर्व जर्मनींतील रशियनव्याप्त प्रदेशांत उभे असलेले कारखाने रशियानें समूळ उचलून नेले. असा हा संपूर्णपणे दग्ध झालेला, धुवून नेलेला व नागविलेला पश्चिम जर्मनी आज जगांतल्या अग्रेसर राष्ट्रांत गणला जाऊं लागला आहे. युद्धकाळांत या राष्ट्रावर कांही आपत्ति ओढवली होती हें आज जर्मनींत जाणाऱ्या प्रवाशाला खरेंसुद्धा वाटणार नाही इतका जर्मनीचा पंधरा वर्षांत कायाकल्प झालेला आहे. कोणती अमृतसंजीवनी जर्मनांना सापडली ? कोणत्या मंत्रजपानें त्यांना हें अपूर्व यश मिळालें ?

१९४८ ते १९५७ या काळांत जर्मनीचें औद्योगिक उत्पादन तिपटीने वाढलें. पिटलर मशीन कंपनी लायपझिग येथे पूर्व जर्मनींत होती. तेथून तिचे चालक फक्त धड शरीरानें फ्रँकफर्ड येथे पश्चिम-जर्मनींत आले. आणि पांचच वर्षांत शून्यांतून त्यांनी दरसाल अडीच कोटीच्या उत्पादनाची मजल गाठली. डी. के. डब्ल्यू हा कारखाना सॅक्सनींत होता. मोटारसायकल निर्मितींत जगांत त्याचा पहिला क्रमांक होता. रशियाने सॅक्सनी जिंकला व तो कारखानाहि बळकावला. पुढील वर्षांत त्या कारखान्याचे कामगार व संचालक हळूहळू चोरून एकेक पश्चिम जर्मनींत आले. यंत्रें, हत्यारें, अवजारें, नकाशे यांतलें कांहीहि त्यांना नेतां आलें नाही. पण रेगेन्सबर्ग येथे त्यांना त्यांच्याच कारखान्याची एक जुनी मोटारसायकल मिळाली. ती त्यांनी उलगडली व काम सुरू केलें. आज त्या कारखान्यांत दर चार मिनिटाला एक मोटारसायकल तयार होते. आज कारखान्याचा व्यवहार ४० कोटींचा आहे. पश्चिम जर्मनींत आज शेकडयांनी असल्या चमत्कारांनी भरलेल्या गोष्टी ऐकूं येतात. धुळींतून, दगडामातींतून तेथे एक यंत्रविश्व निर्माण झालें आहे. त्या यंत्रांचा झणत्कार, रणत्कार सर्व जगभर ऐकूं येत आहेत.

दहा-बारा वर्षांत एवढी अभूतपूर्व औद्योगिक प्रगति झाली ती नियोजनावांचून होणें शक्य नाही असेंच कोणालाहि वाटेल. पण जर्मनीचे गृहमंत्री एरहार्ड यांना हें मंजूर नाही. आर्थिक क्षेत्रांत संपूर्ण स्वातंत्र्यच असलें पाहिजे असें त्यांचें मत होतें. त्यांनीं कारखानदारांवर, अर्थव्यवस्थेवर, भांडवलावर, उत्पादनावर नियंत्रण घालण्याचें साफ नाकारलें. असें नियंत्रण नसलें तर धनिक लोक काळाबाजार करतात, साठेबाजी करतात, मालाची कोंडी करून भरमसाट भाव वाढवितात, कामगारांना पोटापुरतासुद्धा पगार देत नाहीत, त्यांचा रक्तशोष करतात, भांडवली संघटना समर्थ करून सरकारला विकत घेतात आणि आपल्याला हवे ते कायदे करून घेतात. नियंत्रण नाही म्हणजे हे सर्व अनर्थ आलेच असें मानलें जातें आणि जगांत अनेक ठिकाणी तसा अनुभवहि येते आहे. त्यामुळे एरहार्ड यांनी अनियंत्रित, मुक्तछंद अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करण्याचें ठरविलें तेव्हा त्यांच्यावर टीकेचा भयंकर भडिमार झाला. २।४ वर्षांत जर्मनीची अर्थव्यवस्था कोसळून पडणार, रसातळास जाणार असें तज्ज्ञांनी भविष्य वर्तविलें, पण प्रत्यक्षांत काय घडलें तें वर सांगितलेंच आहे.

याचें कारण अगदी साधें आहे. जर्मन कारखानदारांनी, व्यापाऱ्यांनी, भांडवलदारांनी, पेढीवाल्यांनी काळाबाजार करावयाचा नाही असें ठरविलें, हें तें कारण आहे. माणूस स्वार्थी आहे हें खरें, पण तो उच्च ध्येयवादामुळे स्वार्थाला नियंत्रित करूं शकतो हेंहि खरें आहे. त्यानें राष्ट्रहितावर दृष्टि ठेवून स्वार्थावर नियंत्रण घातलें की, अर्थव्यवस्थेवर नियंत्रण घालावें लागत नाही. जर्मन लोक विवेकानें आत्मनियमन करूं शकतील ही एरहार्ड यांची खात्री होती म्हणून तर अनियंत्रित अर्थव्यवस्था पुरस्कारण्याचें साहस त्यांनी केलें. धनोत्पादनाचीं साधनें सरकारने ताब्यांत घ्यावीं असा पक्ष मांडणाऱ्यांना उत्तर देतांना ते म्हणाले, 'मुक्तविनिमय ही केवळ अर्थव्यवस्था नाही. त्याच्या मागे नैतिक मूल्यें आहेत. आपल्या बांधवांच्या हिताची चिंता हें आमचें प्रधान मूल्य आहे. कामगार, संचालक व जनता या तीनहि पक्षांनी अखिल समाजाच्या हितासाठी स्वार्थाला मुरड घालणें—हा त्या मूल्याचा अर्थ आहे.' आणि हें मूल्य, ही नीति सर्वच जर्मनांनी शिरसावंद्य मानल्यामुळे जर्मनी आज समृद्ध, संपन्न व समर्थ झाला आहे. अमेरिकेने कोट्यवधि डॉलरांची जर्मनीला मदत केली हें खरें आहे, पण तशी फ्रान्सलाहि केली होती. आणि इतर अनेक देशांना केली होती. त्या धनाचें महत्त्व नाही असें नाही. त्यावाचून जर्मनीला एवढें यश मिळवितां आलें नसतें हेंहि खरें आहे, पण अनंत हस्तांनी लक्ष्मीने दिलेलें धन माणूस अविवेकानें, स्वार्थानें कसें मातीमोल करतो हें आपण पदोपदी पाहत आहों. अंतिम निर्णायकशक्ति मानव हीच आहे. ती विवेकी नसेल तर समाजवादी व्यवस्था तरी काय करणार ! भांडवलदार कारखानदार, व्यापारी यांच्याकडून धनसाधनें काढून घेऊन तीं द्यावयाचीं कोणाच्या हातीं ! तर सरकारच्या ! आणि सरकार म्हणजे कोण ? तर सरकारने नेमलेले संचालक, फडणीस, हिशेबनीस, नियंत्रक, इन्स्पेक्टर, आयातनिर्यात परवाने देणारे मंत्री, त्यांचे सचीव ! पण हे स्वार्थनिरपेक्ष कारभार करतात असें इतिहास सांगतो काय ? भारतीयांनी स्वानुभव जमेस धरून याचा विचार करावा.

भांडवली मुक्त अर्थव्यवस्था, समाजवादी नियंत्रित अर्थव्यवस्था, सरकारी अर्थव्यवस्था—या सर्व व्यवस्था कार्यवाहीत माणसानेच आणावयाच्या असतात. तो स्वार्थी, अंध, अविवेकी झाला की, यांतली कोणचीहि व्यवस्था असली तरी तो समाजाला सहज धुळीस मिळवितो आणि तो संयमी, निग्रही, समाजहिताची चिंता वाहणारा असा असला, तर भांडवली मुक्त व्यवस्थेंतहि स्वर्ग निर्माण करूं शकतो. जर्मन लोक विवेकी आहेत. समाजनिष्ठ आहेत असा एरहार्ड यांचा विश्वास होता. त्यांची तशी श्रद्धा होती आणि ती अगदी सार्थ आहे हें जर्मन जनतेने सिद्ध करून दाखविलें आहे.

— डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे



# वेदना

प्रा. सदा कऱ्हाडे

आज सकाळी सात वाजून दहा मिनिटांनी अनंत विश्वनाथ आपटे या व्यक्तीचें देहावसान झालें. त्याचें देहावसान म्हणजे केवळ परमेश्वराची इच्छा असेंच म्हटलें पाहिजे. कारण इतक्या लवकर त्याचा अंत व्हावा असें कांही घडलेंच नव्हतें. शरीराने धडधाकट असणाऱ्या माणसाने एवढ्या लवकर मरावें म्हणजे काय? अनंत विश्वनाथ आपटे चांगला धट्टाकट्टा-सशक्त माणूस होता. त्याला कधी फारसें दुखणें-पाखणें झाल्याचें निदान माझ्यातरी स्मरणांत नाही. आपल्याला सगळ्यांत कमी खर्च औषधाचा असें त्याने अनेकदा मोठ्या अभिमानाने मला सांगितल्याचें स्मरतें.... माणसाचें शरीर सुदृढ असलें म्हणजे तो कधी आजारी पडत नाही आणि आजारी पडला नाही तर माणसापासून मरणच दूर पळतें असें तो आपल्या भित्र्या बायकोला नेहमी सांगत असे....आणि आज हा सुदृढ शरीराचा माणूस असा अचानक मरण पावला.

गेल्या तीन-चार दिवसांपूर्वी त्याची बायको मला रस्त्यांत भेटली. नेहमीप्रमाणे मीं औपचारिक पण जिव्हाळ्याने चौकशी केली, तेव्हा तिच्याचकडून कळलें की अनंताला बरें नाहीं. तसाच त्याच्या घराकडे वळलों. त्याचा समाचार घेतला. संपूर्ण विश्रांति घे असें त्याला सांगितलें. शनिवारी किंवा रविवारी येईन असेंहि आश्वासन त्याला दिलें.

परंतु शनिवार उजाडलाच नाही....

आणि आज सकाळी त्या सद्गृहस्थाचें देहावसान झालें. केवढी विलक्षण घटना आहे. ध्यानी मनी नसतांना....एक दिलदार मनाचा अन् सच्चा वृत्तीचा माणूस आज असा दिगंतांत हरपला. शोधूं म्हटलें तरी आता तो शोधून भेटणार नाही. हरपला...तो आतां कायमचाच हरपला. अनंत विश्वनाथ आपटे हीं नांवेंच तेवढीं शिल्लक उरलीं आहेत. नुसतींच अक्षरें....त्या अक्षरांत त्याचें अस्तित्व होतें....पण आता तो नाही...मग त्या अक्षरांना तरी काय अस्तित्व उरणार आहे.

चार दिवसांपूर्वी मी त्याला भेटलों. जरा अस्वस्थच वाटला तो. तसा कांही तापदेखील नव्हता जास्त. डोकं भयंकर दुखत होतं एवढंच. खरं म्हटलं तर त्याचं डोकं अधून मधून दुखतच असे... डॉक्टर नुकतेच येऊन गेले होते. त्याला झोप लागलेली दिसत नव्हती. डोळे तांबरलेले दिसत होते. मीं त्याला विचारलें, ' किती दिवसांपासून आजारी आहेस ? '

' झाले दोन-तीन दिवस...'

' पण अशी एकाएकी प्रकृति बिघडली कशी ? '

' दोन दिवस झोप नाही. त्यांत पडसं, सर्दी, खोकला अन् मग डोकं दुखणं. '

' म्हणजे मामुलीच आहे. तसं घाबरण्याचं कारण नाही. '

' छे! अरेऽ मी कधी घाबरत नाही, पण तुझी वहिनी घाबरते फार. जरा कुठे सर्दी खोकला झाला तर हिन डॉक्टरांच्या औषधाचा रतीब सुरू केला बघ ! सारखी उशाशी काय बसून राहते ! कपाळावर हात काय ठेवून पाहते ! अंगावरची चादर काय सारखी करते ! अगदीच खुळी आहे तुझी वहिनी... तिला एवढंसुद्धा समजत नाही. डोकं दुखणं म्हणजे काय ? ॲस्प्रोकी दो टिकिया लीजिये.... दर्द और बुखार गायब '. त्याहि स्थितींत अनंत हसला, पण मला जाणवलं की, त्याचं हसणं खोटं आहे. अगदी खोटं. आनंदी नसतांनाहि असं खोटं हसण्याची त्याला सवय होती.

मीं स्पष्टच विचारलं, ' काय रेऽ ! पण आधी कांही झालं होतं का तुला ? '

' व्यथा.... '

' कसली ? '

' सांगतों ऐक— '

मी खुर्चीत सावरून बसलों अन् अनंत विश्वनाथ आपटे बोलूं लागला—

' गेल्या आठवड्यांत आमच्या ऑफिसमधला वसंत नेमाडे या नांवाचा कारकून वारला. होता वयाने माझ्यापेक्षा लहानच. घरचा अत्यंत गरीब. वडील पेन्शनर. आई थकलेली. बहीण शाळेंत शिकते आहे; शिवाय त्याची बायको अन् दोन मुलं. वाईट प्रसंग ओढवला त्या कुटुंबावर. त्याच्या स्मशानयात्रेला गेलों होतों मी. अरेऽऽ पाहिलं सगळं या डोळ्यांनी ! काय भयंकर चित्र होतं तें. त्याचे वडील...एवढा वृद्ध आणि अनुभवी माणूस, पण वादळांत सापडलेल्या जीर्ण वृक्षाप्रमाणे हादरून गेला. त्याची आई... त्या म्हातारीने तर आपल्या सुरकुतल्या हातांनी वसंताच्या मृत देहाला इतकें घट्ट धरून ठेवलें होतें....वसंताच्या बायकोकडे मला बघवत नव्हतें. कपाळावरचें कुंकू पुसलेलें, गळ्यांतलें मंगळसूत्र तोडलेलें. ती किती आकांत करून रडत होती म्हणून सांगूं ? वास्तविक तिच्या आक्रंदनाने आभाळाचा पडदा फाटून जायला हवा होता, पण आभाळाच्या पोकळीनेसुद्धा हें कसें सहन केलें याचेंच आश्चर्य वाटतें. कांही कळत नाही— आणि मग तीं जमलेलीं माणसं.. अरे एखाद्या शेतमळ्यांत झपाझप कापणी-बांधणीचं काम चालावं नाऽ तसे त्यांचे हात चालले होते. आणि मी वेड्यासारखा पाहत होतों. एकदा मनांत आलं सांगावं त्यांना.. अरे काय चालवलं आहे हें ? थांबवा सगळं.. पण मग मनाचं समाधान करून घेतलं...अजून खूप खूप बघायचं आहे आपल्याला.... आईच्या हातांतून शव सोडून घेतांना आईने फोडलेला हंबरडा.. शेवटची आर्त किंकाळी मारतांना वसंताच्या बायकोने सासूच्या खांद्यावर टाकलेली मान.... श्रीराम जयराम जयजयराम.. ते पवित्र मंगल उद्घोष, एका पार्थिव आत्म्याची अपार्थिव विश्वाकडे चालूं झालेली प्रयाणयात्रा. लिंगदेहाचें कवच फोडून जाणाऱ्या आत्म्याचें अंतिम निर्वाण. त्या निर्वाणयात्रेत सामील होण्याचें भाग्य लाभलें मला....आणि नंतरचें भयंकर चित्र ! रचलेली चिता.. भटजीचे मंत्र.. भडकणाऱ्या ज्वाला.. पेटणारा अग्नि.. तुटणाऱ्या नाड्या.. फुटणारी कवटी.. जळणारें कलेवर.. अरेऽ ! हें संपूर्ण चित्र मनावर इतकें कोरलें गेलें आहे.. कधींहि पुसटलें जाणार नाही. माझ्या टेबलासमोर असलेली त्याची बसण्याची जागा भरून निघेल. परंतु त्या जागेवरून त्याची आकृति कधीच पुसली जाणार नाही. वादळ-वृक्षाप्रमाणे हादरून गेलेले त्याचे वडील मला दिसतच राहणार. त्याच्या आईची नि बायकोची आर्त किंकाळी झोपेंतच काय परंतु जागेपणीहि मला ऐकूंच येणार. चितेवरच्या ज्वाला माझ्या डोळ्यांत आगच पेटवणार. त्या दिवसापासून मी फार अस्वस्थ झालों आहें. माझी झोप नाहीशी झाली आहे. डोकं भयंकर दुखतं आहे. एकच प्रश्नचिन्ह.. या जगांत हें असें कां होतें ? माणूस कोण ? येतो कुठून ? जातो कोठे ? कोण घडवितो या माणसाला ? आणि या माणसाचें हेंच चित्र वसंत नेमाडेच्या जीवनाचें पाहिलें तसेंच...भल्या माणसा...सांग...सांग... तरी सगळं समजावून...झोप उडून गेली.....'

' अनंता, तुला आधी बरं वाटूं दे....'

' बरं वाटायला नको मला....'

' असं नकोरे बोलूंस.... ! '

' तेंच चित्र सारखं डोळ्यापुढे आहे माझ्या....'

' तूं विचार करूं नकोस त्यावर. स्वस्त झोप....'

अनंत विश्वनाथ आपटेची समजूत घालून मी निघालों. परत शनिवारी किंवा रविवारी येण्याचें आश्वासन देऊन. अनंत विश्वनाथ आपटेच्या डोकेंदुखीला कोणतेंहि बाह्य कारण लागत नसे. विलक्षण विचार करण्याची सवय त्याला जडली होती. ज्या विचारांचा प्रत्यक्ष व्यवहारांत कांही उपयोग नाही, ज्या विचार-प्रश्नांचीं प्रत्युत्तरेंहि कधी मिळणार नाहीत असे विचार....त्या विचारांचा गोंधळ डोक्यांत माजला की, त्याची डोकेंदुखी सुरू होई. डोकेंदुखीच्या वृश्चिकदंशी वेदना सहन करण्याची सोशिकता अनंतामध्ये होती...त्या डोकेंदुखीचा त्रास कधी त्याने कुणाला दिला नाही...चुकून केव्हातरी एका संध्याकाळी तो विचार करीत बसला होता...तेव्हा वसुमतीने त्याला विचारलें,

' बरं नाही का ? '

आणि तो बोलून गेला, ' किंचित् डोकं दुखल्यासारखं वाटतं...मग वसुमतीने तो नको नको म्हणत असतांनासुद्धा खसखसून अमृतांजन चोळलें...अमृतांजनाच्या दर्पाने अनंत अधिकच तळमळला ... अमृतांजन चोळून कधी डोकेंदुखी बरी होते का ? असें म्हणून तिच्यावर तो चिडला....आपलं डोकं दुखत म्हणून सांगितलं तर ही अशी नेहमीच कपाळाला अमृतांजन चोळत जाईल किंवा सुंठ उगाळून त्याचा गरमगरम लेप कपाळावर थापत राहील....तेव्हापासून अनंताने आपली डोकेंदुखी आपल्या बायकोजवळ कधी बोलून दाखवली नाही. विलक्षण विचारांच्या वेदना असह्य झाल्या म्हणजे सरळ तो माझ्याकडे येत असे. आपले सगळे प्रश्न, सगळ्या शंका

तो माझ्याजवळ व्यक्त करीत असे. माझ्याकडून त्याच्या प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें त्याला कधी मिळत असें नव्हे, परंतु माझ्याजवळ मन मोकळें केल्याचें फार मोठें समाधान तो माझ्याकडून घेऊन जात असे.

अनंताने वेडगळ प्रश्न विचारले, म्हणून मला कधी त्याचा राग आला नाही. त्याची कधी चीड आली नाही, उलट त्याच्याविषयी वाटली तर मला सहानुभूतीच वाटायची... लहान मुलाच्या अजाणपणाने तो मला प्रश्न विचारी....तर मला कधी कधी असें वाटे की, अनंत विश्वनाथने व्यर्थ या विसाव्या शतकांतील यंत्रयुगांत जन्म घेतला. पांच हजार वर्षांपूर्वीच्या ऋषिमुनींच्या आध्यात्मयुगांत त्याने जन्म घ्यायला पाहिजे होता....आणि मग एखाद्या गुरुकुलांत गुरूची सेवा करतां करतां या प्रश्नांचीं उत्तरें शोधावयाला हवीं होतीं....एककली वृत्तीने राहणाऱ्या मित्राला थट्टेनेसुद्धा दुखवावयाचें नाही या जपणुकीच्या भावनेनेंच केवळ मी अनंताशी वागत होतों...एक शल्य माझ्या मनांत सारखें खुपत राही....एक दिवस अनंत विश्वनाथ आपटे वेडा तर होणार नाही ना ऽ ! बायकोच्या अंगाला स्पर्श करतांनासुद्धा ज्याने आपल्या मनाला पहिला प्रश्न केला....स्त्रीचा स्पर्श तरी कशाला हवा....आणि या प्रश्नाचें उत्तर मिळण्यापूर्वीच स्पर्शसुखाच्या धुंदींत जो गुंग होऊन गेला....सुखानंदाची धुंदी उतरल्यानंतर, 'इंद्रियांना अशी भूक तरी कां लागावी ?' याच विचाराने तो नुसता तळमळत राहिला....त्या अनंताला कधी तरी समाधान मिळेल का ? सुखाचें ताट समोर ठेवलेलें असतांनासुद्धा त्यांत कोणतें दुःख सामावलेलें आहे याचा शोध घेत बसणाऱ्या वेड्या माणसासारखी खरं म्हणजे अनंताची वृत्ति होती.... आनंदाने त्याचा चेहरा कधी उजळून आला नाही. समाधानाने त्याची वृत्ति कधी बहरली नाही. सुखानुभवांनी कधी तो मोहरून आला नाही.... नको त्या विचारांनी अस्वस्थ होऊन जाणें एवढेंच त्याचें खऱ्या अर्थाने जगणें आहे.

'माणसाने माणूस म्हणून जगायचें— अरे पण म्हणजे काय ?' असं अनंता मला अगदी कळवळून विचारीत असे. 'आणि माणूस तरी कोण ? कोठून आला हा माणूस ? कोणीं घडवला हा माणूस ? कोठे जाणार आहे हा माणूस ? आधी या प्रश्नांचीं उत्तरें तुम्हाला मिळालीं नाहीत. आणि जो उठला तो उपदेश करतो की माणसाने माणूस म्हणून जगलं पाहिजे. कबूल....अरे, पण म्हणजे काय ?'

अनंत विश्वनाथने कितीहि कळवळून विचारलें तरी त्याचें समाधान मी कसा करूं शकणार ? परंतु असे कांही प्रश्न त्याने मला विचारले म्हणजे मीहि उत्तर देण्याचा प्रयत्न करी. त्याचें समाधान करण्याकरितां कधी कधी माझ्या मदतीला उमरखय्याम धावून येत असे.... Flower that once has blown for ever dies... एकदा फुललेलं फूल कायमचं सुकून जातं...तसं आहे आपल्या जीवनाचं.... एकदा संपलं की संपलं.. म्हणून जगतों आहोंत तोवर सगळीं सुखं भोगून घ्यावयाचीं. काय समजलास... या प्रश्नांचा विचार करायचा तत्त्वज्ञांनी. आपण फक्त हसत-खेळत जीवन जगायचं....

'तेंहि खरं तूं म्हणतोस तें.... आपण सामान्य माणसं. हे प्रश्नच आपल्या बुद्धीला झेपणार नाहीत, पण आपला विचार आला मनांत म्हणून बोलून दाखविला.' असं दुखरं समाधान व्यक्त करून अनंत परत जात असे. पण पुन्हा चार-आठ दिवसांनी नवी शंका घेऊन उपस्थित होत असे.

अनंताचें स्वागत मी नेहमीच मोठ्या उत्सुकतेने करीत असे. त्याच्या शंका कशाहि असल्या, तरी त्यामुळे कित्येकदा माझ्या विचारांना खाद्य मिळत असे. तरुण माणसाची बुद्धि नेहमीच अशी चौकस असावी. ज्या प्रश्नाचें उत्तर मिळत नाही त्या प्रश्नावरच विचार करण्यांत एक प्रकारची मौज असते आणि अनंत विश्वनाथच्या सहवासांत कितीदा मला अशी मौज अनुभवतां आली. अनंता घरी आला म्हणजे आम्हा सर्वांनाच आनंद व्हावा. माझी आई तर नेहमी म्हणत असे, 'अनंता म्हणजे नुसता प्रेमळ आहे.' मी नसलों घरांत म्हणजे तो माझ्या आईशी खूप बोलत बसे. पुराणांतरीच्या मोक्ष-अध्यात्ममार्गांच्या कथा आईला सांगायचा. कदाचित् म्हणूनच आईला तो फार फार चांगला वाटायचा.... पण खरं म्हणजे मोठ्या माणसाशी गप्पा मारण्याचा छंदच होता त्याला. तो नेहमी म्हणायचा—मोठ्या माणसाशी बोलण्यांत एक फायदा असतो. त्यांचे बरे वाईट अनुभव आपल्याला कळतात आणि त्यांचे अनुभव लक्षांत घेऊन आपल्याला आपल्या जीवनाची घडण देतां येते...

असं शहाण्यासारखं बोलणारा माणूस वेडगळ प्रश्नांचा विचार कां करतो...अनंता असा कसा....जुन्या पिढींतल्या मोठ्या माणसांना फारसा मान न देण्याचीच माझी वृत्ति होती, पण अनंत आपटेने त्या वृत्तीला मुरड घातली....एकदा अनंताची रोजनिशी मला वाचावयास मिळाली. अगदी पहिल्याच पानावर त्याने लिहिलें होतें....वृद्ध आणि अनुभवी माणसें हीं आपल्या आयुष्यांत दीपस्तंभासारखीं असतात...

वाईट वाटत होतें तें एकाच गोष्टीचें की, त्या दीपस्तंभाच्या प्रकाशांतहि अनंत विश्वनाथ आपटे खोल खोल दरींतल्या गडद अंधारांत चाचपडल्यासारखा जगतो आहे....

माझी आई त्याला प्रेमाने अन्तुबाळ म्हणत असे. माझीं मुलं त्याला अन्ताकाका म्हणत...आणि माझी बायको त्याला अन्तु भावोजी म्हणत असे....आमच्या कुटुंबाशी असें त्याचें नातें जडलें होतें. वास्तविक अनंताला लोकांत फारसं मिसळावं असं कधी वाटत नसे. एकदा मीं त्याविषयी त्याला विचारलं.... तेव्हा तो मला म्हणाला, मी जितका लोकांत जास्त मिसळेन तितक्या माझ्या शंकाकुशंका वाढत जातील...आणि शंका वाढल्या की, मी अस्वस्थ होतों....मी सहज म्हटलं त्याला, ....'अरेऽ मग रानावनांत जाऊन एकांतांत राहण्याच्या युगांत कां नाही जन्माला आलास ? ....'खरंच तेंहि चुकलं....' तितक्याच सहजपणाने अनंता म्हणाला....अनेकदा त्याच्या बोलण्याची मला गंमत वाटायची...

आमच्या कुटुंबांत मात्र तो अगदी मोकळेपणाने वागत असे....

एकदा असं झालं, अनंताला डाळिंब्याची उसळ फार आवडायची. म्हणून आमच्या घरी त्याला आग्रहान बोलावलं. घरून जेवून आला होता, तरी आग्रहाने त्याला डाळिंब्या खायला दिल्या, पण डाळिंब्या खातां खातां त्याच्या मनांत प्रश्नांचा गोंधळ सुरू झाला आणि मध्येच तो माझ्या बायकोला म्हणाला, 'वहिनी, आता माझ्या एका प्रश्नाचं उत्तर द्या. याला डाळिंब्या कां म्हणतात... ?'

'अहो, त्या वालाच्या केलेल्या असतात....'

‘ पण त्याला उसळ कां म्हणूं नये ? डाळ कां म्हणूं नये ? ’

‘ भावोजी डाळ काय आणि डाळिंब्या काय ? अर्थ एकच, पदार्थ एकच....’

‘ मग मी तेंच म्हणतों....’

खरं म्हणजे अनंताला त्या क्षणीं काय म्हणायचं होतं हें त्यालाच कळलं नव्हतं.... माझ्या मात्र एवढं लक्षांत आलं कीं, प्रश्न-विचारण्याच्या वेडाची लहर या बहाद्दराला आलेली आहे. आता काय हवे ते प्रश्न तो विचारील....नको नको त्या वस्तूंचा, गोष्टींचा बादरायण संबंध जोडून देईल....अगदी निष्पाप वेडया माणसासारखा बोलूं लागेल....

माझ्याकडे पाहतच तो म्हणाला, ‘ अरेऽ! वहिनीला वाटतं हा प्रश्न अगदी सोपा आहे, पण नाही बरं....वहिनी हें तेवढं सोपं नाही.... माणूस....माणसाला माणूसच कां म्हणायचं ? या प्रश्नाइतकाच हा प्रश्न गहन आहे....खरं सांगायचं म्हणजे माणसाचं जीवन हें सर्वांत मोठं आणि महत्त्वाचं प्रश्नचिन्ह आहे....माणूस जन्माला येतो तेव्हाच परमेश्वर त्याच्या हातांत एक प्रश्नपत्रिका देतो ...आणि त्या प्रश्नांचीं उत्तरं त्याला जीवनांत द्यावयाचीं असतात.... काय आहे की नाही गंमत....!’

‘ गंमत होती खरी ती ...डाळिंब्या आणि माणूस यांचं समीकरण मांडू पाहणारा निष्पाप वेडा माणूस अनंत.. विश्वनाथ....आपटे.... तुमच्या डाळिंब्यांचा विचारसुद्धा जीवनांत महत्त्वाचा आहे ’ असं म्हणून वेडा माणूस स्वतःच्याच लहरींत मोकळ्या मनाने हसावा तसा आपटे डाळिंब्या खातां खातां हसला.... आणि आम्ही सारे त्याच्या हसण्याकडे कुतुहलाने पाहत राहिलों...

अनंताविषयी जितकं कुतूहल तितकीच त्याच्याविषयी मला विलक्षण भीति वाटत होती....कारण या अशा प्रश्नचिन्हांमुळे कित्येकदा त्याच्या संसारांत विचित्र परिस्थिति निर्माण होई...जन्मोजन्मीच्या दुखणेकऱ्याला जपावें तशी त्याची बायको त्याला जपत होती... कधी लहान मुलासारखी....कधी वेडया माणसासारखी....कधी अजाण बालकासारखी...

आपल्या नवऱ्याला आपण सदा आनंदी सुखी समाधानी पाहावें असें तिला वाटत होतें ...आणि त्यासाठी ती झटत होती... आपणच अपेशी म्हणून आपला नवरा असा दुःखी-कष्टी असतो. आपण केलेल्या अन्नाची चवहि त्याला गोड लागू नये याचें त्याच्या बायकोला अत्यंत दुःख होत असे....‘ त्यांत काय सांगायची चव...अन्नासारखें अन्न लागतें....’ हा एकमेव अभिप्राय त्याने कायमचा देऊन टाकला होता...आणि तो अभिप्राय वसुमतीच्या मनावर कायमचा कोरला गेला होता...कौतुक या शब्दाची ओळखच आपल्या पतीला नसावी याविषयी तिला अतोनात खेद होत असे...आपला नवरा आपल्याला हवी असणारी, आवडणारी साडी आणून देतो...हव्या असणाऱ्या रंगाचीं अन् सुगंधाचीं फुलं आपल्यासाठी घेऊन येतो.... पण आपल्या नेसूचें कधी त्याने कौतुक करूं नये...किंवा आपण माळलेल्या फुलांचा गंध त्याने कधी घेऊं नये....पतिदेवाच्या सगळ्या वृत्ति फुलून याव्यात म्हणून स्त्रीने सारा शृंगार करायचा....पण पतीने मात्र या साजशृंगाराविषयी कोणत्याहि प्रकारची उत्सुकता, रसिकता दाखवूं नये...संसार संसार म्हणतात तो काय फक्त वरण, भात, भाजी शिजविण्यापुरता आणि अन्नाचीं चार अक्षरें गिळण्यापुरता....

अनंत विश्वनाथ आपटेच्या संसारांत त्याची सालस पत्नी अशी तळमळत होती...तिने आपली तळमळ कधी कोणाजवळ बोलून दाखावली नसेल....परंतु जाळामधील धूर अदृश्य असला तरी जाणवावा तशी तिची तळमळ जाणवण्यासारखी होती ...शेजाऱ्या-पाजाऱ्यांना, नातेवाईकांना ती तळमळ जाणवली असेल....पण त्याची पुसटशी जाणीवसुद्धा अनंताला कधी झाली नाही.... आणि ही अंतर्यामीची तळमळ आपल्या नवऱ्याला कधी काळी कळूंच नये याची दखल वसुमतीने फार कौशल्याने घेतली होती.

वसुमतीची भोळी भाबडी श्रद्धा होती.... फार फार विचार करून आपल्या नवऱ्याची अशी वृत्ति झाली आहे असें तिच्या मनाने घेतलें होतें...आणि म्हणून आपलें दुःख विसरून आपण आपल्या नवऱ्याला जपलें पाहिजे...ही सवय तिने स्वतःला लावून घेतली....केव्हातरी अंबाबाईची कृपादृष्टि आपल्याकडे वळेल या श्रद्धेने ती सारें कांही करीत होती....अनंतासाठीं ती सोळा सोमवारांचें व्रत करीत होती....मंगळवारचा उपवास करीत होती....तुळशीला पाणी घालीत होती....शिकली सवरलेली मुलगी तुळशीला पाणी घालते याचें शेजाऱ्याला आश्चर्य वाटलें असेल....पण आपली आई तुळशीला प्रदक्षिणा घालीत असे....या आठवणीने वसुमतीला मोठा आधार दिला होता....वसुमती जितकी धीर गंभीर, तितकीच हळवी आणि भित्री होती....अनंत आपटेच्या संसारांत आपलं आवडीहौशीचं मन तिनं मारलं....आणि केवळ नवऱ्याच्या सावलीसारखीच त्याच्या संसारांत जगत होती. अनंताला फार फार जपत होती...

खरं म्हणजे तिच्या मनाने धास्ती घेतली होती....

एक दिवस असा विचित्र प्रसंग घडला अनंताच्या संसारांत....संध्याकाळी अनंता घरी

[ पान २२ वर चालू ]



२५१ सदाशिव पेठ, भावे स्कूलसमोर, पुणे २

# विधानसभेंतील चेहरे

**विधानसभा म्हणजे २६४ सदस्यांच्या चेहऱ्यांची सभा. त्यांत कांहीं सत्तारूढ पक्षाचे आणि कांहीं विरोधी पक्षाचे आहेत. त्यावरील भावाविष्कार विधानसभेच्या कामकाजाचें सहजगत्या दिग्दर्शन करतो. द्विभाषिक राज्यांत विधानसभा-गृहाचा चेहरा क्षुब्ध होता. महाराष्ट्रराज्यांत तो खुललेला आहे.**

**निरीक्षकाने न्याहाळलेले हे कांहीं चेहरे पाहण्यासारखे आहेत.**

**( लेखक–निरीक्षक )**

महाराष्ट्र विधानसभेचे एक नामवंत सदस्य श्री. विष्णुपंत चितळे यांच्या अकाली मृत्यूमुळे मनांत विचारांचें काहूर उठलें. काहूर अशासाठी की, ज्यांच्या योगाने विधानसभेच्या कामकाजाला विशिष्ट दर्जा प्राप्त झाला होता अशांपैकी श्री. चितळे हे एक होते. महाराष्ट्राच्या राजकीय जीवनांत सुमारे ३० वर्षें कणखरपणे वावरणारा धडाडीचा कार्यकर्ता विधानसभेंत जाऊन बसल्याने विधानसभीय कामकाजांतील बारकाव्याबरोबरच राजकीय धोरणीपणाचाहि लाभ सभागृहाला होत असे. राजकारणाची समज असणारे फार थोडे कार्यकर्ते आज विधानसभेंत आढळतात. अशा स्थितींत श्री. चितळे यांच्या मृत्यूने या उणीवेची तीव्र जाणीव व्हावी, हें स्वाभाविकच होय.

पूर्वी द्विभाषिक राज्य असतांना पंढरपूरचे भाई राऊळ यांच्या आकस्मिक मृत्यूचे वेळीहि मनांत अशीच एक वावटळ उठून गेली होती. भाई राऊळांसारखे सामान्य माणसाच्या जीवनाशी समरस झालेले आमदार अधिक काळ जगावेत असें वाटतें. विशेषतः त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेवर निवडून आलेले श्री. पटवर्धन वकील हे वर्षातून षटीषण्मासीं सभागृहांत दिसत असल्याने राऊळांची जागा रिकामीच आहे असें वाटतें. पण राऊळ आणि चितळे यांचे चेहरे पुन्हा दिसणार नसले तरी सभागृहांत एकूण २६४ चेहरे आहेत आणि त्या प्रत्येक चेहऱ्यावर कांहीं वेगळा भाव आहे. त्यांत केवळ भाव खाणारे, मुळीच भाव नसलेले, आपला भाव लपवून ठेवणारे, लोकांनी आपल्याला भाव दिलाच पाहिजे अशा तोऱ्यांत वागणारे आणि मिळत असलेला भाव बाजूला टाकणारे असे अनेक प्रकारचे चेहरे सापडतील.

### रुबाबदार चेहरा !

पण सर्व चेहऱ्यांत रुबाबदार चेहरा कोणता असें विचाराल, तर तो सभापति श्री. सिलम यांचा. कल्लेदार मिशा आणि खणखणीत आवाज यामुळे प्रथमदर्शनीच त्यांची छाप पडते. सभागृहांत शाब्दिक चकमकीचे किंवा अक्षरशः वाग्युद्धाचे अनेक प्रसंग येऊन गेले. ( अनेकदा ' निरीक्षका'च्याहि सहनशीलतेचा अंत झाला. ) पण सभापति श्री. सिलम यांनी या प्रत्येक प्रसंगीं सभागृहाची प्रतिष्ठा शर्थीने सांभाळली आहे. कधी त्यांनी विरोधी पक्षाच्या सभासदांना ' रुळावर ' आणलें, तर कधी सरकार-पक्षाच्या मातबर मानकऱ्यांना ' कानपिचक्या ' दिल्या, कधी चेंबरमध्ये बोलावून सल्ला दिला तर कधी रोखठोक ' रुलींग ' दिलें. आजहि अनेकदा असे प्रसंग येतात आणि अशीच निर्भीड वृत्ति आजहि दिसून येते, पण यापेक्षाहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे विधानसभेचें स्वायत्त सचिवालय उभें करून त्यांनी संसदीय लोकशाहीची मेढ पक्की रोवण्याचा प्रयत्न केला आहे, त्यामुळे महाराष्ट्र विधानसभेच्या इतिहासांत श्री. सयाजीराव सिलम यांची सभापतिपदाची कारकीर्द फार महत्त्वाची मानली जाईल यांत शंका नाही.

### विधानसभेंतील त्रिमूर्ति

१९५७ ते १९६२ या काळांतील मुंबई विधानसभेच्या इतिहासांत कोणत्या चेहऱ्यांची प्रामुख्याने नोंद राहील असा प्रश्न विचारून पाहण्यासारखा आहे. क्रम लावणें कठिण असलें तरी संख्या एका हाताचे बोटांवर मोजण्याइतकीच आहे. यशवंतराव चव्हाण आणि एस्. एम. जोशी. डॉ. जीवराज मेहता आणि दत्ता देशमुख या चार नावांपलीकडे येवढ्या तोलाचें नांव सापडणें कठिण वाटतें. यांपैकी यशवंतराव आणि जीवराज भाई यांचे चेहरे यशस्वी राज्यकर्त्यांचे असून एस्. एम्. व दत्ता देशमुख यांचे चेहरे यशस्वी विरोधकांचे आहेत. या चारांपैकी कोणीहि बोलावयास उभा राहिला की, सभागृहाचे कान काळजीपूर्वक शब्द टिपून घेत ! ( आता जीवराजभाई गुजराथ राज्यांत गेले आहेत. ) पण यशवंतराव, एस्. एम्., दत्ता यांचे चेहरे म्हणजे सभागृहाची शान होय. विरोधकांच्या आक्षेपांचा आणि सूचनांचा निराग्रही मनाने विचार करणारा समंजस असा मुख्यमंत्री ( आणि सभागृहाचा नेता ), सत्तारूढ पक्षाच्या मनांतील नैतिक प्रेरणांना आवाहन करीत करीत विरोधाची धार तीक्ष्ण करणारा सौजन्यशील विरोधी नेता आणि सरकारी कारभाराची डोळ्यांत तेल घालून सदैव छाननी करणारा सभासद या ' त्रिमूर्तीत ' सामावलेले आहेत. भारतांतील इतर प्रांतिक विधानसभांच्या तुलनेंत महाराष्ट्र विधानसभा कांकणभर सरस ठरली तर त्याचें श्रेय सभापति श्री. सिलम, मुख्य मंत्री श्री. चव्हाण, श्री. एस्. एम्. जोशी

## मुरणारें पाणी

नवी घेतली छत्री सुंदर साध्या दांड्याची ।
पहिल्या वहिल्या मृगसरींत ती भिजे एकदाची ॥
लागे पुन्हा उघडाया मी, यत्न व्यर्थ गेला ।
दिसून आला छत्रीचा त्या दांडा फुगलेला ॥

* * *

राजछत्र ज्या आधारावर उभारलें जातें ।
पाणी तेथे मुरूं लागतां छत्र निकामी होतें ! ॥

— भाग्यवन्त

आणि श्री. दत्ता देशमुख यांनाच होय.

### मुखस्तंभ व बोलघेवडे

पण हीं चारहि माणसें फार क्वचित बोलतात. सतत बोलणारे चेहरे वेगळेच आहेत. ' मिनिस्टर ' झाल्यावर फक्त आपल्या खात्यापुरतेंच बोलतां येतें, इतर विषयांवर बोलतां येत नाही. तसें नसतें तर श्री. भारदे ' सर्वांत जास्त बोलणारे मंत्री ' म्हणून प्रसिद्ध पावले असते. कॉंग्रेस पक्षांतील बॅ. धारिया, श्री. पी. जी. खेर, श्री. महादेवराव ठाकरे आदि सभासद नेहमी बोलणाऱ्यांपैकी म्हणतां येतील. पण त्यापैकी कोणीहि सभागृहावर स्वतःची छाप पाडूं शकलेला नाही. मुंबईतील एक सदस्य श्री. ईश्वरभाई पारीख हे मधून मधून अस्खलित इंग्रजींत बोलतात आणि त्यांची छापहि चांगली पडते. श्री. साकी नियाझी व श्री. हफीजखां या कॉंग्रेसमधील दोन मुस्लिम सभासदांचे चेहरे एकमेकांशी मुळींच जुळत नाहीत ! अर्थमंत्री श्री. वानखेडे यांचा आशावाद वायफळ आहे, या जाणीवेने साकी नियाझी बेचैन होतील, पण हफीजखां यांना बेचैनी फक्त तेव्हाच येते की, जेव्हां मुस्लिम जमातीच्या हितानहिताचा संबंध येईल ! नाना जेधे हे औरंगाबादेहून विधानसभेवर आलेले. अनेकदा ते बोलतात, पण त्यांत गांभीर्य फार कमी असतें. विरोधी पक्षांतील मराठवाडा विभागांतील आमदारांच्या ' आंतल्या गोष्टी ' मात्र ते रंगवून सांगतात, पण कॉंग्रेस पक्षांतील ' बोलघेवड्या ' आमदारांची तक्रार अशी की, त्यांच्या भाषणांना वृत्तपत्रें पुरेशी प्रसिद्धी देत नाहीत !

### प्रा. वर्टींचा दरारा

हें कांही अंशीं खरें आहे, कारण सरकारी भूमिका मंत्र्यांच्या तोंडून कळल्यावर त्याच धोरणाची री ओढणारीं भाषणें बरींचशीं ' शिळीं ' होतात. या उलट विरोधी पक्षांतील भाषणांत कांहींना कांहीं ' सनसनाटी ' प्रकार असतो. सरकार-पक्षाच्या धोरणांतील व कारभारांतील दोष-दिग्दर्शन कोणी करूं लागला तर त्यास वाजवीपेक्षा अधिक प्रसिद्धी मिळते. अर्थात् अनेकदा या टीकेंत तथ्य असतें. विशेषतः प्रा. वर्टी ( प्र. स. पक्ष ) हे जेव्हा अंदाजकपत्रकावर किंवा इतर कोणत्याहि विषयावर बोलावयास उभे राहतात, तेव्हा सर्व श्रोते कान टवकारून बसतात. वर्टी दहा मिनिटेंच बोलले, तरी मुख्यमन्त्र्यांसकट सर्वांना त्यांची दखल घ्यावी लागते. प्रसन्न चेहऱ्याचा, सडपातळ शरीरयष्टीचा आणि मध्यम उंचीचा हा माणूस जेव्हा सभागृहांत उजव्या पायावर अधिक जोर देऊन उभा राहतो ( आणि सरकारपक्षाला आव्हानपूर्वक कांही विचारूं लागतो ) तेव्हा सरकारपक्षाचें धाबेंच दणाणतें ! कारण वर्टी यांचें आव्हान झेलणें सोपें काम नाही, हें श्री. यशवंतरावदेखील मोकळ्या मनानें मान्य करतील असें वाटतें. विरोधी पक्षांतील श्री. बर्धन ( कम्युनिस्ट ) यांची जिव्हा फारच तिखट आहे. अर्थात् तिखटपणांत आणि सांसदीय कौशल्यांतहि त्यांच्यावर मजूरमंत्री श्री. शांतिलाल शहा हे अनेकदा मात करतात, पण श्री. बर्धन यांनी आपलें उपहासाचें शस्त्र परजल्यावर सरकारपक्षाची चांगलीच तारांबळ उडते यांत शंका नाही. विशेषतः मजुरांच्या प्रश्नावर बर्धन-शांतिलाल शहा यांच्या चकमकी मोठ्या श्रवणीय-प्रेक्षणीय होतात ! कधी कधी कोणीच कोणाला हार जात नाही. व्ही. डी. देशपांडे, श्री. उद्धवराव पाटील, काकासाहेब वाघ, संतराम, पाटील, श्री. हुंडे हे सभासद कधी प्रभावी ठरतात तर कधी निष्प्रभ ठरतात, पण एकंदरीत ' बोलणाऱ्यां 'मध्ये त्यांची गणना होते. सध्या विरोधी पक्षाचे नेते असलेले श्री. भंडारे यांनी इंग्रजीऐवजी मराठी भाषेचा उपयोग केला आणि मोजक्याच विषयावर बोलावयाचें ठरविलें तर ते चांगलें नांव मिळवूं शकतील, पण बी. सी. कांबळे यांची बरोबरी कांही ते करूं शकणार नाहीत ! त्यांनी प्रश्नांमागून प्रश्न विचारून एके काळीं मुरारजीभाईंची जी त्रेधा उडविली होती, तिच्या आठवणी विधनासभेच्या परिसरांत आजहि ऐकावयास मिळतात.

### प्रश्न विचारणारे व उत्तर देणारे

आजकाल असे प्रश्न विचारणारे दिसत नाहीत. लेखी उत्तराची अपेक्षा असलेले प्रश्न सर्वांत जास्त कोण विचारतो याचा अंदाज घ्यावयाचा झाला तर श्री. शिवरकर यांचें नांव घ्यावें लागेल. मात्र आता त्यांनी कॉंग्रेसप्रवेश केला असल्याने त्यांचे प्रश्न कमी झाले असावेत ! पण प्रश्नोत्तराच्या तासाचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याचे दृष्टीने पद्धतशीर प्रयत्न करणारे फारच थोडे सापडतील. अशांमध्ये श्री. रामभाऊ म्हाळगी आणि श्री. टी. एस्. कारखानीस यांचीं नांवें प्रामुख्याने घ्यावीं लागतील. आपला प्रश्न सरकारदरबारीं पोचतांच आवश्यक ती हालचाल सुरू होते, असा या दोघांहि सदस्यांचा अनुभव आहे ! अर्थात उपप्रश्नांचा भडिमार करून सरकारपक्षाचा ' भंडाफोड ' करणाऱ्यांमध्ये प्रा. वर्टी, श्री. बर्धन, श्री. व्ही. एन्. पाटील प्रभृतींचीं नांवें प्रामुख्याने घ्यावीं लागतील. हजरजबाबीपणांत शांतिलाल शहा आणि यशवंतराव चव्हाण यांची बरोबरी कोणीच करूं शकत नाहीत ! किंबहुना त्याबद्दल एखाद्या उपप्रश्नास बगल द्यावी की टांग द्यावी की खांदा द्यावा हें या दोघांना अचूक समजतें ! कधी केवळ हसण्यावारी नेऊन, कधी आवाज चढवून, तर कधी चक्क तोंड बंद ठेवून उपप्रश्नांचा निकाल लावून टाकण्याची त्यांची हातोटी उल्लेखनीय आहे;

पण या दोघांनाहि एस्. एम्. जोशी आणि दत्ता देशमुख हे पुरून उरतात!

काय असेल तें असो, पण प्रश्नोत्तराच्या वेळीं एस. एम्. जोशी किंवा दत्ता देशमुख हे जर अटीतटीला पेटले तर सरकारपक्षाचें कांहीतरी चुकलें आहे, असा समज सभागृहांत पसरतो. इतकेंच नव्हे तर, सरकारलाहि या दोघांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची दखल अखेरीस घ्यावीच लागते.

## आत्मनिरीक्षण होतें आहे

असें भाग्य फारच थोडयांच्या वांट्याला येतें. तसेंच पाहिलें तर प्र. स. पक्षाचे रामभाऊ तुपे, जनसंघाचे श्री. रामभाऊ म्हाळगी, लालनिशाण गटाचे श्री. संतराम पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे श्री. इंडे किंवा वसंतराव राऊत किंवा रिपब्लिक पार्टीचे श्री. ए. जी. पवार हे अनेकदा उपयुक्त सूचना करतात, पण सरकार त्यांची योग्य ती दखल घेत नाही, कारण त्यांच्या शब्दाला तेवढें वजन अद्याप प्राप्त झालेलें नाही. सामाजिक व राजकीय कार्याची तपस्या पाठीशीं असल्याशिवाय शब्दाचेंहि मोल वाढत नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत निवडून आलेल्या एका 'नवशिक्या' आमदाराने निरीक्षकांजवळ एकदा प्रांजळपणें असे उद्‌गार काढले की, '**विधानसभेंत येऊन बसण्यासाठी अधिक पात्रता अंगी हवी.**' असा **आत्मनिरीक्षणाचा प्रवाह सुरू व्हावा हीहि कांही कमी महत्त्वाची बाब नव्हे.** अर्थात् याचा अर्थ असा नव्हे की, सभागृहांत प्रवेश करणारा हा अगदी अनुभवीच हवा. श्रीमती विमलाबाई बागल किंवा डॉ. अंजनाबाई मगर यांनी सभासदत्व प्राप्त झाल्यानंतर आपली योग्यता परिश्रम करून वाढविली आहे यांत शंका नाही. याशिवाय करुणाबाई चौधरी आणि शान्ताबाई कोटेचा या दोन मराठवाडयांतील महिला आपल्या भागाची गान्हाणीं सभागृहापुढे ठेवण्याचा प्रयत्न करतात इतकेंच!

## मैदानी वक्ता विधानसभेंत पराभूत

महाराष्ट्र विधानसभेंत हास्यविनोदाचे फवारे उडविणारे सभासद मात्र जवळजवळ नाहीतच! जुन्या मध्यप्रदेश विधानसभेंत अशा किमयेसाठी प्रसिद्ध पावलेले साकी नियाझी इकडे मौनव्रत धारण करते झाले आहेत. त्यामुळे विनोद किंवा खोडकर कोट्या या केवळ योगायोगानेच ऐकावयास मिळतात. आचार्य अत्रे म्हणजे 'मूर्तिमंत विनोद' अशी सर्वत्र समजूत, पण सभागृहांत ते बोलूं लागले म्हणजे त्यांची कीव येते! मैदानी सभा जिंकणारा हा वक्ता सभागृहाच्या व्यासपीठावर पूर्णपणें पराभूत झाला आहे, हें त्यांनी ओळखलें आहे आणि म्हणूनच ते सभागृहांत फारच क्वचित उपस्थित होतात! सभागृहांत क्वचित उपस्थित राहणारा आणखी एक सभासद म्हणजे अमरावतीचे श्री. पी. के. देशमुख. खेडवळ दिसणारा हा माणूस काय बोलणार या समजुतीने श्री. होमी तल्यारखान यांनीं आपल्या प्रतोदपदाच्या तोऱ्यांत त्यांना एकदा भाषणाची परवानगी नाकारली होती. पुढे दुसऱ्या एका प्रसंगीं त्यांना बोलण्याची संधि मिळाली आणि त्यांनी सतत ४० मिनिटें सभागृहाला अस्खलित इंग्रजी वक्तृत्व ऐकविलें! अर्थात् तल्यारखान चाट पडले! प्रतोद चांगला अनुभवी नसेल, धोरणी नसेल, तर सभागृहांत पक्षाची प्रतिष्ठा खालावत जाते. दुर्दैव हें की, या दुष्परिणामाची क्षिति ना सत्तारूढ पक्षाला आहे ना विरोधी पक्षाला!

## काम करवून घेणारे आमदार

कधी कधी वाटतें, 'गर्जेल तो पडेल काय नि बोलेल तो करील काय' हेंच खरें, सभागृहांत एकहि शब्द न उच्चारलेले पण आपापल्या मतदार क्षेत्रांतील लोकांच्या अडीअडचणी दूर करण्याचा प्रयत्न नेटाने करणारे अनेक आमदार आढळतात. अर्थात् अशा आमदारांची संख्या सत्तारूढ पक्षांत अधिक असते! कारण पटकन् मंत्र्यांच्या कानी लागून ते आपलीं कामें उरकून घेतात. तशाच स्वरूपाच्या कामासाठी कधी कधी विरोधी पक्षाच्या आमदारांना मंत्र्यांच्या कार्यालयाचे उंबरठे अक्षरशः झिजवावे लागतात. अर्थात् महाराष्ट्र राज्य झाल्यापासून सत्तारूढ पक्ष व विरोधी पक्ष यांत पूर्वीपेक्षा अधिक खेळीमेळीचें वातावरण निर्माण झालें आहे आणि त्याचा सुपरिणाम हळूहळू सर्वच व्यवहारावर होण्याची शक्यता आहे.

## खरीं ताकतीचीं माणसें!

गाजावाजा न करतां कार्य करणारे आमदार हीच खरीं ताकदीचीं माणसें! सांगलीचे श्री. वसंतराव पाटील, जळगांवचे श्री. अप्पासाहेब भिरूड, प्र. स. पक्षाचे श्री. एस्. एम्. जोशी, कम्युनिस्ट पक्षाचे श्री. चितळे किंवा शे. का. पक्षाचे श्री. उद्धवराव पाटील यांचीं नांवें या संदर्भांत घेतां येण्याजोगीं आहेत. विरोधी पक्षांतील हीं माणसें निदान थोडें तरी बोलतात व श्री. वसंतराव पाटील किंवा श्री. अप्पासाहेब भिरूड हे पब्लिक अकाउंटस् कमिटीचे चेअरमन झाल्यापासून रिपोर्ट सादर करण्यापुरते तरी बोलतात. पण श्री. पाटील यांचें तर एकहि भाषण सभागृहांत झाल्याचें आठवत नाहीं. पण या दोघांहि सभासदांच्या शब्दाला कोणाहि मंत्र्याच्या शब्दापेक्षा अधिक मान आहे! श्री. पाटील यांनी अत्यंत धीमेपणाने आणि चातुर्याने सांगली जिल्ह्याचा कायापालट घडवून आणला आहे आणि श्री. अप्पासाहेब भिरूड म्हणजे कायदेकानून जाणणारे खंबीर सभासद. पब्लिक अकाउंट्स् कमिटी, एस्टिमेट्स कमिटी आणि रूल्स कमिटी यामध्ये त्यांनी 'थंड डोक्या'ने केलेलें कार्य बहुमोलाचें ठरलें आहे, पण या दोघांहि सभासदांची माहिती सर्वसामान्य लोकांना कितीशी आहे? (आपल्या भागांत दोघेहि चांगलेच प्रसिद्ध आहेत.)

असें होतें याचें कारण हें की, ज्याला 'लॉबीइंग' म्हणतात तो प्रकार आपल्याकडे अद्याप विकसित झालेला नाही. विधानसभेच्या परिसराला लॉबी म्हणतात. आणि या लॉबींत बसून गप्पागोष्टी करीत करीत माहिती काढणें किंवा पुरविणें मतपरिवर्तन करणें किंवा मतप्रतिपादन करणें, एखादें राजकारण घडविणें किंवा मोडणें आदि प्रकार करणें म्हणजे लॉबीइंग! वृत्तपत्रांना ज्या महत्त्वाच्या राजकीय बातम्या मिळतात त्यांचा उगम बहुधा अशा गप्पागोष्टींतच असतो. अर्थात हळूहळू 'लॉबी' वाढते आहे हेंहि सांगितलें पाहिजे. 'औद्योगिक शांततेचा तह' किंवा 'राजकीय पक्षांची आचारसंहिता' आदि कल्पनांचीं बीजें 'लॉबीइंग'मध्ये सापडण्याची शक्यता आहे.

पण आमदार मंडळी सभागृहाच्या (आणि सभागृहाच्या परिसराच्या) बाहेर कशी

**विधानसभेंतील ‘ विळे-भोपळे ’**

महाराष्ट्र विधानसभेंत केवळ ‘ विळ्याभोपळ्या’चेंच सख्य असलेले आमदार व मंत्री आहेत.

पहिली जोडी आहे पाटकर-शांतिलाल शहा यांची आणि दुसरी जोडी आहे भागवत-भारदे यांची.

गेल्या तीन-चार वर्षांत जेव्हा जेव्हा पाटकरांनी सभागृहांत तोंड उघडलें, तेव्हा तेव्हा त्यांनी शांतिलाल शहा यांचेवर हल्ला चढविला आहे आणि ‘ निरीक्षका’ला दिसलें आहे की, श्री. भागवत हे केवळ सहकार मंत्री श्री. भारदे यांचेवर ताशेरे झाडण्यासाठीच तोंड उघडतात.

योगायोग असा कीं, पाटकर आणि भागवत हे दोघेहि कम्युनिस्ट आहेत !

वागतात, आपला मतदारसंघ कसा जोपासतात हाहि फार महत्त्वाचा भाग होय, कारण विधानसभेंतील चेहऱ्यांचा उथळपणा वा खोलपणा त्यावरच अवलंबून असतो. जो सभासद आपल्या मतदारसंघाशी एकजीव झाला. तो एका वेगळ्याच डौलांत सभागृहांत वावरत असतो, पण त्याने संपूर्ण राज्याचा विचार मनांत घोळविल्याशिवाय त्याच्या शब्दाला वजन “ प्राप्त होत नाही. लांच्याचे आठल्ये गुरुजी आपल्या मतदारसंघाशी एकरूप झाले आहेत, पण या बाबतींत त्यांच्यापेक्षा कमी काम केलेला एस्. एम्. जोशी यांच्यासारखा अखिल भारतीय दृष्टीचा सभासद आठल्ये गुरुजींपेक्षा सभागृहांत अधिक प्रभावी ठरतो. कांही सभासद वृत्तपत्रें चाळून लोकांच्या अडचणींची दखल घेण्याचा प्रयत्न करतात, तर कोणी, लोक अडचणी घेऊन घरी आले तरी त्यांच्याकडे ढुंकून पाहत नाहीत ! अर्थात अशा सभासदांना परत निवडून येणें कठीण जात असलें पाहिजे यांत शंका नाही.

**चेहरा कोणता, मुखवटा कोणता ?**

विधानसभेंतील चेहऱ्यांचें दर्शन वारंवार घडत असल्याने निरिक्षकांच्या मनांत कांही शंका उत्पन्न झाल्या आहेत. पहिली शंका ही की, ज्याला आपण चेहरा म्हणतों तो मुखवटा तर नाही ना ? आणि सत्तारूढ पक्षाचा एक व विरोधी पक्षाचा एक अशा दोनच प्रकारचे मुखवटे उपलब्ध आहेत की काय ? दुसरी शंका ही की, सभासदांच्या मूळ चेहऱ्यापेक्षा या मुखवट्यांची प्रतिष्ठा अधिकच वाढली आहे की काय ? अखेरीस प्रश्न पडतो चेहरा महत्त्वाचा की, मुखवटा महत्त्वाचा ? का हे सगळेच बिनचेहऱ्याचे आहेत ?

एक संभाव्य उत्तर असें की, चेहरा आणि मुखवटा वेगवेगळा आहे, पण सभासदच मुखवटा उतरवून ठेवावयास तयार नाहीत ! ( त्या मुखवट्यांआड दडलेले चेहरे पाहूं म्हटलें तरी पाहतां येत नाहीत हें खरें दुखणें आहे. )

**२६४ स्नायूंचा चेहरा !**

आणि खरें म्हणाल तर, सभागृहांतील या चेहऱ्यांना सभागृहाव्यतिरिक्त अस्तित्व नाही. सभागृहाच्या चेहऱ्याचे स्नायु म्हणजे हे २६४ चेहरे ! या स्नायूंची जशी कमी-जास्त, जलद-सावकाश हालचाल होईल, तशी सभागृहाची चेहरेपट्टी खुलते किंवा क्षुब्ध होते. त्यामुळे द्विभाषिक राज्यांत सभागृहाचा चेहरा क्षुब्ध होता. आणि महाराष्ट्र राज्यांत तो खुललेला आहे.

आणखी वर्षभरांत विधानसभेंतील कांही जुने चेहरे जाऊन कांही नवे चेहरे येतील. हे चेहरे कसे असतील ? साचेबंद मुखवटे वेळ-प्रसंगीं फेकून देण्याचें धैर्य त्या चेहऱ्यांमध्ये असेल काय ? आणि या नवीन चेहऱ्यांच्या योगाने सभागृहाचा चेहरा अधिक उमदा व तजेलदार दिसेल काय ? असे अनेक प्रश्न मनांत येताहेत. अर्थात् याचा निर्णय जनता-जनार्दनाचेच हातीं आहे. त्याला जे चेहरे आवडतील, मान्य होतील किंवा आवश्यक वाटतील तेच चेहरे सभागृहांत दिसूं लागतील; म्हणून इतकेंच म्हणावेंसें वाटतें की, विधान-सभेंतील चेहरे म्हणजे लोकांच्याच चेहऱ्याची बहुरंगी आणि बहुढंगी प्रतिबिंबें !


विधानसभा म्हणजे आमच्या लोकजीवनाचा आरसाच होय !

● ● ●



**“ पाकीट नको, घड्याळ नको. तेवढी छत्री मुकाट्याने माझ्या हवाली कर.**

# यंत्रें येती घरा





संपादक—दि. वा. मोकाशी

लेखक—शामकांत देशपांडे

देओरा वॉच सर्व्हिसेस, पुणे २.

[ मागील अंकांत रेडिओविषयी माहिती देण्यांत आली होती. या अंकांत घड्याळासंबंधी सांगणार आहोंत. ]

## घड्याळ विकत घेतांना काय पाहावें ?

गजराचें घड्याळ घ्यावयाचें असेल तर तें भारत, अमेरिकन किंवा जर्मन यापैकी घ्यावें. त्याचे आकडे व काटे रेडिअमचे म्हणजे काळोखांत दिसणारे असावेत. चांगलें घड्याळ कोणाचें अशी देशवारी केलीच तर भिंतीवरचें घड्याळ भारतीय, किंवा जपानी, रिस्टवॉच स्वित्झर्लंडचें, चायमिंग क्लॉक जर्मनीचें व टाईमपीसहि जर्मनीचें असें सांगतां येईल. रिस्टवॉच किंवा टाईमपीस यांचें आयुष्य दहा वर्षें धरलें जातें. त्या हिशेबानें पुन्हा दहा वर्षांनी दुसरें घड्याळ घेतां येईल या अंदाजानें पहिलें घड्याळ किती किमतीचें घ्यावयाचें हें ठरवावें. रिस्टवॉच साधारणतः कमींतकमी शंभर रुपये किमतीचें असावें. शंभर रुपयांचे आंतील स्वीस मेकचें घड्याळ चांगलें असलें तरी टिकण्यास वाईट असतें. जर्मन रिस्टवॉच स्वस्त असून टिकाऊ असतें. ज्युएल्स असलेलें घड्याळ उत्तम. पिन पॅलेटचें घड्याळ घेतांना स्वस्त वाटतें, पण पुढे दुरुस्ती करतांना पांढरा हत्ती ठरतें. व विकतांनाहि किंमत येत नाही. प्रसिद्ध मेकचीं घड्याळें घ्यावीत. त्यांचे सुटे भाग सहज मिळतात. तसेंच घड्याळ मोठ्या आकाराचें घ्यावें. तें जास्त टिकाबू व दुरुस्तीस सोपें जातें. त्यामुळे दुरुस्तीचा खर्च कमी येतो.

तिथि, वार, तारीख, वर्ष अशा अनेक गोष्टी दाखवणारें घड्याळ कौतुक म्हणून ठेवावें, पण रोज वापरास तें उपयोगी नाही. तें टिकाबू नसतें. घड्याळ जेवढें साधें तेवढें चांगलें.

सोन्याचें ( गोल्ड प्लेटेड ) घड्याळ घेतांना वीस मायक्रॉनचें घ्यावें. घड्याळाचा सोनेरी मुलामा घामानें जातो. यासाठी घड्याळ घेतांना बॅकप्लेट किंवा प्लॅस्टीकचें झाकण मिळतें तें घ्यावें.

### ज्यूएल्स

ज्यूएल्स कमी-जास्त असण्यावर घड्याळाची किंमत ठरत नाही. ज्यांत चांगलें मशीन तें घड्याळ उत्तम. खरोखर पाहिलें असतां घड्याळांत सतरा ज्यूएल्स लागतात, पण आकर्षण म्हणून एकवीस, पंचवीस, ज्यूएल्स अशा जाहिराती केल्या जातात. तिकडे लक्ष देऊं नये.

### शॉकप्रुफ, वाटरप्रुफ घड्याळें

शॉकप्रुफ याचा अर्थ धक्का झेलणारें असा आहे. शॉक म्हणजे विजेचा धक्का नव्हे. शॉकप्रुफ घड्याळ म्हणजे बॅलेन्स व्हीलच्या आंसाला धक्का बसूं नये यासाठी केलेली सोय. बाकीच्या भागाला धक्का बसून कांही फारशी भीति नसते. शॉकप्रुफ घड्याळ असलें तरी तें फार उंचीवरून पडून उपयोगी नाही. तीन-चार फूट उंचीवरून तें पडलें असतां मात्र कांही होत नाही.

उत्तम प्रतीचीं घड्याळेंच खरीं वॉटरप्रुफ असतात. बाकीचीं घड्याळें वर जरी तसें लिहिलेलें असलें तरी पूर्ण वॉटरप्रुफ नसतात. तबकडीची काच, मोगरा, व मागचें झाकण या तीन ठिकाणांतून घड्याळांत पाणी जातें. त्यासाठी या तीनहि ठिकाणी रबर वॉशर्स बसवलेले असतात. पावसाळ्यापूर्वी हे वॉशर्स घड्याळजीकडून तपासून घ्यावे.

## घड्याळाची जपणूक कशी करावी ?

### ( अ ) रिस्ट वॉच

१—रिस्टवॉच ठेवण्यास लहान डबी करावी. घरीं येतांच मऊ फडक्यानें घड्याळ पुसून ठेवावें.



# अनुशासन

एकदा मराठ्यांचा राजकीय वकील आणि इंग्रज गव्हर्नर एल्फिन्स्टनसाहेब हे दोघे मुंबईच्या समुद्र-किनाऱ्यावर सहज फिरावयास गेले. साहेबाबरोबर एक इंग्रज शिपाई व वकिलाबरोबर एक मराठा शिपाई होता. बोलतां बोलतां वकिलाने साहेबास विचारलें,

" साहेब, तुम्ही मुठभर इंग्रज लोक इतक्या दुरून आमच्या देशांत येतां. इथली हवा तुम्हाला प्रतिकूल आहे. इथल्या भाषा आणि मुलूख तुम्हाला अगदी अनोळखी असतो. तुमचें सैन्यहि आमच्यापेक्षा अगदी कमी असतें आणि तरीहि तुम्हालाच सदैव विजय कां मिळतो ? आम्ही लोक संख्येने प्रचंड, अतिशय शूर आणि सर्व बाबतींत संपन्न असूनहि आमच्याच देशांत आम्ही पराभूत कां होतों ? "

यावर साहेब हसला. त्याने कांहीच उत्तर दिलें नाही. परंतु त्याने आपल्याबरोबरच्या इंग्रज शिपायाला व वकिलाबरोबरच्या मराठा शिपायाला समुद्रतीरावर एका एका जागीं उभें राहण्यास सांगितलें. त्याप्रमाणे ते दोघे शिपाई उभे राहिले. वेळ भरतीची होती. सागरलाटा जोराने फोफावत तीरावर येत होत्या. पाणी सारखें चढत होतें. लाटा जशा जशा जवळ येऊं लागल्या तसा तसा मराठा शिपाई मागे मागे सरकूं लागला ! आणि मांड्यां-पर्यंत पाणी चढलें तरीहि तो इंग्रज शिपाई मात्र जागच्याजागी ताठ उभाच राहिला ! तो अजिबात हलला नाही की त्याने मागे वळूनहि पाहिलें नाही. मराठा शिपाई मात्र शंभर पावलें मागे हटला होता. वकील आणि साहेब दोघेहि हें दृश्य पाहत होते. साहेब म्हणाला,

" समजलं वकीलसाहेब, आम्ही विजयी कां होतों आणि तुम्ही पराभूत कां होतां तें ? "

वकिलाने मान खाली घातली !

—व. मो. पु.

२—पावसांत, पोहतांना, स्नान करतांना, शक्य तों घड्याळ काढून ठेवावें.

३—किल्ली ठराविक वेळी व एकाच दिशेने द्यावी.

४—घड्याळाचा पट्टा स्टीलचा, कातडी किंवा प्लॅस्टीकचा असो, त्यावर अधूनमधून नजर टाकावी. पट्टा तुटत आलेला असतो. नाहीतर घड्याळ पडून गेलेलेंहि कळत नाही.

५—किल्ल्या, सुटीं नाणीं, असलेल्या खिशांत घड्याळ ठेवूं नये, कारण चरे पडतात.

६—रेडिओवर घड्याळ ठेवूं नये. रेडिओ गरम झाला की, घड्याळांतलें तेल ओघळतें. तसेंच रेडिओंतील विजेच्या प्रवाहानेहि घड्याळांतील हेअरस्प्रिंगला चुंबकत्व येण्याचा संभव असतो. त्यामुळे घड्याळ पुढेमागे धावतें.

७—लहान मुलांना घड्याळ खेळावयास देऊं नये.

८—अनेक पडलेल्या वस्तूंत घड्याळ ठेवूं नये.

९—घड्याळ खुंटीस अडकवून ठेवूं नये.

### स्त्रियांसाठी खास सूचना

१—घड्याळ ज्या हातांत असेल त्या हातांत दागिने घालूं नयेत. घड्याळावरील पॉलीश जातें.

२—पावडर स्नो व लोहचुंबक यांपासून घड्याळ दूर ठेवावें.

३—जिथे धूर असेल, तिथे घड्याळ काढून ठेवूं नये.

४—घरांतील कामें करतांना घड्याळ काढून ठेवावें.

५—अलंकारासारखेंच घड्याळ ट्रंकेंत राहतें. तेव्हा रोज किल्ली देऊन तें चालू ठेवावें.

### ( ब ) भिंतीवरील घड्याळाच्या जपणुकी

१—घड्याळावरची काच नेहमी स्वच्छ ठेवावी.

२—विशिष्ट दिवस किल्ली देण्याचा ठरवावा व त्या वाराची चिठ्ठी वर डकवून ठेवावी.

३—दरवर्षी एकदा तेल-पाणी करवून घ्यावें किंवा करावें.

४—घरी तेल घातलेंच तर खोबरेल किंवा गोडें घालूं नये. घड्याळ बंद पडतें. घड्याळाचें तेल मिळतें तें घालावें.

५—तेल घालण्याआधी घड्याळ साफ करावें.

६—किल्ली देतांना घड्याळाच्या केसवरील व आंतील धूळ पुसावी.

७—ठोके पडण्याच्या आधी व नंतर पांच-दहा मिनिटें घड्याळास कधीहि किल्ली देऊं नये.

८—चुकलेले ठोके बरोबर करण्यास—घड्याळांत जितके ठोके पडतील त्या आकड्यावर तासकाटा फिरवून आणावा. मग त्या वेळेला जितके वाजले असतील ती वेळ मिनिटकाटा फिरवून आणावी. मध्ये दर वेळेचे ठोके पाडीत जावें.

९—घड्याळ बंद ठेवूं नये. आंत गंज चढतो.

१०—घड्याळ हलवितांना लंबक काढून हलवावें व चालू करतांना लंबकाला जोरांत ढकलूं नये. हळू धक्का द्यावा. लंबकाच्या वजनाखालचा ¼ आटा वर वरखालीं फिरवला की, घड्याळ रोज १ मिनिट जलद किंवा हळू होतें.

११—धुराचे खोलींत घड्याळ ठेवूं नये.

### ( क ) टेबलावरील टाइमपीस घड्याळाची जपणूक

१—दर दिवशी नियमित किल्ली द्यावी. किल्ली न देतां चोवीस तासाचे वर काळ जाऊं देऊं नये. पूर्ण स्प्रिंग उलगडण्याआधी घड्याळांना किल्ली देणें चांगलें. त्यामुळे स्प्रिंगची चलनशक्ति उतरत नाही.

२—गजराची वेळ लावल्यावर माथ्यावरचें गजराचें बटण वर आलेलें आहे की नाही पाहावें.

३—मिठापिठाच्या कपाटाजवळ घड्याळ ठेवूं नये. झुरळें आंत जातात.

४—टाईमपीस लाकडाचे पेटींत ठेवून तींत डांबराच्या गोळ्या टाकाव्या.

## साधारण खर्च

घड्याळाला खालीलप्रमाणे खर्च येतोः—

आज स्टँडर्ड मशीनची किंमत १३०|– रु. आहे. घड्याळाचें आयुष्य दहा वर्षें धरणें योग्य. दहा वर्षांनंतर घड्याळाची किंमत ३० रु. झाली तर दहा वर्षांत संपूर्ण शंभर रुपये खर्च होतात. वर्षास घड्याळासाठी किमतीपायी ८ ते ९ रुपये धरले पाहिजेत.

वर्षास दुरुस्तीचा सरसकट खर्च पांच रुपये येतो. यांत फार मोठी पडझड घड्याळास झाली आहे असें धरलें नाही.

घड्याळ घेतल्यावर एकूण वर्षास खर्च पाहा—

| | |
|---|---|
| किमतीपायी | ९|– |
| दुरुस्ती | ५|– |
| | रु. १४|– |

म्हणजे महिन्यास १| रु. खर्च करण्याची तयारी असली की स्टँडर्ड किमतीचें घड्याळ आरामांत वापरतां येतें.

• • •

## लांकडी चक्रांचीं घड्याळें

अमेरिकेंत आरंभीं लाकडाचीं घड्याळें बनवीत. पण त्या घड्याळालाहि गिऱ्हाईक नव्हतें. घड्याळाची जरूरीच कुणाला नव्हती. सूर्य उगवतांच कामाला लागावें. मावळतांच घरीं यावें हा नव्या वस्ती करावयास आलेल्यांचा खाक्या. त्यावेळीं वस्तीहि खूप लांब लांब अंतरावर असत. घड्याळ बनवणारा घोडागाडींत घड्याळें टाकून बाहेर पडे. वस्तीवर आलें कीं, शेतकऱ्याजवळ घड्याळाचें गुणवर्णन करी, पण घड्याळ घ्यायला तो तयार नाहीं हें पाहून तें तिथेंच भिंतीवर टांगून तो म्हणे, 'सध्या इथंच राहूं द्या हें ! मला पैसे देऊं नका. परततांना मी घेऊन जाईन.'

अशा रीतीनें जातांना प्रत्येक शेतकऱ्याच्या घरीं तो घड्याळें पेरीत जाई. आरंभीं घरांतलीं माणसें कुतूहलानं घड्याळाकडे जातां येतां पाहत. पुढें महिन्या दोन महिन्यांत घड्याळाची त्यांना संवय होई. शेतकरी दिवसभर बाहेर असल्यानं बायकोला घड्याळाची सोबत वाटूं लागे. मुलं घड्याळाप्रमाणें जेवणखाण, कामं करूं लागत.

पावसाळा संपला कीं, घड्याळजी हजर होई. पण शेतकरी, त्याची बायको, मुलं नाराज दिसत. कारण, पावसाळ्याचे आरंभींच फुगून घड्याळ बंद पडलेलें असें. सहा महिनेहि हें नीट चाललें नाहीं. सर्व कुरकुरत. हंसत. घड्याळजी गाडींतलें दुसरें घड्याळ आणून पहिल्या घड्याळाच्या जागीं लावून देई व जुनें परत घेई. मग हळूंच किंमतीची गोष्ट काढी. घड्याळाची संपूर्ण किंमत एकदम देणें तेव्हां कठिणच होतें. मग घड्याळजी हप्ता ठरवी. हा हप्ता वार्षिक असे. बायका-मुलांना घड्याळ हवें असें आणि असा लहान हप्ता ठरवतांच शेतकरी कबूल होई.

दरवर्षी न चुकतां घड्याळजी हप्ता घेण्यास येई व त्याच वेळीं बंद घड्याळ काढून त्या जागीं दुसरें लावी. हें बंद घड्याळ पुढच्या प्रवासांत उन्हांत वाळवी व तापवून घासून पुढच्या शेतकऱ्याच्या घरांत टांगलें जाई व क्रमानें त्याचें बंद घड्याळ पुढची वाट चालूं लागे.

यामुळें घड्याळाचा प्रसार इतका तर झालाच, पण हप्त्यानें प्रत्येक वस्तु घेण्याची अमेरिकेंतली पद्धतहि सुरू झाली.

## वेदना

[ पान १४ वरून चालू ]

आला....वसुमतीने नेहमीप्रमाणे चहाचा कप त्याच्यासमोर ठेवला....अनंत तिच्याकडे बघतच राहिला...

'हें काय ?'

'चहा... '

'तो कशाला.... ?'

'रोज नाही का घेत आल्यावर.... '

'पण रोज हवाच कशाला चहा ?'

'म्हणजे काय ?'

'पाणी, साखर, चहाची पावडर अन् दूध....हवंय् कशाला एवढं....घसा सुकला तर माठांतलं गार पाणी चालतं.... '

वसुमती काहीच बोलली नाही ... निश्चल उभी राहिली. 'काय ! बोलत नाहींस ! मी विचारतोय् तुला....चहा काय अन् पाणी काय....जात एकच-द्रवपदार्थाची...' तरीहि वसुमती स्तब्धच....

'मी तुला सांगतो ...'

'हूंऽऽ'

'मग.... '

अनंता उगीचच चिडला .... चहाभरली कपबशी त्याने हातांत घेतली अन् जमिनीवर भिरकावून दिली....कपाचे–बशीचे तुकडे तुकडे झाले....आणि वसुमतीला एकदम रडूं कोसळलें...

'रडायला काय झालं ? चार दमड्यांची कपबशी फुटली त्यासाठी एवढं रडायचं ! माणूस मेल्यावर रडतात तसं ?' वसुमती अधिकच जोराने रडूं लागली....अश्रूभरल्या नेत्रांनी तिने क्षणभर अनंताकडे पाहिलें.... त्याचे डोळे उगीचच लालबुंद झाल्यासारखे तिला दिसले....सप्त पाताळांतील आग जणू त्याच्या डोळ्यांतून प्रज्वलित होत होती...विश्वसंहार करूं इच्छिणाऱ्या माणसाचा राग जणूं त्याच्या चेहऱ्यावर दिसून आला....एखाद्या क्रुद्ध आणि चवताळलेल्या जनावराची भीति वाटावी तशी अनंताची भीति वसुमतीला वाटली....अन् कावरीबावरी होऊन ती आंत निघून गेली....कोपऱ्यांत बसून कितीतरी वेळ ती तशीच रडत होती....

अनंता मग स्वस्थचित्ताने आरामखुर्चीत पडला. तिथेच त्याला झोप लागली.... मग रात्री वसुमतीने कर्तव्यबुद्धीने त्याला उठवलें, पण आपल्याला जेवायचें नाही असें सांगून तो परत झोपी गेला.

उपाशी पोटी तळमळत वसुमतीने ती रात्र जागून काढली 'आपल्या नवऱ्याला झालें तरी काय ?' या एकाच प्रश्नाने रात्रभर तिचा छळ केला....

दुसऱ्या दिवशी दुपारी ती आमच्या घरी आली. आणि झाला प्रकार तिने माझ्या आईला सांगितला. माझ्या आईने तिला एक निराळाच मार्ग दाखवला.... अनंतावर कुणी तरी करणी केली असावी, आणि म्हणून तो असा वेड्यासारखा वागत असावा. माझी वृद्ध आई जुन्या जमान्यांतली असल्यामुळे जुन्या श्रद्धाच उरीपोटी बाळगून होती.

आळींतल्या यशोदाबाईच्या अंगांत दर मंगळवारी देवी येते हें साऱ्या गांवाला ठाऊक होतें. देवी अंगांत आली म्हणजे यशोदाबाई प्रश्न विचारणाऱ्या माणसाचं बरंवाईट सगळं सांगते. नाना चमत्कार करून दाखवते. चिमूटभर हळद मुठींत दाबून त्याचें वाटीभर कुंकू करून दाखवते. वाटीभर कुंकवाचा ताटभर बुक्का करून दाखवते. मग त्या बुक्क्यांतून लहानशी देवीची चांदीची मूर्ति काढते. तळहातावर ती मूर्ति घेऊन थयथय नाचते. अंबाबाई, अंबाबाई करीत जोपर्यंत तिच्या अंगांत देवीचा संचार आहे तोपर्यंत वाटेल ते प्रश्न विचारावे, त्यांची भराभर उत्तरं ती देत राहते.

माझ्या आईच्या सांगण्यावरून वसुमती एका मंगळवारी यशोदाबाईकडे गेली... यशोदाबाईच्या अंगांत देवीचा संचार झाला. आणि वसुमतीने देवीला विचारलं...

'माझा नवरा चमत्कारिक वागतो...'

'हूंऽऽ हूंऽऽऽ ...'

'त्याला झालं काय कळत नाही...'

'हूंऽऽ ! हूंऽऽऽ ...'

'तो नीट नाही का वागणार... ?'

हूंऽऽ ! हूंऽऽऽ...'

आपण प्रश्न विचारतों आणि देवी नुसतंच 'हूंऽऽ ! हूंऽऽ' करते याचं वसुमतीला आश्चर्य वाटलं....मग लक्षांत आलं तिच्या.... देवीची आधी खणानारळान ओटी भरायची राहिली. कुंकवाचा मळवट तिच्या कपाळी भरायचा राहिला....मग वसुमतीने देवीला मळवट भरला, खणानारळाने तिची ओटी भरली....मग देवी पुन्हा नाचूं लागली... वसुमतीच्या प्रश्नांना उत्तरं देऊं लागली... तुझ्या नवऱ्याला कांहीतरी बाहेरची बाधा आहे....त्याच्या मेंदूवर परिणाम झालेला आहे...म्हणून तो भ्रमिष्टासारखा करतो... पण लवकरच तो सुधारेल....मंगळवारचा उपास कर....देवांत दोन चांदीचे डोळे ठेव ...रोज त्याची पूजा कर...तुझा नवरा बरा झाला म्हणजे चांदीचे डोळे कोल्हापूरच्या अंबाबाईला वाहा....हा अंगारा घे....दर मंगळवारी हा अंगारा नवऱ्याच्या कपाळाला तुझ्या हाताने लाव...कल्याण होईल तुझं....

वसुमती घरी आली....तेव्हापासून देवीनं सांगितलेलं व्रत करूं लागली....मंगळवारचा उपास करूं लागली....अनंताच्या नकळत तिने सोनाराकडून चांदीचे डोळे करून आणले ....त्याची पूजा करूं लागली...मंगळवारी रात्र झाली, अनंता झोपी गेला म्हणजे गुपचूप त्याच्या कपाळाला अंगारा लावी...मनोमन देवीची प्रार्थना करी 'अंबाबाई ! माझ्या नवऱ्याला बरं वाटूं दे.... '

केव्हातरी अंबाबाईला आपली हांक ऐकूं जाणार आहे...केव्हातरी आपला नवरा बरा होणार आहे....आपलं कल्याण होणार आहे....सुखासमाधानाने आपला संसार समृद्ध होणार आहे...आपल्या नवऱ्याला कसली तरी बाधा झाली आहे....पण देवीच्या अंगाऱ्याने ती दूर होणार आहे...या आशेवर वसुमती जगत होती...श्रद्धेवर जगत होती.... अनंताला फार फार जपत होती....लहान मुलासारखी....लहान मुलाला कुणाची नजर लागू नये, कुणाची दृष्ट लागू नये म्हणून आई मुलाला जपते, तशीच वसुमती अनंत विश्वनाथ आपटेला जपत होती...आणि अनंत आपटे मला मोठ्या अभिमानाने सांगत असे.... 'माझं भाग्य आहे मित्रा...अशी प्रेमळ बायको सात जन्माच्या तपश्चर्येनेसुद्धा मिळाली नसती...' प्रेमळ बायकोशी अरसिकतेने वागणारा नवरा...अरसिक नवऱ्याशी प्रेमळ पणाने वागणारी बायको...अनंत विश्वनाथ आपटेच्या संसाराचं एवढंच सार होतं...

खरं म्हणजे अनंताला कसलीच बाधा झालेली नव्हती...दिलदार मनाचा माणूस आणि सच्चा वृत्तीचा माणूस म्हणून लोक त्याला ओळखत होते...रस्त्यावरच्या भिकाऱ्याला

त्याने सहानुभूति दाखविली होती...ऑफिस-मधल्या शिपायाला त्याने जिव्हाळा दिला होता...अनाथाश्रमाला देणगी दिली होती... गरीब विद्यार्थ्यांचे वार घेतले होते...

पण वसुमतीला मात्र त्याने दुःखीकष्टी केलें होतें....तिच्या जीवनाचा रसच जणू त्याने शोषून घेतला होता....वसुमती बिचारी भोळी भाबडी तिच्याजागी दुसरी एखादी खाष्ट बाई असती तर अंगारे-धुपारे करण्या-ऐवजी नवऱ्याच्या मेंदूचा कडकडून चावा घेतला असता...आणि त्याला सुधारलें असतें...

बिचारी वसुमती... !

'माणूस म्हणजे कोण?' या वेडगळ प्रश्नाच्या मागे लागून अनंत आपल्याच हाताने आपल्या संसाराची माती करीत आहे हें डोळ्या-देखत घडत असतांना मी स्वस्थ बसलों... त्याचं कौतुक करीत राहिलों...

पण खरं म्हणजे अशा चमत्कारिक माणसां-च्या बाबतींत कुणालाच कांही करतां येत नाही..

अनंत आपटेबद्दल मला विलक्षण भीतीच वाटत असे..वसुमतीचे अंगारे-धुपारे चालू असतांनासुद्धा त्यांच्या संसारांत अनपेक्षित वादळं होत.

एकदा असंच झालं...

एक दिवस संध्याकाळचीं जेवणं आटोपल्या-नंतर त्याच्या बायकोने बिछाना तयार केला, घरांतली सगळी झाकपाक केली, माजघरांतला दिवा मालवला अन् ती बाहेरच्या खोलींत आली. पण तिला पाहतांच अनंत म्हणाला,

'वसु, तूं हें सगळं कशासाठी करतेस? एवढा जिवाचा आटापिटा...'

'म्हणजे काय? मला नाही कळलं!'

'कळलें नाही म्हणजे आश्चर्य आहे!'

'म्हणायचं तरी काय तुम्हांला?'

'ऐक, एवढी दगदग करून तूं स्वयंपाक केलास..मघांशी बाजारांतून घेतांना चार आण्यांची भाजी आणलीस. केवढी धासाधिस ...चार दुकानं फिरलीस भाजीचीं...पितळेच्या जड बादलीने पाणी भरलंस...केवढा दम लागला होता तुला...पदर नुसता ओलाचिंब झाला होता...घाम निथळत होता...हा बिछाना तयार केलास...केवढ्या काळजीपूर्वक! एक सुरकुतीसुद्धा पडूं दिली नाहीस चादरीला... पाहत होतों मी मघांपासून...म्हणूच विचारतों की हें सगळं कशासाठी...?'

'संसार करायचा म्हणजे हें करावंच लागतं!'

'असा संसार! अगऽ पाहवत नव्हतं मला...ते श्रम...ते कष्ट...ती दगदग...तो घाम निथळणारा अन् श्वास उडणारा...'

'मग लावा एखादी मोलकरीण....'

'पण मोलकरीण लावली म्हणजे तिला हे कष्ट नाहीत का?'

'तुमच्यापुढे बोलण्याची सोयच नाही...

'हें बघ, असं म्हणून चालायचं नाही... हा प्रश्न आपण सोडवला पाहिजे. तूं हें सारं कशासाठी करतेस? कुणासाठी करतेस?'

'तुमच्यासाठीच करतें ना ऽ मी हें सारं'

'पण माझ्यासाठी तरी तूं हें कां करावंस?'

'देवा-ब्राह्मणांची साक्ष ठेवून तुम्हीं माझा हात हातांत घेतला. मी तुमची धर्म-पत्नी आहे ना? मग मला केलंच पाहिजे!'

'धर्मपत्नी म्हणजे शेवटी माणूसच ना'

'असं काय करतां गडेऽ तुम्ही...!'

'हें बघ, असा गळ्यांत विळखा घालूं नकोस हाताचा. नको येऊंस इतकी लाडांत. कधी कधी तूं इतकी लाडांत येतेस...माझ्या खांद्यावर हात काय ठेवतेस, माझ्या केसांतून बोटं काय फिरवितेस, माझ्या डोळ्यांत काय बघतेस, उगीच माझ्या सदऱ्याच्या बटनाशी चाळा काय करतेस...'

'तुमचं प्रेम नाही का माझ्यावर? का मी नकोशी झालें आहे तुम्हाला?'

'तसं नव्हे गऽ माझं प्रेम आहे तुझ्यावर. तूं तर हवीच आहेस मला, पण प्रश्न असा येतो मनांत, की हें सारं हवं असं तरी कां वाटतं?'

'मग नको असेल तर द्या सोडून...बसा अंगाला राख फासून हिमालयांत जाऊन...'

खरं म्हणजे वसुमतीने अनंताला थोडं समजून घ्यायला हवं होतं... हेंदेखिल खरं की, अनंताची व्यथा तिला समजणं अशक्य होतं.. शेवटी त्याचं पर्यवसान असं झालं की वसु रुसली अनंतावर आणि आठ दिवस बोलली नाही त्याच्याशी घरांत नुसती धुस-फुस, आदळआपट सुरू झाली. मी गेलों अचानक, तेव्हा हा प्रकार कळला मला. दोघांची समजूत घालण्याचा मीं प्रयत्न केला. अनंता तितक्याच मोकळेपणाने म्हणाला,

'वसूने उगीचच गैरसमज करून घेतला आहे. माझ्या मनांत विचाराचा नुसता गोंधळ उडाला होता. तो तिच्याजवळ बोलून दाखवला एव-ढेंच. तिनें ऐकून घेतलं असतं तर तेवढंच माझं मन मोकळं झालं असतं. तिच्यावर माझं प्रेम आहे. माझ्या स्वतःवर मी वेड्यासारखं प्रेम करतों, तसंच तिच्यावरहि वेड्यासारखं प्रेम करतों. आवेगानें....

'पण कधी कधी वाटतं की माणूस हें सारं काय अन् कशासाठी करीत असतो? या सगळ्यांतून त्याला आनंद मिळतो की दुःख... सांग... भल्या माणसा...या सगळ्याचा अर्थ तरी काय? ...'

अनंत विश्वनाथ त्या दिवशी अगतिक व्यथेने बोलत होता. वसुमतीच्या डोळ्यांतून पाणी टिपकूं लागलं... माझ्या अस्तित्वाचं भानहि ती क्षणभर विसरली अन् अनंताच्या जवळ जाऊन त्याच्या मस्तकावर हात ठेवीत म्हणाली, 'रागवलांत तुम्ही... !' माझ्या श्वासांचें चलनवलन त्या क्षणाला मीं रोधून धरलें होतें....मोठ्या कष्टाने....

असा हा माणूस....अनंत विश्वनाथ आपटे आज सकाळी सात वाजून दहा मिनिटांनी या जगाचा निरोप घेऊन गेला....जीं प्रश्न-चिन्हें सतत त्याने उरीपोटीं बाळगलीं होतीं... तीं बरोबर घेऊन गेला...

चार दिवसांचा आजार तो काय... ऑफिसमधल्या गरीब कारकुनाच्या मृत्यूचें चित्र अनंताच्या मनावर कोरलें जातें काय... त्या विचारानेच तो पछाडला जातो काय... त्याची झोप उडून जाते काय...साऱ्या परमेश्वरी इच्छेनुसार घडलेल्याच या घटना...

चार दिवसांच्या आजारांत अनंतानें सतत वसंत नेमाडेचा आणि त्याच्या कुटुंबाचा विचार केला...त्या विचारांतच त्याला भ्रम झाला...आणि तो आपल्या बायकोला म्हणाला, 'बहुतेक मला जावें लागणार...'

'कुठे?'

'वसंताकडे...बोलावलं आहे त्यानं...'

वसुमती घाबरून गेली...रात्रीची वेळ.... कुणाला बोलवणार...

आणि सकाळी अनंत विश्वनाथने झोपेच्या गोळ्या घेतल्याचें आढळून आलें....डॉक्टर येण्यापूर्वीच त्याचा सात वाजून दहा मिनि-टांनी अंत झाला...

शनिवारी येईन असें मीं त्याला सांगितलें होतें...पण शनिवार उजाडलाच नाही...

दिवस उजाडला तो त्याच्या प्रयाण-यात्रेला जाणाचा. दिगंतांत हरपलेल्या एका दिलदार वृत्तीच्या, सच्चा माणसाच्या निर्वाण-यात्रेला जाण्याचा...माणूस म्हणून जगूनहि माणूस म्हणजे कोण हें ज्याला कळलें नाही, त्या मित्राच्या मृत देहाला अग्निसंस्कार करतांना मनांत विलक्षण विचार आला... जळोत हेच आपले हात ... काय अधिकार आहे आपला... ! कोण आपण ! माणूस... पण म्हणजे कोण...!

हेंच अनंत विश्वनाथ आपटे याला कळलें नाही...वसंत नेमाडेच्या मृत्यूचं चित्र त्याच्या मनावर कायमचें कोरलें गेलें होतें...पण आता त्याच्या मृत देहाची राख झाली...अन् त्या बरोबर तें चित्रहि जळून गेलें...

पण माझ्या मनावर कोरलें गेलेलें चित्र...

वसुमतीने फोडलेला हंबरडा...तिची आर्त किंकाळी...तिच्या कपाळाचें पुसलें गेलेलें कुंकू.. तिच्या गळ्यांतलें सौभाग्याचें मंगलसूत्र तोडणारा माझा निष्ठुर हात...

अनंत विश्वनाथ आपटेचा वंश वसुमतीच्या उदरांत वाढतो आहे...

आणि अनंताचा देह अनंतांत मिसळून जात आहे...आणि माझ्या मनाला युगायुगाच्या वेदना होत आहेत....

• • •

## बाई बुवा आणि बैल —तिघेहि रंगले



वऱ्हाड—नागपूरच्या मुलखांत पानतंबाखूचा भारी षौक. घरोघरी भरगच्च पानदानें स्वगताकरितां तुमच्यापुढे येतील. रोजी शे-पन्नास पानांचा फन्ना उडविणारी मंडळी तर किती तरी आढळतील. !

यवतमाळला एकदा एका श्रीमंत गृहस्थाकडे एका प्रख्यात गायिकेचें रात्रीं गाणें झालें रईस आणि रसिक मंडळीने माडीवरचा दिवाणखाना भरला होता. ह्या कार्यक्रमासाठी जवळच्या एका गांवचे एक बडे जमीनदार पांढऱ्या शुभ्र बैल-जोडीच्या रिंगींत बसून आले. खाली अंगणांत रिंगी-बैल सोडून स्वारी वर आली. ह्या गृहस्थांना गाण्याप्रमाणेच पानाचाहि भारी षौक होता. एक स्वतंत्र भलेंमोठें पानदान घेऊन स्वारी खिडकीशी बसली. बाई गाण्यांत रंगत चालल्या आणि ही स्वारीहि ऐकण्यांत रंगून गेली होती. पान-तंबाखूचा खुराक चालूच होता. अन् पचक् पचक् पिचकाऱ्या खिडकींतून खाली अंगणांत पडत होत्या. सारी रात्र गाण्यांत रंगली आणि संपली. बाईंनी कमाल केली.

—आणि बुवांनीहि कमाल केली ! साऱ्या पानदानाचा पार फडशा उडाला ! गाणें संपल्यावर हे गृहस्थ खाली अंगणांत आले आणि आपल्या बैलांकडे पाहून चकीतच झाले. ते पांढरे शुभ्र बैल तांबडे लाल झाले होते ! साऱ्या रात्रभर पानाच्या तांबडया पिचकाऱ्या बैलांच्या अंगावर पडत होत्या !

मैफलींत बाई रंगल्या, बुवा रंगले आणि बैलहि रंगले !



# ययाति

## एक गद्य महाकाव्य !

लेखक : वसन्त कानेटकर

"....ही कादंबरी ययातीची कामकथा आहे, देवयानीची संसारकथा आहे, शर्मिष्ठेची प्रेमकथा आहे आणि कचाची भक्तिगाथा आहे. हें लक्षांत घेऊन वाचकांनीं ती वाचली तर मला आनंद होईल. कलात्मक रंजन, भावनांचें आवाहन, सामाजिक शिकवण आणि सूक्ष्म किंवा विशाल जीवनदर्शन अशा अनेक चढत्या पातळ्यांवर चांगली कलाकृति एकाच वेळीं विहार करूं शकते. त्यांतल्या पातळीला मीं स्पर्श केला आहे, कुठल्या पातळीला स्पर्श करायला मी असमर्थ ठरलों आहें, तें रसिकच सांगूं शकतील "... 'ययाति' कादंबरीला लिहिलेल्या 'पार्श्व-भूमीं' तले खांडेकरांचे उद्गार अनेक अर्थांनी उद्बोधक आहेत. या कादंबरीचा विषय, त्यांतील आशय, लेखकाचे संकल्प, त्याच्या निरीक्षणाचा, चिंतनाचा आणि अभ्यासाचा आवाका, त्याची जीवन आणि वाङ्मयमूल्यें, त्याच्या श्रद्धा आणि अश्रद्धा इत्यादि अनेक वस्तुस्थितीवर या उद्गारांनी थोडाफार प्रकाश टाकला जातो. मराठी कादंबरीच्या परिसरांतील ययातीचें वेगळेंपण आणि आगळेंपण या उद्गारांनीं ठसठशीतपणें नजरेंत भरूं लागतें आणि कादंबरीकडे पाहण्याचा एक चष्मा तयार होऊं लागतो. ययातीचें रूप न्याहाळण्यासाठी या चष्म्याची गरज आहे असें नाही. चष्म्याविनाहि तिचीं वैशिष्ट्यें सामान्यांतल्या सामान्य वाचकालाहि सहज प्रतीत होणारीं आहेत, पण खुद्द लेखकानेच ययातीच्या बांधणीची कहाणी प्रांजळपणे सांगितली असल्याने 'संकल्प आणि सिद्धि' यांतलें अंतर जोखून पाहणें रसिकांना सुलभ झालें आहे. ययातीच्या वाचनानंतर मनावर सामग्र्याने होणारा एकच एक परिणाम कोठला असेल, तर त्यांतील विषयांच्या भव्यतेचा आणि आशयाच्या सर्वस्पर्शित्वाचा. ययाति ही एक मामुली कादंबरी नव्हे, आधुनिक मराठी कादंबरीच्या परिसरांत खांडेकरांच्या लेखणींतून प्रकट झालेलें तें एक गद्य महाकाव्य आहे, असें म्हणावेंसें वाटतें तें यामुळेच.

### महाकाव्याचा आत्मा

'ययातीला' महाकाव्य संबोधतांना तंत्रदृष्ट्या ती संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी सांगितलेल्या महाकाव्याच्या चौकटींत बसूं शकेलच असें नाही याची मला पूर्ण जाणीव आहे. 'सर्गबन्धो महाकाव्यम्' हा दण्डीचा निकष तिला सुतराम लागत नाही. तथापि जे थोडेफार निकष लागतात त्यामुळेहि हा दावा सिद्ध होतो असें मला वाटत नाही. उदाहरणार्थ महाभारतासारख्या इतिहासांतून ययातीच्या कथाभागाची गुंफण करण्यांत आली आहे; वीरपुरुष आणि राजस्त्रिया यांचें चित्रण त्यांत आलें आहे. नगर, पर्वत, समुद्र, षड्ऋतु, चंद्रसूर्याचे उदयास्त, उद्यानक्रीडा, मधुपान, पुत्रजन्म, राजकारण, युद्ध, प्रवास, सैन्याचें प्रयाण इत्यादिकांच्या सढळ वापराने आणि काव्यमय वर्णनामुळे या कादंबरीच्या मांडणींत महाकाव्याचा थाट उभारला आहे, पण या पैकी एकाहि गुणविशेषामुळे महाकाव्याला 'महाकाव्यपद' प्राप्त होतें असें मला वाटत नाही. महाकाव्याचा आत्मा कलाकृतीच्या भव्यतेंत आहे, व्यक्तिरेखांच्या उत्कटतेंत आणि उग्रतेंत आहे, व्यक्ति आणि नियति यांच्या रौद्र संघर्षांतून प्रकट होणाऱ्या सनातन शोकान्तिकेंत आहे; जीवन आणि मृत्यु, सुख आणि दुःख, साधुत्व आणि दुर्जनत्व या द्वंद्वाच्या कविमानसांत चाललेल्या मंथनांत आहे आणि जीवनावर भाष्य करणाऱ्या कवीच्या चिंतनशील वृत्तींत आहे. हे स्पर्श कलाकृतींत जिथे जिथे जाणवतात तिथे तिथे ती समकालीन मूल्यें आणि वादविवाद यांना ओलांडून पुढे जाते आणि ती महाकाव्याचें रूप धारण करते. हे सर्व स्पर्श कमी-अधिक प्रमाणांत आणि उच्च-नीच पातळीवर 'ययाती' मध्ये जाणवतात म्हणूनच तिला महाकाव्याचें अभिधान द्यावेंसें वाटतें.

### खांडेकरांचें आगळें व्यक्तिमत्त्व

तरल कल्पकता, अभ्यासूवृत्ति, चिंतनशील मनःपिंड, सौंदर्यासक्ति, प्रखर विश्लेषणशक्ति इत्यादि अनेक गुणांच्या समुच्चयामुळे अशा कलाकृतीच्या निर्मितीला खांडेकरांनी हात घालावा यांत अलौकिक असें कांही नाही. खांडेकरांच्या कादंबरी,कथा-लेखनांतील गुणावगुणाबद्दल मतमतांतरें कोणतींहि असोत— नजीकच्या भूतकालांतच नव्हे तर वर्तमान काळांतहि 'खांडेकर' हें एक प्रभावी, प्रेरक आणि संस्कारक्षम व्यक्तिमत्त्व आहे याबद्दल दुमत होईल असें वाटत नाही. कोल्हटकर-गडकरी यांच्यासारख्या पूर्वसूरींचे त्यांच्या शैलीवरले आणि रसिकतेवरले संस्कार ही कदाचित् विवाद्य मुद्दा होईल. आगरकर आणि हरिभाऊ आपटे यांच्या प्रेरणेंतून उपजलेला

आणि ( त्यांनीच कबूल केल्याप्रमाणे ) वाङ्मयीन परिस्थितीमुळे स्वीकारावी लागलेली त्यांची आग्रही सामाजिकता, हाहि कदाचित मतभेदाचा मुद्दा होईल. निर्भेळ कलाकार म्हणून त्यांच्या थोरवीबद्दलदेखील अनेक बाजू दर्शवितां येतील, पण आजच्या आणि कालच्या अनेक श्रेष्ठ कलाकारांना त्यांचें सर्वंकष व्यक्तिमत्त्व अनेक अर्थाने प्रेरक झालें आहे ही गोष्ट त्यांच्या विरोधकांनाहि मान्य करावीच लागेल. टीकाकार आणि कलाकार, तत्त्वज्ञ आणि कवि, संत आणि सौंदर्यवादी, या भूमिकांचा त्यांच्या वृत्तींत जो असाधारण संगम झालेला आहे त्यामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वांत कांहीं एक आगळेंच आकर्षण निर्माण झालें आहे. त्यांच्या कल्पकतेची भरारी, त्यांच्या प्रखर विश्लेषणाची धार, मनुष्यमात्राच्या सुखदुःखाबद्दलची त्यांची गाढ आत्मीयता, मिळतील तेथून ज्ञानकण जमा करण्याची त्यांची युयुत्सु वृत्ति, जीर्ण समाजरचनेबद्दलचा त्यांचा कठोर आवेश, नवसमाजरचनेचीं त्यांचीं स्वप्नें, साधुत्व-मांगल्यावरील त्यांची गाढ श्रद्धा, आधुनिकतेचें आव्हान स्वीकारण्याची त्यांची हिरीरी, आध्यात्मिकतेकडील त्यांची ओढ इत्यादि अनेक विशेषांमुळे त्यांचें व्यक्तिमत्त्व जितकें समृद्ध आणि आकर्षक, तितकेंच क्वचित अनाकलनीयदेखील झालें आहे. ते देव मानीत नाहीत, पण आत्मा मानतात—आणि ययातीसारख्या कादंबरींत तर या आत्म्याच्या कल्पनेचें वेदांच्या आणि उपनिषदांच्या आधारें ते विश्लेषण करूं पाहतात. गांधीजी आणि विनोबांच्या जीवनप्रणालीचें त्यांना गाढ आकर्षण आहे, पण या थोर विभूतींचा यंत्रविद्वेश आणि त्यांची टोकाची विरक्ति यांना त्यांनी कडाडून विरोध केला आहे. ब्रह्म-मोक्षाच्या आणि पापपुण्याच्या कल्पना टाळून मानवधर्मावर नव्या आध्यात्मिक शक्तींचा प्रपंच थाटतां येईल अशी त्यांची बळकट श्रद्धा आहे. व्यक्तिजीवनांत दारिद्र्यापासून तों प्रकृतीच्या दौर्बल्यापर्यंत त्यांनी अनेक तीव्र दुःखांचे आघात सोसले, पण त्याबद्दल कधीहि कुरकुर केली नाही की आपला आशावाद पिचूं दिला नाही. व्यक्तिगत आपत्तींच्याकडे बघण्याचा त्यांचा हृद्य दृष्टिकोन ययातीच्या प्रारंभीच्या निवेदनांत सहजगत्या प्रकट झाला आहे. यावरून त्यांच्या ऋषितुल्य वृत्तीची साक्ष पटते. या ऋषितुल्य वृत्तींत अनेक विरोधी आणि विविध स्वभावछटांचें मोठें मनोज्ञ मिश्रण झालें आहे. या सर्व स्वभावछटांचा उल्लेख अशासाठी मीं केला आहे की, 'ययाति' सारखी कादंबरी हा या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचाच एक स्वाभाविक आविष्कार आहे हें रसिकांच्या ध्यानीं यावें. ऋषितुल्य समरसता आणि अलिप्तता, रसिकता आणि विवेचकता यांची ज्या प्रतिभाबलांत धारणा होत नाही त्या प्रतिभेला ययातीसारखी कलाकृति निर्माण करणें शक्य होणार नाही. कारण 'ययाति' केवळ कथनकौशल्याने नटलेली, हृदयंगम व्यक्तिरेखांनी सजलेली वा उत्कट-उदात्त प्रसंगांनी गुंफलेली नाट्यपूर्ण कहाणी नव्हे. 'ययाति' हा एक जीवनशोध आहे.

### 'ययाति'—एक जीवनशोध

हा 'जीवनशोध' परिमाणतः सुख आणि दुःख, नीति आणि अनीति, धर्म आणि अधर्म या सनातन द्वंद्वांचा शोध आहे. माणूस जगतो कशासाठी? प्रीति म्हणजे काय? मृत्यूने वेढलेल्या टीचभर जीवनांत मानवी मूल्यांना अर्थ आहे की नाही? मनोविकारांना स्वैर सोडून वा त्यांचें संपूर्ण दमन करून जीवनसाफल्य पदरांत पडेल की नाही? कर्तव्याचा अर्थ काय? संसाराचें अधिष्ठान काय? यासारखे अनंत कूटप्रश्न या कादंबरीच्या वाचनांत ठायी ठायी वाचकाला भेटतात आणि अनेक कूट गूढ समस्यांचें मनोज्ञ चित्रण आणि विश्लेषण प्रभावी रीतीने ठिकठिकाणी प्रकट होतांना रसिकांना आढळतें. सौ. कुसमावतीबाई देशपांडे यांनी खांडेकरांच्या कादंबऱ्यांना पूर्वी एकदा 'होल्ड ऑल' ची उपमा दिली होती. उपरोधाने नव्हे तर गौरवार्थाने ही उपमा ययातीला अधिक यथार्थतेने शोभून दिसते. सुटसुटीत आणि आरस्पानी बांधणीच्या कादंबरींत विचारांच्या खोगीरभरतीला स्थान असत नाही हें जितकें खरें तितकेंच, महाकाव्याच्या पातळीवर जाऊन जीवनदर्शनाला हात घालणाऱ्या लेखकाला या विचारांना स्पर्श केल्याशिवाय भागत नाही हेंहि खरें आहे, टॉलस्टॉयची 'वॉर अँड पीस' ही कादंबरी सुटसुटीत आणि सुबक नाही हें सिद्ध करण्यास साहित्यशास्त्राची मदत घेण्याची गरज नाहीं, पण 'वॉर अँड पीस'ची महात्मता तिच्यांतील सर्वंकष जीवनशोधांतच आहे, हें कोण अमान्य करील? कांचनमृगापासून क्रौंचवधापर्यंत अनेक कादंबऱ्यांतून खांडेकरांच्या लेखनांतील एक द्वंद्व रसिक वाचकांपुढे नेहमीच प्रकट झालेलें आहे. त्यांच्या प्रस्तावनेंतील विश्लेषण जितकें सर्वंकष आणि मूलग्राही त्या मानाने त्यांनी उभी केलेली कथावस्तु नेहमी कमी-अधिक प्रमाणांत थिटी वाटे. त्यांच्या प्रतिभेंतील कलाकार हा त्यांच्या वृत्तींतल्या भाष्यकारापुढे नेहमीच फिका, प्रसंगी दुबळा वाटे. ययातीने हें द्वंद्व सोडवलें आहे असें मला वाटतें. महाभारतांतून उचललेल्या कथावस्तूवर कलाकार खांडेकरांना जरूरीपुरतेंच संस्करण करावें लागलें आहे, पण भाष्यकार खांडेकरांना त्यांच्या त्या क्षेत्रांतल्या बळाशी पुरून उरेल एवढी प्रचंड वस्तु मुळांतच गवसली आहे. म्हणूनच भाष्यकार आणि कलाकार खांडेकरांच्या प्रतिभेचा चतुरस्त्र विलास या कादंबरींत अनेक ठिकाणी प्रत्ययाला येतो.

शुक्राचार्य आणि यति यासारख्या उग्र, ययाति आणि देवयानी यासारख्या तामसी आणि शर्मिष्ठा व कच या सारख्या सात्त्विक वृत्तींच्या स्वभावचित्रांनी सजीव झालेली ही कथा मूलतः ययातीचा स्वतःचा जीवनशोध आहे. नहुषासारख्या पराक्रमी पित्याला मिळालेला शाप आणि त्याचे शोकांत जीवन या घटनेपाशी चिमुकल्या ययातीचा जीवनशोध सुरू होतो आणि आडवळणें घेत, तीव्र, उत्कट, भयकारी, मोहक, दाहक, उदात्त अनुभवांचा स्वाद घेत पराकाष्ठेच्या आत्मार्पणाशी आणि पुनर्जन्माशी हा शोध संपतो. हा शोध जितका नाट्यपूर्ण आणि विस्मयजनक आहे तितकाच प्रत्येक वळणाशी तो गहन समस्येला हात घालणारा आहे. बालपणापासून लहान-मोठ्या सुखाच्या फुलपाखरामागे धावणारा माणूस कळत नकळत स्वतःच्या मनोविकारांचा दास बनतो. भोगाची चटक लागलेल्या मनाचे कालांतराने धरबंद सुटतात आणि माणूस शरीरपूजक होतो आणि अखेर भोग—अतृप्ति—दुःख म्हणून जास्त भोग अशा कधीहि न थांबणाऱ्या भीषण चक्राचा बळी होतो—हें सत्य ययातीच्या कहाणींतून विविध रीतीने सूचित करण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे. 'नहुषाचीं मुलें कधीहि सुखी होणार नाहीत' या अगस्तीच्या शापाने हाय खाऊन वैराग्याच्या गुहेंत पळून गेलेला ययातीचा थोरला भाऊ यति आणि

ययातीने संन्यास घेऊन पळून जाऊं नये यासाठी त्याला विलासमग्न ठेवण्याची पराकाष्ठा करणारी दुबळी-भोळी राजमाता, कळत नकळत ययातीच्या बालपणीच त्याच्या विनाशाचीं बीजें पेरून ठेवतात. मनोविकारांना षड्रिपु मानण्याची आपल्याकडे सनातन परंपरा आहे. योगसाधनांतील तर तो एक महत्त्वाचा भाग आहे. दुःखाच्या भयाने सुखापासून दूर पळणारा यति मनोविकारांचें निर्दालन करून सुखाचा शोध लावण्यांत अयशस्वी झाल्यास नवल काय ! कडू फळें, काटेरी शय्या, स्त्रीद्वेश, विजनवास यांच्या उग्र आणि खडतर तपश्चर्येतून यतीला अनेक सिद्धी प्राप्त होऊनदेखील बिचाऱ्यावर वेडापिसा होण्याची पाळी आली. या अनुभवाने पोळलेल्या ययातीने दुसरें टोक गाठलें. शरीरपूजा, मनोदास्य, भोग—अधिक भोग, धर्म्यअधर्म्य मार्गांने मिळालेला भोग या मार्गाचा आश्रय करूनहि ययाति अखेर दुःखाच्या—न संपणाऱ्या दुःखाच्या गर्तेतच खितपत पडला. मनोविकार हे देव नाहीत आणि शत्रूहि नाहीत. त्यांची पूजा करून चालणार नाही आणि त्यांचें निर्दालन करूनहि भागणार नाही. शरीरधर्म हे कधी कोणाला चुकले नाहीत. त्याच्या आधीन होण्याचें कारण नाही, तसेंच त्याबद्दल शरमिंदे होण्याचीहि गरज नाही. सुखाचा शोध हा स्वैराचरण आणि संपूर्ण दमन यांच्या बरोबर मध्यावर आहे ! वासना-विकारांच्या उदात्तीकरणांत आहे, स्वधर्माची आणि कर्तव्यभावनेची चौकट या मनोविकारांना घालण्यांत आहे. यति आणि ययाति यांच्यामधली तपस्या शर्मिष्ठा आणि कच यांच्या जीवनांत आविर्भूत झाली म्हणूनच अनंत दुःखें सोसूनहि हीं माणसें तृप्त झालीं. शरीराचें दमन वा दास्य करणारीं माणसें आपआपल्यापरीं परतंत्र होतात आणि त्यांचे जीवनहेतु विफल होतात. 'ययाति' कादंबरीची उभारणी या आशयाच्या अधिष्ठानावर करण्यांत आलेली आहे.

## आशयाचे अनेक स्तर आणि परिमाणें

मात्र हा आशय एक-दोन वाक्यांत सुटसुटीतपण सांगतां येईल इतका एकेरी आणि एकरंगी नाही. अनेकांच्या जीवनहेतूंचे संघर्ष, निरनिराळ्या पात्रांचे स्वभावविशेष आणि नियतीनें केलेली पारध यामुळे कथावस्तूलाच नव्हे तर त्यांतील आशयालाहि अनेक स्तर आणि परिमाणें निर्माण झालीं आहेत. ययातीच्या कहाणीला मनोविश्लेषणात्मक असा एक सघन अर्थ आहे. पित्याच्या शापाने आणि भावाच्या पलायनाने बाल ययातीच्या मनांत विलासप्रीयतेबरोबरच एका अनामिक भयाची जोपासना झालेली दिसते. रणांगणावर निधड्या छातीने शत्रूचा समाचार घेणारा ययाति मृत्यूला घाबरतो, वार्धक्याला थरथर कापतो. शर्मिष्ठेच्या उत्कट प्रीतीचा स्पर्श होऊनहि शुक्राचार्यांच्या भीतीने देवयानीपुढे शरण जातो. अलकेचा मृत्यु निष्क्रियतेने पाहणारा आणि शर्मिष्ठेला वाऱ्यावर सोडून देणारा ययाति भित्रा आहे, दुष्ट नाही. पुरूपाशी यौवनाची भिक्षा मागणारा आणि मुकुलिकेच्या मिठींत पित्याच्या मृत्यूच्या वेदना विसरणारा ययाति भित्रा आहे, नुसता सुखलोलुप नाही. किंबहुना ययातीची विलाससाधना ही एका भयाण अनामिक भीतीच्या मगरमिठींतून सुटण्यासाठी चाललेली केविलवाणी धडपड आहे. ययातीसारखा शूर योद्धा भीतिग्रस्त असावा हें द्वंद्व जितकें विस्मयकारी तितकेंच वास्तव आहे. या भीतिपायी—केवळ विलासापोटी नव्हे, ययाति आपल्या जिवलग मित्राच्या वधूवर आणि आपल्या अंगाखांद्यावर एकेकाळी खेळणाऱ्या त्याच्या पुतणीवर बलात्कार करण्यासहि सिद्ध होतो. हें क्रौर्यदेखील भीतीच्या पोटी उपजणाऱ्या पलायनवादी वृत्तींतून अवतरावें हाहि मानवी मनोधर्माचाच एक चमत्कार आहे. पण या अधःपतनाला ययातीइतकीच त्याची पत्नी देवयानी हीदेखील कारण झालेली आहे. देवयानी ययातीशी लग्न करते तें राजी होण्याच्या अभिलाषेने. पतीशी ती कधीच समरस होऊं शकली नाही. कचाबद्दलची प्रीति ती विसरूं शकत नाही. पण प्रीति हा शब्दच तिला पारखा आहे. कचाबद्दलची तिची प्रीति काय किंवा शुक्राचार्यांबद्दलची तिची भक्ति काय—ही एक प्रकारची आत्मपूजाच आहे. शर्मिष्ठेला दासी म्हणून राबविण्यांत आणि ययातीची आपल्या निष्प्रेम संसारांत धिंड काढण्यांत तिचा अहंकार आणि आत्मपूजाच प्रकट झालेली आहे. आत्मार्पण तिच्या गांवींदेखील नाही. तिच्या हातून एकहि अधर्म्य कृत्य झालें नसलें, तरी अहंकाराच्या दास्यत्वामुळेच ती इतरांच्या आणि म्हणून स्वतःच्याहि दुःखाला कारण झाली आहे. पण देवयानी तरी इतकी आत्मकेंद्रित कशी झाली ? इथेच तिच्या स्वभावविशेषाइतकाच तिच्या पित्याच्या म्हणजे शुक्राचार्यांच्या वृत्तीचाहि संबंध येतो. शुक्राचार्यांच्या तपस्येतील उग्रपणा आणि तामसीपणा त्यांच्या एकुलत्याएक कन्येने न उचलला तरच आश्चर्य. अशीं उग्र तामसी माणसें आपल्या प्रियजनांनाहि आपल्या सुखाचें साधन करूं लागतात. देवयानी ययातीला वा कचालाच नव्हे तर शुक्राचार्यांनाहि आपल्या सुखाचें साधन मानीत होती. शुक्राचार्यांनीहि या बाबतींत तिच्या अहंकाराचें लालनपालनच केलें.

## प्रेमाचा त्रिकोण

देवयानी-ययाति यांच्या विस्कटलेल्या संसाराचें, त्यांतील परस्परांच्या दुखावलेल्या अहंकाराचें, तज्जन्य सूडबुद्धीचें आणि अखेर त्यांतून उपजणाऱ्या प्रलयाचें चित्रण खांडेकरांनी प्रस्तुत कादंबरीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या भागांत केलें आहे. परिसुखाला आचवलेला ययाति शर्मिष्ठेच्या प्रेमपाशांत गुरफटतो आणि या अधर्म्य आणि अनीतिमय मानलेल्या प्रेमसंबंधापासूनच ययातीच्या उद्धाराला प्रारंभ होतो.

शर्मिष्ठेची व्यक्तिरेखा ही या कादंबरींत म्हणूनच एक समृद्ध अनुभव घेऊन आकारली आहे असें वाटतें. देवयानीच्या अपमानामुळे तिने स्वतःवर ओढवून घेतलेलें दास्यत्व, तें दास्यत्व स्वीकारण्यांतहि तिने दर्शविलेली कर्तव्यबुद्धि, ययातीवरील तिची अबोल प्रीति, तिचें आत्मार्पण, तिचा विजनवास, छळ आणि अखेर पुरूच्या रूपाने तिने उभा केलेला आपल्या सात्त्विकतेचा नवा आदर्श, यामुळे शर्मिष्ठेची व्यक्तिरेखा निःसंशय हृदयंगम झालेली आहे. थोर पुरुषांच्याप्रमाणेच तिच्या वांट्याला येणारीं दुःखें अकारण आणि अपात्री येतात, पण तीं सोसतांनाहि प्रीतीवरली तिची श्रद्धा उडत नाही वा तिच्या वृत्तींत कोठेहि कडवटपणा उरत नाही. तिचें योगसाधन पाहिल्यावर Upon such sacrifices, my Cordelia the Gods themselves throw incense.. असें शेक्सपीयरच्या लियरप्रमाणे म्हणावेंसें वाटतें. तिच्या योगसाधनेमुळे यतीसारख्या कर्मठ तपस्व्यालादेखील माणुसकीचे पाझर फुटले आणि देवयानीलादेखील प्रीतीचा खरा अर्थ समजून घेण्यासाठी तिला शरण जावें लागलें. देवयानी शर्मिष्ठा आणि ययाति यांच्या प्रेमकथेचा सांगाडा तपासला तर त्यांत केवळ हजारो वेळा उगाळलेला नेहमीचाच प्रेमाचा त्रिकोण

दिसेल, पण भाष्यकार खांडेकरांच्या लेखणीतून या त्रिणोणांतहि पिळदार अनुभव उतरलेला ठायी ठायी आढळतो. संसारांत पतिपत्नींना काय हवें असतें, कशाची गरज असते, कुठे सावरून सांभाळून घ्यायचें असतें, परस्परांच्या भावनांना कसें जपायचें, विकारांना कसा आवर घालायचा, तडजोड म्हणजे काय, मनामनांचें मीलन म्हणजे काय, तें कसें प्रकट होतें, प्रीतीचें नाजुक पुष्प कोमेजून जाऊं नये म्हणून कोणती दक्षता घ्यावी लागते, शरीरसुख आणि सहजीवन यांची सांगड कशी घालावी लागते इ. अनेक गहन सूक्ष्म प्रत्ययकारी समस्यांना स्पर्श करीत करीत हा त्रिकोण लेखकाने सजीव केला आहे. त्यामुळेच या कादंबरींतला दुसरा आणि तिसरा भाग कमालीचा हृदयंगम उतरलेला आहे. ययाति-देवयानी वा शार्मिष्ठा हीं माणसेंच आहेत, म्हणून त्यांना लहान-मोठ्या मर्यादा आहेत. पण त्यांतील निखालस दुष्ट कोणीहि नाहीं. आणि तरीसुद्धा परस्परांच्या सुखदुःखांना तीं कारणीभूत होतात. दैवदुर्विलास आणि मनुष्यमात्राचें अज्ञान हाच दुःखाचा मूलस्रोत आहे अशी त्यामुळेच मनाची खात्री होत जाते. जगांतल्या श्रेष्ठ कलाकारांच्या शोकान्तिकेंत व्यक्त होणारें हें भीषण सत्य ययातींतहि अनेक अंगांनी प्रकट होतांना आढळतें, म्हणूनच ययाति हें एक महाकाव्य आहे असें म्हणावेंसें वाटतें.

### तीन तपस्वी

यति, शुक्राचार्य आणि कच या तीन तपस्व्यांचें चित्रण या कादंबरीच्या आशयांत निराळीच भर घालते. पित्याच्या शापाने भयग्रस्त झालेला यति कडू फळें खातो, काटेरी शय्येवर झोपतो, गुहेंत राहातो आणि स्त्रियांचा द्वेष करतो. यतीचें हें चित्र पाहत असतांना आजच्या भारतीय समाजांतल्या 'आचार्य' पंथीय एखाद्या तपस्व्याची आठवण सहजतेने होते. सर्वसामान्य समाजांतच नव्हे तर स्वतःलाहि न पेलणारे वैराग्याचे आदर्श उभे करण्याच्या धडपडींत मोक्षाला आणि संसारसुखाला आंचवलेले हे आधुनिक तपस्वी अज्ञजनांचा बुद्धिभेद कसा करतात, याचें खांडेकरांनी यतीच्या रूपाने मोठें मार्मिक चित्र उभें केलें आहे. संजीवनी विद्येसाठी उग्र तपस्या करणारे शीघ्रकोपी शुक्राचार्य हे जणू बॉम्ब निर्माण करणाऱ्या आजच्या शास्त्रज्ञांचे पूर्वज आहेत. विश्वाच्या जीवनाशी खेळ खेळण्याची शक्ति सिद्धीच्या रूपाने प्राप्त होऊनदेखील या महापंडिताला जीवनाचा अर्थ कधीच उमगला नाही. शक्ति हें साधन आहे, साध्य नव्हे याची जाणीव सुटलेले शुक्राचार्योंसारखे तपस्वीदेखील अखेर दानवांच्या हातांतलें बाहुलें होऊन विश्वाच्या प्रलयाला कारणीभूत होतात. असलें पांडित्य चांगदेवाच्या तपश्चर्येप्रमाणे माणुसकीच्या प्रत्ययांना कोरे करकरीतच ठेवतें. देवयानीवर ययातीने केलेल्या अन्यायाचा सूड घेण्याची बुद्धि आणि सिद्धि शुक्राचार्योपाशी होती, पण तिला सुखी करण्याचा महामंत्र कांही ते तिला देऊं शकले नाहीत. अखेर धाय मोकलून रडणाऱ्या कन्येकडे पाठ फिरवून तपस्येच्या गुहेंतच वैतागाने या महापंडिताला पळ काढणें भाग पडलें. यति आणि शुक्राचार्य या दोन तपस्व्यांच्या पार्श्वभूमीवर खांडेकरांनी रेखाटलेलें कचदेवाचें चित्र मोठें अर्थपूर्ण आणि हृदयंगम उतरलें आहे.

कचदेखील तपस्वीच आहे. शुक्राचार्यांप्रमाणे तो संजीवनी विद्येची साधना करतो. आणि यतीप्रमाणें तो स्त्रीप्रेमाला वर्ज्य मानतो. पण त्याचे हेतु, त्याची साधना आणि त्याच्या वृत्ति कितीतरी भिन्न आहेत. संजीवनीला तो साधन मानतो आणि देवकार्यासाठी ही सिद्धि तो राबवूं पाहतो. युद्धाचा त्याला मनापासून उबग आहे, पण प्राप्तकर्तव्यापासून तो पळून जाऊं इच्छित नाही. कर्तव्यासाठी सर्वस्वाहून प्रिय अशा देवयानीचा तो त्याग करतो, पण तो स्त्रीद्वेष्टा होत नाही. जीवनावर त्याची गाढ भक्ति आहे, पण उपभोगांतच जीवनाची कृतार्थता तो मानीत नाही. त्याची तपश्चर्या अहंकारापासून उपजत नाही वा पळपुटेपणांतून अवतरत नाही. मृत्यूला तो भीत नाही, पण मृत्यूसाठी तो अधीरहि होत नाही. त्याला फुलें आवडतात, पण तीं झाडावर डोलतांना पाहून त्याचें मन तृप्त होतें. देवयानीवरील त्याची प्रीति तिचे दोष पत्करण्याइतकी डोळस आणि उदार आहे. तिचा त्याग करावा लागला तरी त्याच्या मनांत कुठे खेद वा खंत नाही. त्याला आपल्या अपुरेपणाची जाणीव आहे; म्हणूनच शर्मिष्ठेच्या प्रीतियोगापाशी त्याचें मन विनम्र होतें. त्यामुळेच कचाच्या तपस्येला एक आगळें माधुर्य आणि रमणीयता प्राप्त झाली आहे. ययातीला कचासारखा तत्त्वज्ञ कवि मित्र म्हणून बहाल करण्यांत आणि कादंबरींत त्याचा चातुर्याने उपयोग करून घेण्यांत खांडेकरांनी श्रेष्ठ दर्जाची प्रतिभा दर्शविली आहे यांत शंका नाही.

आशय आणि तो प्रकट करणाऱ्या व्यक्तिरेखा यांना सांधणाऱ्या प्रमुख घटना महाभारतांतूनच खांडेकरांना उपलब्ध झालेल्या आहेत. परंतु सर्व लहान-थोर प्रसंगांची गुंफण आणि त्यांना आशयाच्या संदर्भात दिलेला वैशिष्ट्यपूर्ण अर्थ यामुळे कादंबरीच्या सौंदर्यातच नव्हे तर सामर्थ्यांतहि निश्चित भर पडली आहे.

### कलाचातुरी

ययाति-देवयानी, ययाति-शर्मिष्ठा यांच्या भेटीचे पहिले प्रसंग, शर्मिष्ठेकडे ययातीचें मन झुकण्यापूर्वी देवयानीच्या संसारांत त्याच्या कोमल भावनांची झालेली परवड, नहुषाच्या शापाने आणि शुक्राचार्यांच्या भीतीने ययातीचा होणारा थरकाप, भय आणि वैफल्य विस्मरण्यासाठी त्याने मांडलेला प्रलय, वार्धक्याच्या स्पर्शाने शापित ययातीची झालेली केविलवाणी तडफड, पुरूच्या तेजस्वी त्यागाने त्याच्या मनाला झालेली उपरति आणि अखेर शांतमनाने मृत्यूचें त्याने केलेलें स्वागत इ. सर्वच लहानमोठ्या घटना खांडेकरांनी कमालीच्या कौशल्याने कथासूत्रांत गुंफल्या आहेत. त्यांतलें नाट्य, रसवत्ता आणि त्यांतून प्रकट होणारें जीवनदर्शन हीं केवळ अवर्णनीय आहेत. अद्भुतता, रहस्य, योगायोग या तत्त्वांकडे फडके, खांडेकरांचा मनापासून ओढा. सामाजिक कादंबऱ्यांतून त्यामुळेच त्यांच्या चित्रणाला अनेक मर्यादा निर्माण झाल्या आहेत. या कादंबरींतहि यति ययातीची भेट, देवयानी-ययाति भेट, शर्मिष्ठेला यतीने कड्यावरून वांचवणें, ययातीच्या मृत्यूच्यावेळी नेमकें कचदेवाचें आगमन होणें—असले योगायोग आहेतच, पण कादंबरीच्या मूळ पौराणिक रूपाशी ते विसंवादी नाहीत. निदान कथावस्तूशी ते विसंवादीरीतीने तरी अवतरत नाहीत, पण खांडेकरांच्या कलाचातुरीचें विशेष मर्म प्रकट होतें तें त्यांनी अनेक ठिकाणी योजलेल्या कल्पनाचित्रांत. हीं कल्पनाचित्रें ( Images ) त्यांच्य एरवीच्या अलंकारिक शैलीपेक्षा निराळीं पडतात. तीं आशयाशी, रसवत्तेशी एकजीव होऊन उचंबळतात, म्हणूनच तीं गतिमान ( Dynamic ) आणि जिवंत वाटतात. उदाहरणार्थ ययाति कादंबरींत त्यांनीं ठिकठिकाणी योजलेलें घोड्याचेंच रूपक पाहावें. काळ, आत्मा,

मन आणि मनोविकार इतक्या विविध अर्थांनी ही वैचित्र्यपूर्ण घोड्याची कल्पना अनेक ठिकाणी चित्ररूपाने त्यांच्या निरूपणांत अवतरते. ययातीच्या मनांतलें द्वंद्व चित्रित करतांना दोन मदोन्मत्त हत्तींची टक्कर भयभीत होऊन पाहणाऱ्या एका बालकाची त्यांनी दिलेली प्रदीर्घ उपमा, देवयानीच्या निष्प्रेम संसारांत ययातीच्या एकलेपणाची व्यथा सांगत असतांना निर्मनुष्य ओसाड द्वीपाची त्यांनी रेखाटलेली कल्पना वा ययातीने मद्याच्या पेल्यांत आपलें सर्वस्व बुडविण्याचा गदारोळ चालवला असतांना त्याच्या अंतश्चक्षूंना दिसलेल्या दरींत कोसळणाऱ्या रथाचें त्यांनी रंगवलेलें रूपक—लेखकाच्या कल्पकतेच्या असाधारण बळाची साक्ष पटवतात.

त्याहीपेक्षा निरूपणाच्या ओघांत ठिकठिकाणी खांडेकरांच्या लेखणींतून उतरलेले सुभाषितासारखे उद्गार भाष्यकार खांडेकरांची थोरवी पटविल्याशिवाय राहत नाहीत. खांडेकरांच्या पूर्वीच्या लेखनांतहि अर्धसत्यात्मक, चमत्कृतिपूर्ण वाक्यप्रयोग अवतरतात, पण मी उल्लेखित असलेल्या उद्गारांचें सामर्थ्य यापेक्षा निराळ्या जातीचें आहे. उदाहरणार्थ पुढील कांही उतारेच पाहावेत.

( १ ) " माणूस शरीरावर प्रेम करतो, त्या प्रेमाला अंत नसतो. पण शरीर कांही त्याच्यावर असें प्रेम करीत नाही. प्रसंगी तें त्याचें वैर साधतें...."

( २ ) "युवराज! त्या शापाला भ्यायला कशाला हवं! खरं सांगू तुला—या जगांत जन्माला येणारा प्रत्येक माणूस शापित असतो. कुणाला पूर्वजन्मीचं कर्म भोवतं, कुणाला आईबापांच्या दोषांची फळं चाखावीं लागतात, कुणी स्वभावदोषामुळ दुःखी होतो, कुणाला परिस्थितीच्या शृंखलांत बद्ध होऊन प्रवास करावा लागतो."

" म्हणजे जीवन एक शापच आहे म्हणायचा ? "

" छे, जीवन हा अनेक शापांनी युक्त असलेला वर आहे. "

" मग मानवी जीवनाला हेतु काय ? "

" या शापांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करणं...."

( ३ ) संसार हा असा श्रेष्ठ आणि पवित्र यज्ञ आहे. सहस्र अश्वमेधांचं पुण्य त्यांत सामावलेलं आहे. मात्र हा संसारयज्ञ सफळ व्हावा म्हणून त्यांत पतिपत्नींना जी अगदी पहिली आहुति द्यावी लागते ती आपआपल्या अहंकाराची....

यासारखे असंख्य उतारे या कादंबरींतून काढून दाखवितां येतील. ययातीला 'महाकाव्य' असें संबोधावेंसें वाटतें तें त्यांत ठिकठिकाणी विखुरलेल्या भाष्यकार खांडेकरांच्या विचारधनामुळेच.

## आणि मर्यादा

मात्र ययातीचें रूपसौंदर्य आणि सामर्थ्य न्याहाळत असतांना रसिकमनांत निर्माण होणारें असमाधान तितकेंच तीव्र आहे याची नोंद घेणें आवश्यक आहे. ही कादंबरी वाचीत असतांना ( खरें तर खांडेकरांच्या सर्वच कादंबऱ्या वाचीत असतांना ) एक जाणीव, एक प्रत्यय वाचकांना—सामान्य वाचकांनाहि उत्कटतेने येतो. खांडेकर प्रभावी कल्पकशैलीचे आणि तीव्र बुद्धीचे, तसेंच गाढ सहानुभूतीचे आणि परिणत प्रज्ञेचे भाष्यकार आहेत, टीकाकार आहेत, पण हाडाचे ते कांही कलाकार नव्हेत. चित्रणाच्या ठिकाणी ते विश्लेषण करूं लागतात, त्यामुळे प्रसंगाची रंगत त्यांना केवळ कष्टसाध्य अशीच आहे. प्रसंग आणि व्यक्तिरेखा उभी करण्याचें कसबच त्यांच्या लेखणींत बेताचें आहे की काय अशी शंका येते. त्यांची विवेचक शक्ति समस्येचा अचुक वेध घेते, मीमांसा करते, निदान करते; त्यांची कल्पकता, घटनाप्रसंगांची गुंफण आणि व्यक्तिरेखांचे आराखडे मोठ्या कौशल्याने आखून देते—आणि मग कुठे तरी खांडेकर कमी पडूं लागतात. जें सहजगत्या चित्रणांतून आविष्कृत व्हावें त्यावर लांबच लांब, पण प्रभावी शैलीने नटलेलीं, सजलेलीं व्याख्यानें, विवेचनें सवूं लागतात. ते अशा प्रसंगी अलंकारांची कोटीबाजपणाची बरसात करतात आणि सुभाषितवजा उद्गारांनी आणि खटकेबाज संवादांनी कशाची तरी उणीव झाकूं पाहतात. प्रसंगाची रंगत अनेक प्रकारच्या लहान-मोठ्या तपशिलांतून उभी राहत असते. या तपशिलांचा त्यांना मनस्वी कंटाळा आहे. परिणामतः थोडक्यांत प्रसंग सांगून मोकळें व्हावें आणि मग त्यावर मनःपूत भाष्य करावें याची त्यांना मनापासून हौस आहे. खांडेकरांच्या कादंबरींत पत्रें, डायरी, निवेदनें, आत्मकथन यांचा सढळ हातानें वापर केलेला असतो याचें कारण तरी

## बहाद्दर प्रकाशक

" ययाती "ची कथा ही तसं पाहिलं तर प्राचीन, पण श्री. खांडेकर यांनी तिला आधुनिक तंत्रांत आणून बसविली. ययातीचे प्रकाशक श्री. रा. ज. देशमुख यांनी प्रकाशन-धंद्यांत अशीच किमया केली आहे. १९३९ सालीं श्री. खांडेकर यांच्या ' काव्यज्योति ' या काव्यसंग्रहाने त्यांनी प्रकाशनाच्या धंद्यास सुरुवात केली. एका लहानशा खोलींत त्यांच्या प्रकाशनसंस्थेची ज्योत मंद जळूं लागली. आर्थिक पाठिंब्याचें तेल नाही. अनुभवाची वात नाही. जागतिक मंदीचा वारा सुटलेला ! पण देशमुखांनी त्या वादळाला नेटाने तोंड दिलें आणि वीस वर्षांच्या कालावधींत त्या ज्योतीचा सर्वत्र पसरणारा व आपल्या तेजाच्या दीप्तीने सर्वांना स्तिमित करणारा प्रकाशदीप निर्माण केला ! तसं पाहिलं तर या माणसाची धडाडीच अलौकिक ! त्यांच्या यादींत प्रत्येक नामवंत मराठी साहित्यिकाचें नांव आढळेल ! पुस्तकी ज्ञानाशी साक्षात् परिचय नसतांहि त्यांनी केलेलें प्रकाशन वाङ्मयगुणांच्या दृष्टीने बहुमोल आहे ! मराठी वाङ्मयाच्या बहिरंगाला त्यांनी बाळसें आणलें. इंग्रजी, मराठी, हिंदी व संस्कृत या चारहि भाषांतून त्यांचीं यशस्वी प्रकाशनें आढळून येतात. कशींतरी भरडून काढावीं अशा क्रमिक पुस्तकांनाहि त्यांनी सुंदर आकार प्राप्त करून दिला. नित्य नवे साहित्यिक शोधणें, वेड्यासारखें नवीन लिखाणाकडे धांवणें, लेखकांना प्रेमाने वेठीला धरून त्यांच्याकडून लेखन मिळविणें या कलेंत ते वाकबगार आहेत. ययातीची कथा आठ वर्षांनीं प्रकाशांत आली. खांडेकरांचे साहित्यगुण शमीच्या वृक्षाच्या ढोलींत गेले की काय अशी चर्चाहि सुरू झाली. पण देशमुखांची चिकाटी आणि भाऊसाहेब खांडेकरांची निष्ठा यांचें मधुर मिश्रण म्हणजेच ययाति ! असा हा मराठींतील बहाद्दर प्रकाशक आहे. —अ. ह. लिमये.

हेंच दिसतें. कादंबरीपेक्षा प्रस्तावनेंतच त्यांची वृत्ति अधिक रममाण होते याचेंहि कारण हेंच असावें. क्रौंचवध, अश्रू आणि ययाति या कादंबऱ्यांची मांडणी आत्मकथनपर प्रकरणांतून करण्यांत निरुपणाची त्यांची नावड अगदी स्पष्ट होते. आरंभीं तंत्रात्मक प्रयोग म्हणून त्यांनी स्वीकारलेली ही पद्धत, त्यांच्या प्रतिभाबलाची मर्यादाच प्रकट करूं लागली आहे. 'निरूपणाची नावड' असल्यामुळे हातीं उत्कट आणि थोर कथावस्तु गवसूनहि खांडेकर तिला शंभर टक्के न्याय देऊं शकत नाहीत. ययातींच्या चित्रणांत हा अनुभव पदोपदी येतो. कथावस्तूशी लेखकाची होणारी भावनात्मक तन्मयता खांडेकरांना शंभर टक्के साध्य असावी असेंहि वाटत नाही. ययातीच्या भोगलालसेचें, अधःपतनाचें, पश्चात्तापाचें आणि परिवर्तनाचें त्यांनी केलेलें विवरण आणि चित्रण अनेक ठिकाणी बौद्धिक विश्लेषणासारखें वाटतें. ययातीची कामकथा रंगवतांना त्यांनी आळवलेला श्रृंगाररस अगदी बेचव, अळणी आणि सोवळा वाटतो. खांडेकरांच्या प्रकृतींतच या रसाला स्थान बेताचें आहे हें कांही या उणीवेचें कारण होऊं शकत नाही. ययातीची कामकथा फडक्यांच्या, माडखोलकरांच्या वा भाव्यांच्या हातीं गेली असती तर ती अधिक रंगतीनेच नव्हे तर सूक्ष्मातिसूक्ष्म मनोव्यापारांचें चित्रण करीत अवतरली असती यांत शंका नाही. पण खांडेकरांची अलिप्तता आणि जाग वरील तिन्ही कादंबरीकारांपाशी नाही; पण कादंबरीलेखनाला ही रंगत जर आवश्यक असेल—आणि ती आहे असें मला वाटतें—तर ययातीच्या थोरवीचें गुणगान करतांना more of a promise, than an achievement अशी तिची मर्यादाहि आखून घ्यावी लागेल.

या मर्यादेमुळेच ययातीमधील दुय्यम पात्रांच्या चित्रणांत मामुलीपणा, उपरेपणा आणि म्हणून निर्जीवपणा उतरल्यासारखा वाटतो. कादंबरींतली प्रमुख पात्रें लेखकाचें अवधान इतकें ओढून घेतात की, त्यामुळेच दुय्यम पात्रांच्या चित्रणांतील तोल आणि लय संपूर्णपणें बिघडून जाते. त्यांची मुकुलिका, कलिका, तारका, माधवी, मंदार, माधव हीं नुसतीं लुसलुशीत गोड नांवें वाटतात आणि त्यांचे स्वभावविशेष म्हणजे घाईघाईने जरुरीसाठी गरजेपुरते ओढलेले काळे-पांढरे फराटे दिसतात.

यदु आणि पुरु हे ययातीचे पुत्र. यापैकी यदूच्या स्वभावचित्राला या कहाणींत मुळीच महत्त्व नाही, पण निदान पुरूची व्यक्तिरेखा तरी अधिक ठळकदार उमटणें जरूर होतें. पित्याचें वार्धक्य पुरूने स्वीकारणें हादेखील पुरूच्या मनोधारणेंतील एक अत्यंत उत्कट अनुभव. पण या अनुभवाची एकहि कड कादंबरींत उमटत नाही. खुंटीवर संबळ अडकवावें तसें पुरूवर वार्धक्य अडकवलें जातें आणि परत काढलें जातें. वाचकाच्या मनांत पुरु माणूस म्हणून नीटसा ठसतहि नाही. अशा वेळी एक शंका अशीहि मनाला चाटून जाते की, कादंबरीचा शेवटचा भाग घाई घाईनें किंचित कंटाळून तर पुरा करण्यांत आलेला नाही ना ?

घाईने घडलेल्या घडामोडी कथेंतील स्वाभाविकतेच्या ओघाला बाध आणतात याचा खांडेकरांना अनेकदा विसर पडल्यासारखा वाटतो. उदाहरणार्थ या कादंबरींतील पात्रांची होणारीं परिवर्तनें पाहावींत 'हृदयपरिवर्तन' ही खांडेकरी विश्वांतली—बहुधा कोल्हटकरांच्या अद्भुतरम्य सृष्टींतून वारसाने आलेली—एक लाडकी कल्पना. ययातीचें परिवर्तन होतें, देवयानीचें परिवर्तन होतें, यतीचें परिवर्तनदेखील होतें. ययातीचें परिवर्तन ज्या पद्धतीने, परिस्थितीने आणि गतीने होतें त्यांत कांही एक अपरिहार्यता आहे, अटळता आहे, पण देवयानीच्या परिवर्तनांत फक्त काव्यगत न्यायबुद्धीच प्रत्यया येते. शर्मिष्ठेची योगसाधना आणि पुरूचा त्याग यांच्या प्रत्ययाने देवयानीला उपरती होणें अस्वाभाविक मुळीच नाही. अस्वाभाविक आहे ती तीन पानांतली घाई. देवयानीचें घाईचें परिवर्तन निदान तर्कबुद्धीला पटण्यासारखे तरी आहे. पण कचाच्या उपदेशामृताने यतीने बदलणें आणि प्रेयसी म्हणून ययातीच्या मनांत घोळत राहणाऱ्या अलकेचें पान दीड पानांतच बाहिणींत रूपांतर होणें हें परिवर्तन निव्वळ खोट्या उदात्तीकरणासाठीच उपजलें असावें याची खात्री पटते. मनुष्यमात्राप्रमाणेंच थोर कलाकृतींनाहि उणीवा आणि मर्यादा या असावयाच्याच या मर्यादांच्या लक्ष्मणरेषांतहि ययातीची थोरवी उठून दिसते, म्हणूनच त्यांचा उल्लेख करावयाचा.

### ययाति—एक प्रयोग

ययातीच्या निर्मितीने खांडेकरांनी तरुण कादंबरीकारांपुढे एक नवा आदर्शच नव्हे तर एक प्रयोगहि ठेवलेला आहे. प्रत्येक नवा प्रयोग यशस्वी होवो न होवो, तो कलाकृतीच्या पायांतल्या जीर्ण शृंखला तोडीत असतो आणि कलाकारापुढे नवनवीं क्षितिजें निर्माण करीत असतो. ययातीचें महत्त्व या दृष्टीनेहि अनन्यसाधारण आहे. पौराणिक कादंबरीचा उपेक्षित परिसर ययातीच्या निर्मितीमुळे नव्या कादंबरीकारांच्या नव्या प्रयत्नांनी गजबजूं लागेल, तर 'ययाती'चें अवतारकार्य सफळ झाल्यासारखें होईल.

● ●

---

ययाति : ले. वि. स. खांडेकर.
प्रकाशक– रा. ज. देशमुख, देशमुख आणि कंपनी, ७३९ बुधवार, पुणें २.
किंमत दहा रुपये, पृष्ठसंख्या ४७०.

---

## पत्ररूप परिसंवाद :

जूनच्या अंकांत 'निवडणुकीसाठीं उभा असलेला उमेदवार कसा असावा' हा विषय दिला होता. त्यावर पुरेसा पत्रव्यवहार वेळेवर हातीं न आल्यानें हाच विषय पुढील अंकासाठीं चालू ठेवीत आहोंत. परिसंवादाचें हें व्यासपीठ जागरूक वाचकांच्या पाठिंब्यावरच उभें राहणार आहे. पत्रें उशिरांत उशिरा ता. १२ जुलैपर्यंत हातीं यावींत अशी अपेक्षा आहे.

— संपादक

---


## यंत्रें येतीं घरा—

ऑगस्ट महिन्यांत
शिवण्याच्या मशीनची
माहिती देणारा लेख—
अंक राखून ठेवा.

# अवघाचि संसार...

अवघाचि संसार सुखाचा करीन, ही प्रतिज्ञा प्रत्येक संसारी माणूस करीत असतो. पण सुखाच्या संसाराची गुरुकिल्ली सुगरिणीच्या हातीं असते हें नव्यानें सांगावयास नको. या सदरांत स्वयंपाकघरापासून तों दिवाणखान्यापर्यंत तिला सर्व प्रकारें सहाय्यक ठरेल असा विविध मजकूर देण्याचा प्रयत्न राहील. त्याचा हा प्रारंभ.

## पंढरीचें राऊळ....

खरं म्हणजे पंढरीला जाणं यंदा मला जमणार नव्हतं. घरांत पावण्यारावळ्यांची दाटी झालेली. नातवाचं बारसं निघालेलं. मोत्यापवळ्यांनी पाळणा गुंफायचा होता. रेशमाच्या दोऱ्या वळायच्या होत्या. हिऱ्यामाणकांचा चांदवा फुलवायचा होता. म्हणून मी आपली माझ्याच नादांत हं! तर काय झालं की, तेवढ्यांत मला एका मागन एक अशा दोन चिठ्या आल्या. अगबाई! म्हटलं हें काय? लेक घरांत. पावणा सोप्यांत. चिठ्ठी कुणाची? 'भाऊराया खुशाल हाय न्हव?' माझी जीव उडून गेला. पण बघतीया तर काय? माझ्या पांडुरंगाच्या चिठ्या निघाल्या. आता बरं हाय का? न्हवं पांडुरंगान बोलीवल्यावर नाही कसं म्हणणार? सगळ्या कामाची मोट बांधली. ठेवली जावेच्या हातांत न् म्हटलं बघ बाई. भराभरा बारसं उरकलं. साता नवसाचा नातू पाळण्यांत घातला. श्रीरंग नांव ठेवलं न् लागलें पंढरीच्या वाटेला. करूं काय मग?

पंढरीची वाट. माझ्या जिवाचा थाट. पाय रंगलं शाडूमातीन. धडुतं भिजलीं पावसान. दिंडी आली सामोरी. ज्ञानबा तुकोबाची झाली बरोबरी. पोथी लावावी म्हटलं ज्ञानेशरी. मनाला आली उभारी. घेतली तुळशीची माळ. वाट फुटली रानोमाळ. निघालें मग झपाट्यान. आखाड एकादशीच्या कारणान. पांडुरंगाच्या सांगाव्यान.

पंढरपूर गांव. तिथल्या बारीक पेठा. दिंडीची रेटारेटी. चंद्रभागेची वाळू. हिऱ्या-माणकाचे जसे खडे. साधुसंत नाचतो देवापुढे. माझं मन भाग्यवंताचं. सोन्याच्या तोलाचं. तुळशीच्या मंजुळेचं. मीं केला विचार. शिरलें चंद्रभागेंत. पाणी उसळतेंल गांवांत शिरतेंल. नांव नवरी झालेली. कावरीबावरी दिसतेली. तिची केली पूजा. चंद्रभागेची भरली वटी. उतार दे म्हणून झाली टाळी. पांडुरंग झाला वनमाळी. आला धावत. केलं आगत-स्वागत. विचाराला आली बरकत. देवान हात दिला हारकत. नेलं राउळांत. गरूडखांबाला घातली मिठी. अयाबाया भेटल्या एकाएकी. विठ्ठल रखुमाईच्या पडल्या गाठीभेटी. झाला आनंद. माहेरान फुलली पाणंद. मी झालें वेडी. विठ्ठलान पोटाशी धरली लाडीलाडी. त्या भेटीची काय सांगावी गोडी. रखुमाईन दिली मला मोत्यांची बुगडी. विठ्ठलनामाच्या गजराच्या बसल्या जिकडतिकड चवडी न् मग मी बसलें तिथच एक रात तेवढी.

पुन्हा मग निघालें माघारी. आल्या पावसाच्या सरीसरी. माहेर झालं मनोहारी. वाटेन फुलल्या गणगोतांच्या भेटीच्या झालरी.

रानमाळ तुडवलं, वाट माग सारली. गांवची शीव गाठली. घरांत आलें. झाली गोष्ट बोललें. चंद्रभागेच्या पाण्यान घरांतले देव न्हाऊं घातले. प्रसाद दिला. कुंकू न् बुक्का आल्या-गेल्याला लावला. पावणा रावळा मग आपल्या घरीं परतला न् मग माझा जीव खाली पडला. आता कुठ नातवाला मांडीवर घेऊन बसलेंय न् हरिहरि करतेंय. काय तर? सारी धांदल न् सारी गडबडच. जिवाला फुरसत म्हणून नाहीच कसली ती! तर काय? माझ्या पांडुरंगान पंढरीच्या राउळांत जी काय शांति दिली तेवढीच. त्या गोष्टीची सर कोण करील काय? छे ग बाई!

काय सांगू माझ्या विठ्ठलाचं ध्यान! अठ्ठावीस युगं विटेवरी उभा. शिरीं मोत्यांचा मुकूट, भिम्मक राजान समींदर पालथा घालून मोतीं जमविलं आवूट. बघून हारलीया तहानभूक. नाही रहात कशाची सूदबूद. विठ्ठलचरणी विसरतें मी प्रपंचाचं सुखदुख. म्हणून आखाडीची मला लईच निसती आवड न् धरतें मग पंढरीच्या वाटेची सवड.

—डॉ. सरोजिनी बाबर

# पावसाळ्यांतील आहार . . .

आता पावसाळा सुरू झाला आहे. अजून जरी फारसा पाऊस पडला नसला तरी लवकरच तो झोड उठवील असा हवामानखात्याचा अंदाज आहे. एकदा पावसाळी हवा सुरू होऊन सूर्यदर्शन दुर्मिळ झालें म्हणजे पोटांत जड होणें, वात धरणें, भूक कमी होणें वगैरे तक्रारी सुरू होतील. त्यांतच अमांश, हगवण, यांच्या साथीहि भर घालतील हें सर्व टाळायला उत्तम उपाय म्हणजे योग्य आहार. ऋतुमानाप्रमाणे आहरांत बदल करणें आवश्यक असतें, तरच प्रत्येक ऋतूंत प्रकृति उत्तम राहते.

आपल्या आहाराच्या प्रमुख वेळा म्हणजे दुपारचें आणि रात्रीचें जेवण. सर्वसाधारणपणें आपल्या महाराष्ट्रांत दुपारच्या जेवणांत भात, भाजी, आमटी आणि चपाती अगर भाकरी यांचा समावेश होतो. या शिवाय चटण्या, कोशिंबिरी, लोणचीं, दही अगर ताक वगैरे तोंडीलावणीं असतात. रात्रींहि हेंच जेवण थोड्याफार फरकाने असतें. आता आपण यापैकी प्रत्येक पदार्थाचा विचार करूं.

पहिल्याप्रथम भात. हा तर सर्व जेवणाचा राजा समजला जातो. हा ' शर्करायुक्त पदार्थ ' असतो. पचायला हलका, परंतु वातुळ. दिवसभर काम करायला जें इंधन शरीराला लागतें, त्याचा पुरवठा हा उत्तम तऱ्हेने करूं शकतो. परंतु पावसाळ्यांत आधीच पोटांत वात धरण्याकडे प्रवृत्ति असते. त्यांतच भात जास्त खाल्ला तर भर पडते. तेव्हा दुपारच्या जेवणांत भाताचा समावेश दही-भात अगर ताक-भात या स्वरूपांत असावा. आणि तोहि प्रमाणांत.

आता भाजी. भाजीपासून शरीराला लागणारे क्षार, जीवनसत्त्वें आणि लोहासारखे रक्तवर्धक पदार्थ यांचा पुरवठा होतो. त्याचप्रमाणे त्यांत सेल्युलोज हा पदार्थ जास्त असल्याने कोठा साफ राहतो. त्यामुळे जेवणांत भाजीचा सढळ हाताने उपयोग करावा. अर्थात वर्षाऋतूंत त्यांतल्या वांगीं, बटाटे, कांद्यासारख्या वातुळ भाज्या शक्यतों वगळाव्या. चातुर्मासांत कांदा, वांगीं वर्ज्य समजतातच. जे चातुर्मास पाळत नाहीत, ते श्रावणमासांत तरी या भाज्या वर्ज्य मानतात. भाज्यांपैकी पावसाळ्यांत विपुल मिळणाऱ्या सर्व भाज्या पचायला हलक्या, हितकर आणि पथ्यकर असतात. उदाहरणार्थ, दोडका, घोसाळीं, तोंडलीं, श्रावण घेवडा, पडवळ, दुध्या, भेंडी, गवार, वगैरे या सर्व भाज्या आलटून-पालटून जरूर खाव्या. त्याचप्रमाणे पालेभाज्या या तर अत्यावश्यकच समजाव्या आणि सुकी अगर पातळभाजी या स्वरूपांत त्यांचा जेवणांत दररोज समावेश करावा. कडधान्यांना—विशेषतः मूग आणि मटकी मोड आणून तींहि दररोज उसळ अगर आमटीच्या स्वरूपांत खावीं म्हणजे ' ब ' या जीवनसत्त्वाचा तुटवडा पडणार नाही.

आमटी—आंबट वरण—बहुधा तुरीच्या डाळीचें केलें जातें. मुगाची डाळ पचायला हलकी असते. त्यामुळे लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांना खाण्यास उत्तम असते. डाळीपासून ' पिष्टमय पदार्थाचा ' पुरवठा होतो. त्याने स्नायूंस बळकटी येते. तेव्हा दररोज एका जेवणांत तरी तिचा समावेश असावा.

चपाती अगर ज्वारी-बाजरीची भाकरी हा आपल्या जेवणाचा कणाच आहे. कारण गहूं, ज्वारी, बाजरी यांच्यापासूनच पिष्टमय, नत्रयुक्त पदार्थांचा मुख्य पुरवठा होतो. हीं शर्करायुक्तहि असतातच. चपातीला मोहन म्हणून तेल घालून शिवाय वर तूप लावावें लागतें. त्यामुळे दोन्ही वेळां चपाती खाल्ल्यास बाजरीपेक्षा जास्त स्निग्ध पदार्थ खाल्ले जातात. उलट ज्वारी-बाजरी हीं हलकीं धान्यें समजलीं जात असलीं तरी शरीराची गरज उत्तम तऱ्हेनें भागवूं शकतात, तेव्हा नेहमीच दुपारीं चपाती आणि रात्रीं भाकरी खाणें उत्तम. भाकरीला मोहन घालावें लागत नसल्याने, स्निग्ध पदार्थहि जास्त खाल्ले जात नाहीत.

चटण्या—कोशिंबिरींत प्रामुख्याने टोमॅटो व लसूण यांचा विचार करावयास हवा. टोमॅटो हा ' वेलवांगें ' म्हणून चातुर्मासांत वर्ज्य मानत असत. वनस्पतिशास्त्रदृष्ट्या जरी वांगें व टोमॅटो समान असले तरी आहारशास्त्रदृष्ट्या त्यांच्यांत फार फरक आहे. वांगें म्हणजे केवळ भाजी व तें वातुळ असल्यामुळे पावसाळ्यांत वर्ज्य. परंतु टोमॅटो हा शक्यतों कच्चाच खावा. म्हणजे त्यांतील जीवनसत्त्वें सुरक्षित राहतात. तो शिजवल्याने तीं नाश पावतात. आबालवृद्धांना तो आवडतोहि आणि पचतोहि. लसूणहि चातुर्मासांत वर्ज्य समजतात, परंतु ती जंतुघ्न असते, त्यामुळे तिचा उपयोगहि हितावह ठरतो.


' तक्रं शक्रस्य दुर्लभम् ' हें सर्वांना माहीतच आहे. ताक हें इहलोकीचें अमृत होय. ताकाने पचनास मदत होते. त्याचप्रमाणे तें पचावयास हलकें असतें. त्याचा अगर दह्याचा दररोज दोन्ही वेळां जेवणांत समावेश करावा. मात्र तें ताजें व बेताचें आंबट असावें. त्यांत हिंग, जिरें, ओवा, आलें वगैरे वातहारक पदार्थहि घालावे. ताकाची कढी केल्यास त्याला हरभऱ्याच्या डाळीचें पीठ न लावतां मुगाच्या डाळीचें पीठ लावावें. पीठ पेरून करावयाच्या भाज्यांना अगर पिठल्यालाहि मुगाच्या डाळीचें पीठ वापरावें. हरभऱ्याचा वातुळपणा सर्वश्रुतच आहे. मुगाची डाळ महाग असली तरी निदान पावसाळ्यांत तरी ती वापरावी.

लहान मुलांना दूध अत्यावश्यक म्हणून दररोज निदान अर्धा शेर तरी दिलें पाहिजे. दुधांतील कॅल्शियमच हाडांच्या वाढीला आणि दातांच्या मजबुतीला उपयोगी पडतो.

आता आंबे संपून केळ्यांचा मोसम सुरू होणार. खरोखर पावसाळ्यांत खाण्यास पिकलेल्या केळ्यासारखें योग्य व उपयुक्त फळ नाही. त्याने मलावरोध होतो. त्यामुळे अमांश, अतिसारावर तें उत्तम असतें. आणि केळ्यामुळे बद्धकोष्ठहि होत नाही. अगदी तान्ह्या मुलांपासून दात नसलेल्या वृद्धांपर्यंत सर्वांना तें पचतें. मात्र तें कच्चेंहि असतां कामा नये आणि जास्त पिकलेलें—उतरलेलेंहि—चालणार नाहीं. तें सर्व ठिकाणीं आणि स्वस्त मिळतें. त्यांतल्या त्यांत वसईचीं आणि जळगांवचीं केळीं हीं जास्त आरोग्यदायक असतात.

पावसाळ्यांत तळकट, तेलकट, मसालेदार पदार्थ खाण्याचें टाळावें. मांसाहारी लोकांनीहि वरील नियम पाळून अंडीं आणि मांस खावें. अंडीं कच्चीं अगर उकडून अगर दुधांत शिजवून खावीं.

—डॉ. लीलाबाई गोखले



चित्रपट सृष्टींतील एक व्यक्तिरेखा

# वसंतराव पेहेलवान

—ले. के. पी. भावे, पुणें.

श्री. के. पी. भावे हे चित्रपटसृष्टींतील एक जुने व अनुभवी दिग्दर्शक व प्रकाशचित्रकार. त्यांचा आणि कै. वसंतराव पेहेलवान यांचा संबंध अत्यंत घरोब्याचा आणि जिव्हाळ्याचा. त्यांनी आपल्या दिवंगत मित्राला वाहिलेली ही एक स्मृतिसुमनांजलि.

इ. १९२९ सालची गोष्ट मा. विठ्ठल हे एके दिवशी माझ्याकडे आले अन् म्हणाले, "दादा, तुम्ही माझं एक काम करायलाच हवं!" आणि ! मीहि माझ्या नेहमीच्या थाटांत म्हटलं, "हो ! झालंच म्हणून समज ! बोल !" त्यावर हसून ते म्हणाले, "दादा, माझा एक मित्र आहे. त्याचं शरीर तर पाहण्यासारखं आहे त्याला सिनेमांत तुम्ही पुढें आणाल अशी माझी खात्री आहे ! त्याला तुमच्या पुढच्या चित्रांत घ्या ! सांगा, घेणार ना ? बोला !"

मा. विठ्ठल तर अगदी मुंढावळ्या घेऊनच आले ! आता ज्या व्यक्तीला मीं अजून पाहिलेलेंहि नाही तिला पिक्चरमध्ये एकदम काम द्यायचं कबूल तरी कसं करूं ? पण मा. विठ्ठल यांचा शब्द मला मोडवेना. मीं म्हटलं, बरं देईन मी काम त्याला ! पण त्याला आधी माझ्याकडे पाठवून दे !"

आणि दुसऱ्याच दिवशी मा. विठ्ठल एका धिप्पाड तरुणाला घेऊन माझ्याकडे आले. धिप्पाड पण अत्यंत बांधेसूद देहाचा, देखण्या आणि हसऱ्या चेहऱ्याचा, ऐन पंचविशींतला तो तरुण माझ्यापुढे उभा राहिला. त्याचा परिचय मला करून देऊन मा. विठ्ठल निघून गेले. उरलों आम्ही दोघे. मीं आणि तो तरुण. अन् ह्या तरुणाचं नांव वसंत धोंडो शिरधनकर ऊर्फ वसंतराव पेहेलवान ! ही माझी त्यांची पहिली गांठ. अगदी नीरगांठ ! अन् ती तोडली अखेर बत्तीस वर्षांनी मृत्यूनेच !

मा. विठ्ठल गेल्यावर मी वसंतरावांना बसावयास सांगून जरा आंत गेलों. थोड्या वेळाने परत आलों. तरी वसंतराव उभेच ! मीं पुन्हा त्यांना 'बसा' म्हणून खूण केली. अन् मग लाजत-संकोचत ते बसले. त्यांचा हा संकोच पाहून मला तर हसूंच आलं. भीमासारखा


★ गृहसजावटींत भर घालण्यासाठी
★ व्रतबंध-विवाह आणि इतर समारंभप्रसंगीं
भेट देण्यास योग्य अशीं
काचेचीं आकर्षक मॉडेल्स्
मागणीप्रमाणे तयार करून मिळतील.
भेटा—प्रोप्रायटर वाघ ब्रदर्स,
हस्त-कला-गृह
२१० शिवाजीनगर, पुणे २
वि. सू.—सरस्वती फौंटनपेन इंक येथे मिळेल.
एजंटांनी लिहावें.

★ विद्यालयीन व महाविद्यालयीन
ग्रंथालयांसाठी लागणारें वेचक मराठी साहित्य
मिळण्याचें प्रमुख ठिकाण
साहित्य प्रसार केन्द्र
सोनी लेन, सीताबर्डी,
नागपूर १.

देह अन् लाजाळू मात्र एखाद्या मुलीसारखे ! मीं त्यांना नांव विचारलं तेहि लाजून तोंडांतल्या तोंडांत पुटपुटले. तेव्हा मीं मुद्दामच म्हटलं, " काय म्हणालांत ? अहो, मोठयान बोलाना ! लाजूं नका ! नट तर अगदी निर्लज्ज असावा लागतो ! सांगा—काय नांव ? "—आणि मग त्यांनी जरा मोठयान नांव सांगितलं.

मला त्यांच्या स्वभांतील हें मार्दव आणि त्यांची काम करण्याची हौस फारच आवडली. त्यांना पुढे अभिनय शिकवितांना मला कष्ट पडले तरीहि फार समाधान वाटे तें याचमुळे. खरोखर त्यांचा स्वभाव त्यांच्या देहारूपाइतकाच निकोप आणि प्रसन्न होता. कष्टाचा कंटाळा त्यांना माहीत नव्हता.

## निर्व्यसनी नट

पहिल्या भेटींतील आमचें असें बोलणें चालू असतांनाच माझ्या पत्नी चहा घेऊन आल्या. चहा पाहून वसंतराव म्हणाले,

" मी चहा घेत नाही ! "

" चहा घेत नाही ? " वसंतराव चित्रसृष्टींतील मोहनगरींत जन्मभर नांदले, पण चहासुद्धा न घेतां ! वसंतरावांना व्यसनच नव्हतें ! त्यांना व्यसन होतें–व्यायामाचें !

पण आत्ता मात्र मला वसंतरावांची थट्टा करण्याची लहर आली. मीं त्यांना म्हटलं, " बरं कॉफी घ्याल ना ? " त्यांनी ' हो ' म्हणतांच मी म्हणालों, " वसंतराव, आता तुम्हीच ह्यांना ( माझ्या पत्नींना ) कॉफी आणण्याची ऑर्डर द्या पाहूं ! मी सांगतों त्या आविर्भावांत—म्हणा ' एऽ हा कप ने आणि सुंदरशी कॉफी करून आण पाहूं लौकर ! जा ! अशी बावळटासारखी पाहतेस काय तोंडाकडे ? जा—नीघ ? ' —हं म्हणा ! "

झालं ! वसंतरावांच्या देहाचा तो प्रचंड हिमालय घामाने ओलाचिंब झाला ! ते निःशब्द होऊन शून्य नजरेने माझ्याकडे बघतच राहिले. मला हसूं आवरेना अन् मग त्यांची थट्टा करीत आम्ही सर्वांनी चहाकॉफी घेतली. खरोखर वसंतराव अतिशय शालीन आणि सुशील होते. ते सुशिक्षित नव्हते, पण अत्यंत सुसंस्कृत होते. ह्या दिवसापासून ते माझ्या घरांत पूर्ण मिसळून गेले.

वास्तविक हा केवढा गुणी नट ! परंतु आत्तापर्यंत मुंबईच्या गुजराथी फिल्मवाल्यांना त्यांची योग्यताच कळली नव्हती. ते त्यांना चित्रपटांत कामें देत. पण कसलीं ? भुतांचीं आणि राक्षसांचीं ! कां, तर त्यांचा देह प्रचंड होता म्हणून ! ही स्थिति पालटायचा मीं निश्चय केला. माझ्याकडे येण्यापूर्वी ह्या क्षुल्लक भूमिकांना कंटाळलेले वसंतराव चित्रसृष्टीला कायमचा रामराम ठोकण्याच्या विचारांत होते !

मीं जेव्हा त्यांना पगाराविषयी विचारलं, तेव्हा त्यांनी कितीची अपेक्षा करावी ? फक्त पंचाहत्तर रुपये पुरेत म्हणाले ! मीं त्यांना म्हटलं, " अहो नुसत्या जेवणाखाण्याला तरी ते पुरतील का तुम्हाला ? ही प्रकृति अशी कायम राहिली पाहिजे ना ? कंपनीकडून तुम्हाला मी महिना तीनशे रुपये पगार द्यायला लावतों ! "

## पहिला चित्रपट

माझ्या 'मेरी माँ' ह्या चित्रपटांत मीं वसंतरावांना खलनायक पठाणाची भूमिका दिली. हें चित्र हैद्राबादेंत तयार झालें. त्यांनी ही भूमिका अप्रतिम वठविली. हा मूर्तिमंत पठाण पाहून हैद्राबादेंतील पठाण लोकांची खात्रीच झाली की, हा आदमी आपला जातभाईच आहे ! एके दिवशी पठाणांचा घोळका आमच्याकडे आला आपल्या जातभाईचें कौतुक करायला ! अन् त्यांच्यापुढे मीं जेव्हा वसंतरावांना नेऊन उभें केलें, तेव्हा त्यांच्या भ्रमाचा भोपळा फुटला ! पण कौतुक कायम राहिलें. नव्हे, वाढलेंच. वसंतरावांना अनेक पठाण मित्र मिळाले !

पण निजामी पोलिसांनी 'मेरी माँ' चित्रपटावर बंदी घातली ! कारण काय, तर म्हणे त्यांतील व्हीलन ( पठाण ) हा मुसलमान असल्यामुळे मुसलमानांचा अपमान होतो ! ! त्या पठाण सावकाराऐवजी मारवाडी सावकार दाखविल्यास चित्रपटाला त्यांची हरकत नव्हती ! ह्या अजब डोक्याच्या पोलीस खात्याला समजावून सांगतां सांगतां आमच्या नाकीं नऊ आले. पण अखेर मोठ्या कष्टाने आम्हाला यश आलें आहे. त्या स्वरूपांतच 'मेरी माँ' दाखविण्यास पोलिसांनी परवानगी दिली. 'मेरी माँ' ने ज्युबिली साजरी केली. चित्रपट व वसंतराव फारच गाजले. परंतु वसंतराव मला म्हणाले, " दादा, आता मला व्हीलन नका करूं ! लोकांच्या फार शिव्या खाव्या लागतात ! " परंतु मीं त्यांची समजूत घातली. वसंतरावांनी काम करतांना कधीच अटी घातल्या नाहीत. तोच खरा नट, जो सांगत नाही अट !

## भक्त प्रल्हाद ते सांगत्ये ऐका

नंतर माझ्या 'इराकचा चोर' चित्रांत मीं त्यांना 'चोराची' म्हणजे नायकाची भूमिका दिली. हीहि त्यांची भूमिका व चित्रपट खूप गाजला. पुढे १९३० मध्यें मुके चित्रपट बोलके झाले. नट नटींना 'बोलायची' पाळी आली. अन् मग अनेकांची अगदी दाणादाण उडूं लागली. कारण एकेकाचं भाषापांडित्य अगाध होतं. पुण्याच्या सरस्वती सिनेटोनचा 'औट घटकेचा राजा' हा बोलपट दिग्दर्शित करण्याचा योग मला आला. वसंतरावांनी त्यांत नायकाच्या ( शाहू मोडक ) भिकारी बापाची भूमिका सुंदर वठवली. वसंतराव तेव्हापासून पडद्यावर बोलूं लागले. नंतर माझ्या 'ठकसेन' ह्या बोलपटांत मीं त्यांना मोठी भूमिका दिली, पण चित्र पूर्ण व्हायच्या आंतच 'ठकसेन'ची नायिका नेत्रा बांदेकर ही एकाएकी मरण पावली ! तेव्हां श्री. दादासाहेब तोरणे यांनीं 'भक्त प्रल्हाद' हा बोलपट माझ्यावर सोपविला. त्यांत वसंतरावांना मीं नृसिंहाची भूमिका दिली. हिरण्यकश्यपूपेक्षा मीं नृसिंह चौपट मोठा दाखविला होता. नृसिंह प्रकट होऊन हिरण्यकश्यपूचा वध करतो हा प्रसंग इतका प्रभावी ठरला, की चित्रसृष्टींत त्याला तोड नाही. वसंतरावांनी नृसिंहाची ही भयंकर रौद्र भूमिका इतकी अप्रतिम वठवली की, सत्यसृष्टींतील वसंतराव इतके शांत व सौम्य कसे, याचंच आश्चर्य आम्हांला वाटूं लागलं.

कमालीचें यश मिळविलेला 'भक्त प्रल्हाद' हा त्यांचा पहिला आणि 'सांगत्ये ऐका' हा शेवटचा चित्रपट होय. दोन्ही चित्रांत त्यांनी आणि श्री. साळवी यांनी कामें केलीं. 'भक्त प्रल्हादां'त वसंतरावांनी साळवींना ( हिरण्यकश्यपू ) ठार केलं. 'सांगत्ये ऐकां'त दोघांनीहि एकमेकांना ठार केलं !

# वार्ता विवेचन

श्री. के. एन्. फडके, पुणें

ओरिसांतील मध्यंतर सार्वत्रिक निवडणूक आणि दिल्लींतील मुस्लिम परिषद्–या दोन या महिन्यांतील प्रमुख राजकीय घटना. या घटनांवर के. एन्. फडके यांच्यासारख्या विचारवंत राजकीय कार्यकर्त्यानें केलेलें भाष्य सर्वांनाच उद्‌बोधक वाटेल.

यापुढेहि श्री. फडके यांचीं चालू घडामोडींवरील अभ्यासपूर्ण परीक्षणें 'माणूस'मधून दरमहा प्रसिद्ध होणार आहेत. निवडणुकीच्या वातावरणांत या राजकीय प्रबोधनाचा मतदारांना विशेष उपयोग होईल अशी आशा आहे.

— संपादक

## (१) ओरिसामधील सार्वत्रिक निवडणुका

ओरिसामध्ये नुकत्याच झालेल्या मध्यन्तर-सार्वत्रिक निवडणुकीमध्ये तेथील काँग्रेस पक्षानें मिळविलेला निर्णायक विजय ही भारताच्या सध्याच्या राजकीय जीवनांतील अत्यंत महत्त्वपूर्ण घटना होय. ओरिसा विधानसभेच्या एकूण १४० जागांपैकी ८२ जागा काँग्रेसला, ३७ जागा गणतंत्र परिषदेला, १० प्रजासमाजवादी पक्षाला व ४ कम्युनिस्ट पक्षाला मिळाल्या असून स्वतंत्र पक्ष व लोहिया गट यांना प्रत्येकी एक जागा वांट्यास आलेली आहे. अवघ्या पांच जागा स्वतंत्र उमेदवारांना मिळालेल्या आहेत. काँग्रेस पक्षानें मिळविलेला हा विजय पक्षाच्या भारतीय नेत्यांना सर्वस्वी अनपेक्षित असा होता. यशाच्या या अनपेक्षितपणांतच त्या यशाची अर्थपूर्णता सामावलेली आहे व त्यामुळेच काँग्रेसच्या नेत्यांमध्ये एक नवीन जाग अथवा जाणीव उत्पन्न होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

ओरिसामधील काँग्रेसपक्षाच्या यशाची चिकित्सा करतांना तेथील राजकीय पार्श्वभूमि विशेषत: हिशेबांत घ्यावयास पाहिजे. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून ओरिसामध्ये काँग्रेस व गणतंत्र परिषद ह्या पक्षांच्या संयुक्त मंत्रिमंडळाची राजवट चालू होती व ह्या संमिश्र मंत्रिमंडळाचें नेतेपण श्री. हरेकृष्ण मेहताब यांच्यासारख्या ज्येष्ठ व श्रेष्ठ अशा काँग्रेस नेत्याकडे होतें. हें संमिश्र मंडळ स्थापन झाल्यापासून त्या मंत्रिमंडळाला ओरिसामधील काँग्रेस संघटनेमधील एका गटाचा विरोध होता, परंतु संमिश्र मंडळाला पाठिंबा देणारा गट अधिकारारूढ असल्यानें व त्या गटाचें नेतेपण पक्षाच्या अखिल भारतीय श्रेणीच्या व त्यांच्या वर्तुळांत मान्यता पावलेल्या श्री. मेहेताब यांच्यासारख्या नेत्याकडे असल्यानें संघटनेमधील विरोधी गटाचा उपेक्षेपायी कोंडमारा होत होता. ह्या कोंडमाऱ्यामुळे ह्या विरोधी गटाच्या सामर्थ्याचा व त्या गटाच्या पाठीशी असलेल्या जनमताच्या पाठिंब्याचा अंदाज काँग्रेस-श्रेष्ठींना लागू शकला नाही. इतकेंच नव्हे, तर विरोधी गटाच्या नेत्यांच्या राजकीय समयज्ञतेचीहि फार काळ उपेक्षा झाली. कदाचित् काँग्रेसश्रेष्ठींकडून होत असलेली ही उपेक्षाच विरोधीगटाचें सामर्थ्य एकवटण्यास व वाढविण्यास कारणीभूत झाली असण्याचा संभव आहे.

### नवें झुंजार नेतृत्व

मेहेताब मंत्रिमंडळ पुढील सार्वत्रिक निवडणुका होईपर्यंत म्हणजे ह्या वर्षअखेर अधिकारारूढ राहिलें असतें, तर सार्वत्रिक निवडणुकीमध्ये काँग्रेसपक्षाला ह्या मध्यंतर-निवडणुकीमध्ये जेवढें भरघोस यश मिळालें तेवढें खचित मिळालें नसतें. तेव्हा मेहेताब मंत्रिमंडळाला राजिनामा देण्यास भाग पाडून गणतंत्र परिषदेला व संमिश्र मंत्रिमंडळाच्या काँग्रेसमधील पाठिराख्यांना जनमताचा कौल घेण्याचें आव्हान देण्यांत ओरिसा काँग्रेसमधील नव्या रक्ताच्या तरुण नेत्यांनी दाखविलेली राजकीय समयज्ञता व प्रतिभा नि:संशय अभिनंदनीय

(मागील पानावरून)

यानंतर वसंतरावांनी कितीतरी चित्रांत कामें केलीं. त्यांत त्यांनी यश मिळविलें, परंतु त्यांनी कमाल केली 'बाजी प्रभू' च्या भूमिकेंत. असा 'बाजी प्रभु' आता पुन्हा चित्रसृष्टीला मिळणें कठीण आहे. देह-स्वभाव-वृत्ति आणि आवड या सर्वांशी एकरूप होणारी ही त्यांची भूमिका होती. 'सलामी' चित्रपटांत त्यांनी अखेरची भूमिका केली.

### दानत असलेला नट

वसंतरावांनी निर्जीव पडद्यावर अनेक भूमिका केल्या. पण त्यांनी सर्वांत उत्कृष्ट भूमिका वठवली सत्यसृष्टींत जिवंत माणसाची! वसंतराव अतिशय थोर 'माणूस' होते. इतक्या गोड स्वभावाचा, निर्मळ अंत:करणाचा, दानतीचा, दिलदार वृत्तीचा, शुद्ध चारित्र्याचा, निर्व्यसनी, निगर्वी, अजातशत्रु 'माणूस' मीं तरी चित्रसृष्टींत अद्याप दुसरा पाहिला नाही. ज्यांना हा माणूस मित्र लाभला ते भाग्यवान्! तें भाग्य मला बत्तीस वर्षें लाभलें.

आजारी होऊन वसंतराव पुण्याला आले. मी त्यांना भेटायला गेलों. मला पाहतांच त्यांनी मला कडकडून मिठी मारली. ही अखेरची मिठी! आजारानें त्यांना खिंडींत गाठलें होतें. जवळ जवळ दीड वर्ष हा बाजी प्रभू धैर्यानें झुंजत होता. त्यांच्याशी काय बोलावें हेंच मला कळेना. मीं त्यांना म्हटलं, "वसंतराव, खात्री ठेवा, तुम्ही पुन्हा पूर्वीसारखे होणार!"

परंतु माझी इच्छा आणि शब्द दैवाला मंजूर नव्हते!

• • •

अशीच म्हटली पाहिजे. मेहतागटाला आव्हान देण्यांत आपण एक प्रकारें कॉंग्रेसच्या अखिल भारतीय नेतृत्वाच्या राजकीय समयज्ञतेला आव्हान देत आहोंत ही जाणीव असल्यानेच कॉंग्रेस संघटनेमधील विरोधी गटाच्या ठिकाणी विजयाची एक विलक्षण जिद्द निर्माण झाली असली पाहिजे. ह्या जिद्दीच्या जोडीला उदयोन्मुख विरोधी गटाला श्री. विजयानंद पटनाईक यांच्यासारख्या निश्चयी व झुंझार नेत्याचें नेतृत्व लाभल्याने विरोधी गट आव्हानाच्या ह्या दिव्यांतून यशस्वी होऊं शकला. अशा रीतीने ओरिसा कॉंग्रेसमधील जुन्या व नव्या नेतृत्वामधील संघर्षाची तीव्रता कॉंग्रेसच्या यशाला कारणीभूत झाली असली पाहिजे यांत शंका नाही. ओरिसामधील ह्या विजयामुळे तेथील नव्या रक्ताच्या नेत्यांवर एक विशेष प्रकारची जबाबदारी येऊन पडली आहे. ही जबाबदारी ते ज्या प्रमाणांत यशस्वितेने पार पाडतील त्या प्रमाणांत कॉंग्रेसमधील जुन्या मिरासदार नेतृत्वाची संघटनेवरील पकड ढिली होऊन कॉंग्रेसमधील नव्या रक्ताच्या नेत्यांना कॉंग्रेस संघटनेमध्ये अखिल भारतीय प्रतिष्ठा प्राप्त होण्याचा मार्ग सुकर होणार आहे.

संयुक्त मंत्रिमंडळ गट व विरोधी गट ह्यांच्यामधील संघर्षामुळे ओरिसामधील कॉंग्रेस-संघटनेंत निर्माण झालेला पेचप्रसंग कोणतेहि संधिसाधूपणाचे डावपेच न वापरतां जनतेचा विश्वास संपादन करून व जनमताचा कौल ओळखून आक्रमक वृत्तीने व निर्धाराने सोडविण्यांत श्री. विजयानंद पटनाईक व त्यांचे सहकारी ह्यांनी निरपवाद असें यश संपादन केलें आहे व त्या यशाबद्दल त्यांचें निःसंकोचपणें अभिनंदन करणें योग्य होईल.

याचा अर्थ असा नव्हे की, ओरिसामधील निवडणुकींत कांही संधिसाधूंची वर्णी लागली नसेल किंवा कोणतेच गैरप्रकार झाले नसतील. कॉंग्रेसने निवडणुकींत यश मिळविलें तें केवळ पैशाची खैरात करून मिळविलें ह्या टीकेंत तथ्यांश असला, तरी राजकीय अर्थ खासच नाही. कारण पूर्वीच्या निवडणुकीचे वेळी कॉंग्रेसजवळ पैशाची वाण होती अशांतला भाग नाही. कोणत्याहि घटनेची कारणमीमांसा करतांना साकल्याने विचार करण्याचें अनुसंधान ठेवावयास पाहिजे.

एखादा राष्ट्रीय अथवा संघटनाविषयक प्रश्न सोडवितांना राजकीय पक्षाने घेतलेला पवित्रा व योजिलेले डावपेच बरोबर असतील, तर तो प्रश्न सुटतो किंवा सुटण्याच्या मार्गी लागतो व त्यामुळे पक्षाच्या सामर्थ्यांत थोडीफार तरी भर पडते. चुकीचा पवित्रा घेतला गेल्यास किंवा संधिसाधूपणाचे डावपेच अवलंबिले गेल्यास परिणाम नेमका उलट झालेला दिसून येतो.

## केरळ आणि ओरिसा यांतील फरक

श्री. ढेबरभाईंच्या मार्गदर्शनाखाली केरळमध्ये कॉंग्रेसपक्षाने अधिकारारूढ सरकारला मध्यवर्ति सरकारच्या प्रत्यक्ष मदतीने राजीनामा देण्यास भाग पाडलें व मध्यंतर-सार्वत्रिक निवडणुकीमध्ये कम्युनिस्ट पक्षाचा पराभवहि केला. परंतु त्यासाठी तेथील कॉंग्रेसपक्षाने कॉंग्रेसमधील कांही श्रेष्ठ पुढाऱ्यांच्या मान्यतेने ज्या मार्गाचा अवलंब केला त्यामुळे केरळ राज्याला कार्यक्षम असें स्थिर मंत्रिमंडळ तर लाभलें नाहीच, उलट कॉंग्रेसच्या संघटनेमधील अन्तर्गत कमकुवतपणा वाढतच गेला. केरळमधील संयुक्त मंत्रिमंडळाचें स्थैर्य त्यांतील पक्षांना वाटत असलेल्या सामुदायिक मरणाच्या भीतीवर अवलंबून आहे. शिवाय केरळमधील मध्यंतर-निवडणुकीपासून मुस्लीम लीग-सारख्या जातीय पक्षास प्रतिष्ठा प्राप्त झाल्याने देशांत सर्वत्र व खुद्द कॉंग्रेस पक्षांतहि प्रतिगामी जातीयवाद उभारी धरूं लागला आहे. केरळमधील कॉंग्रेसपक्ष मुस्लीम लीगपुढे किती अशरण झालेला आहे ह्याचें प्रत्यंतर केरळ विधानसभेच्या सभापतीच्या निवडणुकीच्या संदर्भात आलेलेंच आहे. मध्यंतर-निवडणुकीनंतरहि केरळमधील कॉंग्रेस-संघटना सत्तालोलुप पुढाऱ्यांच्या आहारी गेल्याने विकलांग झालेली दिसत आहे. उलट ओरिसामध्ये सार्वत्रिक निवडणुकीच्या दिव्यांतून तावून सुलाखून निघालेल्या कॉंग्रेस-संघटनेने कॉंग्रेस पक्षाला नव्या दमाच्या नेतृत्वाचा लाभ करून दिला आहे. ओरिसामधील नव्या नेत्यांनी जनतेमध्ये निर्माण केलेला आशावाद बहुतांशी सफल झाला तर कॉंग्रेस संघटनेंत नवें चैतन्य खेळूं लागेल याविषयी संशय बाळगण्याचें कारण नाही.

## विरोधी पक्षाची उणीव

ओरिसामधील निवडणुकांमध्ये राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता पावलेल्या प्रजासमाजवादी पक्ष व कम्युनिस्ट पक्ष ह्या दोन्ही पक्षांनी लढविलेल्या जागा व त्यांच्या पदरीं पडलेलें यश याची तुलना कॉंग्रेस पक्षाच्या यशाबरोबर केल्यास भारतीय लोकशाहीमध्ये प्रभावी अशा विरोधी पक्षाचा अभाव जाणवल्यावांचून राहत नाही. आपल्या पक्षास आलेल्या अपयशाची प्रजासमाजवादी नेत्यांनी केलेली मीमांसा त्यांच्या स्वसमाधानी वृत्तीला साजेल अशीच आहे. कॉंग्रेसमधील तथाकथित पुरोगाम्यांना पाठिंबा देण्याचें कम्युनिस्ट पक्षाचें धोरण त्या पक्षाच्या अंगलट आलें असें मत प्र. स. पक्षाचे अध्यक्ष श्री. अशोक मेहता यांनी व्यक्त केलें आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या पराभवाचें हेंच प्रमुख कारण असेल, तर कम्युनिस्ट पक्षाला निवडणुकीमध्ये आलेल्या अपयशाबद्दल खंत बाळगण्याचें कांही कारण नाही. ज्या मतदार-संघांतून कम्युनिस्ट उमेदवार गेल्या निवडणुकींत निवडून आले होते त्या नऊहि मतदारसंघांत कम्युनिस्ट उमेदवार यावेळीं पराभूत झाले. ह्या अपयशाची छाननी कम्युनिस्ट पक्ष कशी करतो हें अद्याप समजलें नाही. परंतु आमच्या मतें ह्या घटनेचा उलगडा करणें अवघड नाही. ह्या घटनेचा अर्थ इतकाच की, ह्या निवडणुकींत कॉंग्रेसपक्षाने गणतंत्र परिषदेला दिलेल्या आव्हानाचें गांभीर्य राजकीय जागृतीचे बाबतींत पुढारलेल्या मतदारसंघांतील मतदारांनी ओळखलें होतें. ह्या आव्हानाच्या परिणामाचे बाबतींत मतदार कोणताहि धोका पत्करण्यास तयार नव्हता. म्हणून एरवीं ज्या मतदारांनी कम्युनिस्ट उमेदवारांस मतें दिलीं असतीं किंवा ज्यांचा ओढा कम्युनिस्ट पक्षाकडे होता त्या मतदारांनीदेखील बहुरंगी सामन्यांतील संभाव्य धोका ध्यानांत घेऊन ह्या वेळीं कॉंग्रेसपक्षास विशिष्ट जाणिवेने मतें दिलीं असलीं पाहिजेत. ह्या कारणमीमांसेंत तथ्य असेल, तर कम्युनिस्ट पक्षाला निवडणुकींतील पराभवाने चिंतातूर होण्याचें कारण नाही.

मात्र जनमताचा कौल लक्षांत घेऊन ओरिसामधील कम्युनिस्ट पक्षाने तेथील आगामी मंत्रिमंडळाच्या धोरणाबाबत विधायक दृष्टिकोण ठेवून कार्य केलें पाहिजे. गणतंत्र परिषदेचें सामर्थ्य अजूनहि उपेक्षणीय म्हणतां येणार नाही. दुर्दैवाने राजकीय समयज्ञतेचा अभाव हें कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाचें कायमचें दुखणें होउन राहिलें आहे.

## ( २ ) दिल्लीमध्ये भरलेली मुस्लीम परिषद

तथाकथित राष्ट्रीय मुसलमान नेत्यांनी भारतांतील मुसलमानांच्या गाऱ्हाण्याला वाचा फोडण्यासाठी भरविलेली मुसलमानांची परिषद दिल्ली येथे नुकतीच पार पडली. कॉंग्रेस वर्किंग कमिटीने कॉंग्रेस-मधील मुस्लिम नेत्यांनी अशा स्वरूपाची परिषद भरवूं नये असा अभिप्राय व्यक्त केला होता. परंतु कॉंग्रेस नेत्यांच्या अंगवळणी पडलेल्या निश्चयाभावामुळे अशा तऱ्हेची परिषद भरूं देण्यास अखेर वर्किंग कमिटीने अनुमति दिल्याचें जाहीर केलें. यांवर आपली प्रतिक्रिया व्यक्त करतांना परिषदेच्या निमंत्रक नेत्यांपैकी एक नेते व कॉंग्रेसपक्षाचे खासदार हाफिझुर रहमान ह्यांनी ' आम्ही कोणाकडे परवानगी मागावयास गेलों नव्हतों व परवानगीवाचून परिषद् भरावयाची राहणार नव्हती ' अशा आशयाचे उद्गार काढून वर्किंग कमिटीने दाखविलेल्या अनाठायी व अनाहूत सौजन्याची चांगलीच शोभा केली. परंतु ह्या परिषदेच्या कल्पनेची जी प्रतिक्रिया खुद्द कॉंग्रेस संघटनेमध्ये उमटली त्यामुळे परिषदेच्या नेत्यांच्या जातिवेडाची तार बरीच खाली उतरली. परिषदेपुढे यावयाच्या ठरावांच्या प्रसिद्ध झालेल्या मसुद्यांत कायदेमंडळांत व सरकारी नौकऱ्यांत मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधित्व देण्यांत यावें अशा स्वरूपाच्या मागण्या करण्यांत आलेल्या होत्या. परिषदेमध्यें भाषणें झालीं तींहि बहुतेक बेताल अशींच झालीं. परंतु परिषदेंत संमत झालेले, म्हणजे जे ठराव प्रसिद्धीस देण्यांत आले ते ठराव समजुतदार-पणाच्या व सौम्य भाषेंत केले गेले. परंतु परिषदेचे म्हणून प्रसिद्ध झालेले ठराव हे परिषदेने केलेल्या उपक्रमाच्या अंतिम परिणामांची ग्वाही देणारे आहेत असें समजणें म्हणजे राजकीय वेंधळेपणा ठरेल. मुस्लीम लीगच्या विषारी प्रचाराला ह्या परिषदेमधील बेताल भाषणांनी पुरेंसें खाद्य पुरविलें आहे, ही गोष्ट नाकारतां येणार नाही. सरकारी नोकऱ्या देतांना, इतकेंच नव्हे तर उद्योगधंदे व व्यापार या क्षेत्रांतहि मुसलमानांना पक्षपाताने अन्याय्य वागणूक देण्यांत येते ह्या आरोपाच्या समर्थनार्थ कोणताहि पुरावा सादर करण्याची परिषदेच्या नेत्यांना आवश्यकता वाटली नाही. नेहरूंच्या पश्चात् भारतामध्यें मुसलमानांना कोणी वाली उरणार नाही असा आक्रोश करण्यांत आपण ज्या पक्षात नेते म्हणून मिरवीत आलों त्या पक्षाची आपण बदनामी करीत आहोंत त्याची शुद्धबुद्ध डॉ. सय्यद महंमद यांच्या-सारख्या वयोवृद्ध नेत्याला राहूं नये ही गोष्ट परिषदेमधील जात्यंध वातावरणाची द्योतक होय.

### कम्युनिस्टांची तत्त्वच्युति

परिषदेमधील कामकाजांत समजुतदारपणा आणण्याचे कामीं कम्युनिस्टपक्षाने ह्या परिषदेस पाठविलेले पक्षाचे प्रतिनिधि डॉ. झेड. ए. अहमद ह्यांनी बरेच परिश्रम घेतले असें सांगण्यांत येतें. परंतु तेवढ्यावरून दिल्ली-परिषदेस पक्षाचे प्रतिनिधि पाठविण्यांत अथवा त्या परिषदेंत सहभागी होण्यास पक्षाच्या सभासदांस परवानगी देण्यांत कम्युनिस्ट पक्षाने केलेल्या तत्त्वच्युतीचें गांभीर्य कमी होत नाही. लांडग्याच्या अंगावर शेळीचें कातडें चढवून त्याला फसवी सजावट देणें हा कांहीं जातीयवृत्तीवर अथवा जात्यंधतेवर मिळविलेला विजय नव्हे. त्याची फुशारकी सांगणें हास्यास्पद होय. ● ● ●

[ पान ३८ वरून चालू ]

**वृश्चिक**— ( २३ ऑक्टोबर ते २२ नोव्हेंबर )—तुमच्या जीवनांतलि निरनिराळ्या प्रकारचे अडथळे जाणार आहेत. वरिष्ठ माणसें अनुकूल राहतील. कामाचा ताण कमी होऊन काम पूर्ण करूं शकाल. कांहींना प्रवास घडेल. तुमच्या जवळच्या माणसाच्या प्रश्नाने तुमच्या जीवनांत बदल घडेल. नातलगांशीं मतभेद होईल. अनपेक्षित गोष्टींमुळे मनःस्वास्थ्य बिघडणार आहे. केतु विरोध करीत असल्याने मतभेद तापदायक वाटतील. इतर ग्रह व्यवहारांत फायदा, प्राप्तींत वाढ, येणें वसुली सुचवितात. पैसा हातांत खेळता राहील.

**धनु**— ( २३ नोव्हेंबर ते २० डिसेंबर ) :-पैशाचें साहस करूं नका. कौटुंबिक प्रश्न शिगेला पोहोचतील. पैशावरून मतभेद, भांडणें होतील. सहकाऱ्यांकडून मदत मिळणार नाही. आकस्मिक घटना अशा घडतील की, त्यावर तुमचा ताबा राहणार नाही. या सर्व गोष्टीं-मुळे मानसिक त्रास होणार आहे. प्रेमाच्या बाबतींत विचारपूर्वक वागावें. विवाह झाला असेल त्यांचें कौटुंबिक वातावरण मात्र सुखकारक राहील. रवि अनुकूल नसल्याने प्रकृतीची तक्रार निर्माण होईल. प्रवासाचा बेत असेल तर तो जरा जपूनच करा. धंद्यास यश देण्यास इतर ग्रह अनुकूल आहेत. व्यावसायिक अडचणी दूर होतील. स्थावराचा व्यवहार फायद्याचा ठरेल.

**मकर**—( दि. २१ डिसेंबर ते १९ जानेवारी )- भावनांवर ताबा ठेवणें आवश्यक आहे. अस्वस्थ होऊं नका. येणारें काम सोडूं नका. दि. २० अत्यंत प्रतिकूल असल्याने त्यावेळी जपा. व्यवसायांत स्पर्धा अधिक जाणवेल. लांबून मिळणारी माहिती महत्त्वाची आहे. प्रवासांतून स्फूर्ति मिळेल. घरच्या गोष्टींकडे दुर्लक्ष नको. प्रकृति तपासून घेणें बरें. साध्याहि आजाराकडे दुर्लक्ष करूं नका. पैशाबाबत सावध रहा. आळ येण्याचा संभव. शनि, गुरु, मंगळ यांच्यापासून त्रास होईल. शनि, मंगळ, राहूचीं दानें करा किंवा स्वतः जप करा. शुक्र फायदा देण्यासाठी झटेल. रवि स्थानांतराचा योग देतो.

**कुंभ**—( दि २० जाने. ते १८ फेब्रुवारी )-तुम्हाला विरो-धांतून प्रगतीचा मार्ग काढावयाचा आहे. तुमचें वजन वाढेल. राग व उतावळेपणा त्याबरोबरच उसळून येईल. कांहींचे प्रेमसंबंध स्थिरपद होण्याचा काळ. प्रवासयोग संभवतो. भावनात्मक दुःख व त्रास अनुभवावा लागेल. मंगळ, गुरु, शनि, केतु आपणांस त्रास देणार आहेत. घरगुती आजार, मतभेद व तंटे यांना तोंड द्यावें लागणार. त्यामुळे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य बिघडेल. भागीदाराच्या व्यवहारांत जास्त लक्ष घाला.

**मीन**—(दि.१९ फेब्रुवारी ते २० मार्च)-तुमच्या कल्पना अमलांत आणण्यांस काळ चांगला आहे. उत्साहाने काम करा. यश मिळणार आहे. विश्वासघात, गुप्त कारवाया यांना तोंड द्यावें लागेल. अफवाहि उठतील. काळजी घ्या, नाहीतर व्यर्थ आळ येईल. जादा श्रम करूं नका. प्रकृतीस त्रास होणार आहे. महत्त्वाचे करारमदार करूं नका. मित्रांशीं मतभेद होणार आहेत. पत्नीशी किंवा पतीशी भांडण करूं नका. काम व प्रकृतीकडे जादा लक्ष द्यावयास हवें. बाराचा केतु येत असल्याने त्याच्यापासून क्लेश होणार आहेत. इतर ग्रह मात्र अडचणींचें निरा-करण करतील. कौटुंबिक सुख चांगलें राहील. प्राप्तीहि चांगली राहील. प्रवासाची संधि येईल.



# अथ भविष्यदर्शनम्

ज्योतिषाचार्य द. शं. केळकर
सावंतवाडी.

—— • जुलै महिना • ——

[ सूचना–हें भविष्य राशीवरून किंवा कंसांतील जन्मतारखेवरून पाहिलें तरी पटेल. ]

**मेष**—( जन्म दिनांक २१ मार्च ते २० एप्रिल ) जमिनीच्या खरेदीविक्रीचा व्यवहार करूं नका. घरघुती कामें करा. पत्रव्यवहार व चर्चा यांना काळ अनुकूल आहे. लांबचा प्रवास मात्र करूं नका. धंद्यांत व सामाजिक जीवनांत विरोध होणार आहे. नोकरींत असणाऱ्या व्यक्तींना सहकाऱ्यांकडून त्रास होणार आहे. तुमच्या प्रकृतीवर त्याचा परिणाम होणार आहे. अतिश्रम करूं नका. हृदयाचीं कांहीं प्रकरणें मनासारखीं होतील. घरचें वातावरण पोषक राहणार आहे. रवि,मंगळ, राहु मानसिक त्रास देणार आहेत, तेव्हा धाडस करूं नका. शुक्र, गुरु, बुध व शनि आपणांस अनुकूल आहेत. त्यामुळे कांहींना नोकरींत बढती. जमिनीचीं कामें मनासारखीं होतील. प्रवास होईल.

**वृषभ**—( जन्म दिनांक २१ एप्रिल ते २० मे ) छोटे प्रवास फायद्याचे ठरतील. पत्रव्यवहार वाढेल. धंदाहि चांगला राहील. मिळणारी माहिती चांगली असेल. काम जादा पडणार आहे. खाण्यांत नियमितपणा हवा, तर आरोग्य राहणार आहे. परदेश किंवा लांबचा प्रवास शक्यतों टाळा. फसवणूक होणार नाही, अशा रीतीने जपा. भावनात्मक त्रास होणार आहे. अविवाहित स्त्रीने पुरुषापासून सावध राहवें. प्रेम व पैसा हात राखून वापरा. कुटुंबियांच्या गरजांकडे लक्ष द्या. गुरु, बुध, व रवि अनुकूल असल्यामुळे स्थावराचा व्यवहार चांगला होईल. मंगळ व राहूमुळे प्रापंचिक व कौटुंबिक त्रास होणार आहे. राहू-मंगळाचें दान करा. म्हणजे कलहाचा त्रास होणार नाही.

**मिथुन**—( जन्म दिनांक २१ मे ते २० जून )–जादा खर्च होणार आहे. तुमच्या कामाकडे लक्ष द्या. घरांतील मोठ्या माणसांच्या प्रकृतीसाठीं पैसा खर्च करावा लागणार आहे. कौटुंबिक जीवनांत प्रकृति बिघडणार आहे. तुमचा राग आवरा. मानसिक त्रासाने प्रकृति बिघडेल. महत्त्वाच्या कागदपत्रावर जपून सही करा. आनंददायक आमंत्रणें येतील. जादा काम ह्या महिन्यांत पडणार आहे. शनि, गुरु अनुकूल नाहीत. शनीचीं दानें करा. तथापि इतर ग्रह अनुकूल असल्याने तुमचा उत्साह वाढता राहील. प्राप्तीचें मान सुधारणार आहे. हातांत पैसा खेळत राहणार आहे.

**कर्क**—( जन्म दिनांक २० जून ते २९ जुलै )–आपण पुढे जाण्याचा प्रयत्न करा. संशयी व उदास मात्र बनूं नका. हत्यारें जपून वापरा. आपण प्रयत्न केल्यास आपणांस हवें तें मिळेल. कांही नवे व सुखदायी अनुभव येणार आहेत. महत्त्वाचा निर्णय सावधगिरीने घ्या. काम जादा पडेल. महत्त्वाचा पत्रव्यवहार व वार्ता येतील. खर्च शहाणपणानें करा. नुकसान व्हावें असा हितशत्रूंकडून प्रयत्न होईल. रवि, शनि, राहू व मंगळ यामुळे उष्णतेचा त्रास, उगाच खर्च व आरोग्यास त्रास होणार आहे. परंतु गुरु, शुक्र यांचें आपणांस साह्य असल्यानें व्यवसायांत फायदा व हातांत पैसा खेळता राहणार आहे. नोकरी करणाऱ्यास काळ चांगला आहे.


**सिंह**—( २१ जुलै ते २१ ऑगस्ट )–मागची ठेच स्मरून शहाणे व्हा. पुन्हा जोराने कामास लागा. प्रकृतीवर ताण पडणार आहे, तसेंच कोणासाठी तरी डॉक्टरकडे जावें लागणार आहे. खर्चीहि जादा होईल. कौटुंबिक जीवनांत सुधारणा होणार आहे. कांही आनंददायक घटना घडतील. घरगुती प्रेमाच्या जीवनांत ताणून धरूं नका. मंगळ, राहू, रवि हे आपणांस शारीरिक व मानसिक त्रास देण्यासाठी या काळांत झटणार आहेत. परंतु बुध, शुक्र हे ग्रह तुमच्या व्यावसायिक प्रगतीसाठी झटणार आहेत. नातेवाईकांची मदत मिळणार आहे.

**कन्या**—( २२ ऑगस्ट ते २२ सप्टेंबर )–उत्साहाने काम करा. परंतु प्रकृतीकडे दुर्लक्ष करूं नका. अनेक व्यक्तिगत प्रश्न मनासारखे सुटणार आहेत. तुमची धडाडी व्यापारांत व व्यवहारांत चांगली कामास येईल. फक्त उतावळेपणा करूं नका. नव्या ओळखी व नवे संबंध प्रस्थापित होतील. महत्त्वाच्या व्यक्ति भेटतील. अनपेक्षित ठिकाणाहून पैसा मिळेल. अति श्रम करूं नका. तुमच्या भावना स्पष्ट सांगा. निर्णय विचारपूर्वक घ्या. रवि, मंगळ, शनि हे प्रकृतीस जपा असें सांगत आहेत. मुलें ऐकणार नाहीत. मानसिक त्रास राहील. बुध, शुक्र धार्मिक कृत्यें व आर्थिक लाभ घडवणार आहेत. व्यवसाय कांही झालें तरी पुढे जाणार आहे.

**तुला**—( २३ सप्टेंबर ते २२ आक्टोबर )–तुमच्या धंद्याकडे व कामाकडे जास्त लक्ष द्या. बरीच प्रगति होणार आहे. तुमचें सामाजिक स्थान वाढणार आहे. घरचा आजार तुम्हाला जाणवणार आहे. घरगुती मालमत्तेचा व्यवहार जपून करावा. नोकरींत वरिष्ठांपासून त्रास संभवतो. महिन्याचा पूर्वार्ध प्रगतीकडे नेणार आहे. आपलीं वचनें पूर्ण होतील. कांहींना प्रवास होईल. कांहींच्या जीवनांत नव्या व्यक्तींचा प्रवेश होऊन त्याचा जीवनावर परिणाम होईल. करमणुकीवर जादा खर्च होईल. रवि, बुध, मंगळ, राहू आपणांस मदत करीत आहेत. कांहीना शाबासकी मिळण्यासारखें घडेल. मित्रावर विसंबून राहू नका. गुरु, शनीचा जप किंवा दान करा.

( पान ३७ वर चालू )


Regd. No.



अशा अनेक घरादारांची विलक्षण पडझड झाली.



वेंगुर्ल्यांतील सावित्री केळजी या एका मजूर स्त्रीच्या घराचा व माडांचा विध्वंस.



शिरोडे गांवच्या श्री. वसंत कांबळी यांचा गोठा पडून बैल दुखावला.



उभादांडा ( वेंगुर्ला ) बागायत मराठी शाळा उध्वस्त.

संपादक-मुद्रक-प्रकाशक : श्री. ग. माजगांवकर • प्रकाशनस्थळ : राजहंस प्रकाशन, १०१५ सदाशिव पेठ, पुणें २.
मुद्रणस्थळ : साधना प्रेस, ४३०-४३१ शनिवार पेठ, पुणें २.